ऑगस्ट २०२०/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य






# कोरोना युद्ध

## हेल्पलाइन/दूरध्वनी/संकेतस्थळ/सुविधा

(लॉकडाऊनच्या काळात वेगवेगळ्या घटकांसाठी शासनामार्फत निर्माण करण्यात आलेल्या सुविधा)

### १. मोफत उपचाराची सुविधा देणाऱ्या महात्मा जोतिबा फुले जनारोग्य योजनेची माहिती मिळवण्यासाठी

**संकेतस्थळ**
https://www.jeevandayee.gov.in/

**टोल फ्री क्रमांक**
१५५३८८

### २. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव आणि संसर्ग रोखण्यासाठी सेल्फ ॲसेसमेंट (स्व-चाचणी) टूलसाठी

**संकेतस्थळ**
https://covid-19.maharashtra.gov.in/

**टेलिमेडिसिन हेल्पलाइन**
९५१३६१५५५०

### ३. ऑनलाइन ई-संजीवनी ओपीडी संकेतस्थळ

**संकेतस्थळ**
www.esanjeevaniopd.in

### ४. औषधे, सॅनिटायझर, मास्क इ. बाबत तक्रारी असल्यास अन्न व औषध प्रशासन विभागाच्या,

**नियंत्रण कक्षाचा टोल फ्री क्रमांक**
१८००२२२३६५

**दूरध्वनी क्र**
०२२-२६५९२३६२/६३

### ५. दिव्यांगांच्या सुविधेसाठी संकेतस्थळ

**फेसबुक अकाउंट**
disabilityMaharashtra

**ट्विटर अकाउंट**
@disabilitycomm

**संकेतस्थळ**
https://sjsa.maharashtra.gov.in/en/commissioner-persons-disability



महाराष्ट्र शासन

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,महाराष्ट्र शासन

# अंतरंग

## मिशन बिगिन : नवनिर्मितीचे, नव्या पर्वाचे ६

आजघडीला रुग्ण दुप्पट होण्याचा कालावधी वाढला असून रुग्ण बरे होण्याच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. आता 'मिशन बिगिन अगेन'चा तिसरा टप्पा सुरू झाला आहे. तसेच कोरोना विषाणूवर नियंत्रण मिळवण्यासाठी मुंबईप्रमाणे इतर मोठ्या शहरांत मोठ्या सुविधा उभारण्याच्या दृष्टीने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

## करून दाखवले ! १४

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना सुरू आहेत. जुलैच्या पहिल्या आठवड्यात बरे झालेल्या रुग्णांची संख्या एक लाखाच्या घरात पोहोचली तर जुलैच्या शेवटच्या आठवड्यात ही संख्या २ लाखांच्या वर गेली. या काळात रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ५६ टक्के होते. हा दिलासा मोठा आश्वासक असा आहे.

## पोलिसांचा 'धारावी पॅटर्न' १८

आपले राज्य, देश नव्हे तर संपूर्ण जगाचे लक्ष लागलेल्या धारावी परिसरात कोरोनाविरुद्धच्या सुरू असलेल्या युद्धात धारावीकरांची सरशी झाल्याने दिलासा मिळाला. कोरोनाची साखळी तोडण्यासाठी धारावी पॅटर्न समोर आला.



## उद्योगांना चालना २०

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाचा उद्योगांना मोठा फटका बसला. मात्र उद्योग विभागाने तातडीने महत्त्वाचे निर्णय घेऊन उद्योगांना पुन्हा उभारी घेण्यासाठी साहाय्य केले आहे. याचाच परिणाम म्हणून ६५ हजार उद्योगांना आपले उत्पादन पुन्हा सुरू करता आले.

## वादळाशी यशस्वी झुंज २९

रायगड जिल्ह्याला निसर्ग चक्रीवादळाचा अभूतपूर्व तडाखा बसला. जनजीवन अस्त व्यस्त झाले. पण रायगडचा लढवय्या माणूस आत्मविश्वासाने कामाला लागला. या आत्मविश्वासाला शासनाचे पाठबळ त्वरित मिळाल्याने पुनर्वसनाच्या कार्यास गती मिळाली.

## हम होंगे कामयाब... ९

महाराष्ट्राचे आर्थिक, व्यापारी, औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान लक्षात घेतले तर या संकटाची सर्वात मोठी झळ महाराष्ट्राला बसली आहे. असे असले तरी कोरोनाविरुद्धच्या लढाईत सर्वाधिक प्राधान्य जनतेचे जीव वाचवण्याला राहिले असून तीच शासनाची पहिल्यापासून ठाम भूमिका राहिली आहे.

## स्वस्त धान्य, स्वस्त भोजन १६

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग लॉकडाऊनमध्ये आणि 'मिशन बिगिन अगेन'मध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत आहे. लॉकडाऊननंतर १.१५ कोटी गरजूंनी शिवभोजनाचा लाभ घेतला. सर्वसामान्यांची गरज लक्षात घेऊन शिवभोजनच्या वेळेत सकाळी ११ ते ३ अशी वाढ करण्यात आली.

## अर्थचक्राला गती ४६

राज्याने 'मिशन बिगिन अगेन'मधून झेप घेतली आहे. याअंतर्गत नवीन उपक्रमांना संमती दिली आहे. काही उपक्रमांवर निर्बंधही घालण्यात आले आहेत, अशा अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत.


| | | | |
|---|---|---|---|
| मिशन बिगिन : नवनिर्मितीचे, नव्या पर्वाचे | ६ | वादळाशी यशस्वी झुंज | २९ |
| हम होंगे कामयाब... | ९ | धैर्याची कसोटी ! | ३४ |
| करून दाखवले ! | १४ | सुरळीत आणि सुरक्षित | ३५ |
| स्वस्त धान्य, स्वस्त भोजन | १६ | 'रोल मॉडेल' धारावी | ३६ |
| पोलिसांचा 'धारावी पॅटर्न' | १८ | आम्ही जिंकलो... | ३९ |
| उद्योगांना चालना | २० | कोरोना योद्धे | ४२ |
| सुवर्णसंधी | २२ | अर्थचक्राला गती | ४६ |
| तंत्रकुशल बळीराजा | २४ | मंत्रिमंडळात ठरले ! | ५४ |
| दिलासा : कर्जमुक्तीचा, पीककर्जाचा | २६ | प्रबोधनाचा वसा पुढे न्यावा | ५७ |

वर्ष ७२ वे | अंक २ | ऑगस्ट २०२०

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

| | |
|---|---|
| मुख्य संपादक | डॉ. दिलीप पांढरपट्टे |
| प्रबंध संपादक | अजय अंबेकर<br>सुरेश वांदिले |
| संपादक | अनिल आलूरकर |
| उपसंपादक | प्रवीण कुलकर्णी<br>गजानन पाटील<br>राजाराम देवकर |
| वितरण अधिकारी | मंगेश वरकड |
| वितरण साहाय्य | अश्विनी पुजारी |
| साहाय्य | भारती वाघ |
| मुखपृष्ठ | सीमा रनाळकर<br>सुशिम कांबळे |
| मांडणी, सजावट | शैलेश कदम |
| मुद्रितशोधन | उमा नाबर |
| मुद्रण | मे. मुद्रण प्रिंट<br>एन पॅक प्रा.लि.,<br>कोपरखैरणे,<br>नवी मुंबई. |

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# वंदे भारत अभियान

वंदे भारत अभियानांतर्गत ४०६ विमानांनी आतापर्यंत मुंबईत ५५ हजार ६०२ प्रवासी आले असून यामध्ये मुंबईतील प्रवाशांची संख्या १८ हजार ६७० आहे. आलेल्या एकूण प्रवाशांमध्ये उर्वरित महाराष्ट्रातील १९ हजार ०५९ प्रवासी असून इतर राज्यातील प्रवाशांची संख्या १७ हजार ८७३ इतकी आहे. कोरोना विषाणूविरुद्ध शासन निग्रहाने लढत असताना परदेशात अडकलेल्या महाराष्ट्रातील व इतर राज्यातील नागरिकांना मुंबईत उतरवून घेऊन त्यांना क्वारंटाइन करण्याची जबाबदारी महाराष्ट्र शासनामार्फत पार पाडली जात आहे.

## या देशातून आले प्रवासी



ब्रिटन, सिंगापूर, फिलिपाईन्स, अमेरिका, बांगलादेश, मलेशिया, कुवेत, अफगाणिस्तान, ओमान, दक्षिण अफ्रिका, इंडोनिशिया, नेदरलँड, जपान, श्रीलंका, म्यानमार, टांझानिया, स्पेन, आर्यलँड, कतार, हाँगकाँग, कझाकीस्तान, मॉरिशियस, ब्राझील, थायलंड, केनिया, मियामी, व्हियतनाम, इटली, स्विडन, इथोपिया, रोम, जर्मनी, दुबई, मालावी, वेस्ट इंडिज, नॉर्वे, कैरो, युक्रेन, रशिया, मादागास्कर, नायजेरिया, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड सौदी अरेबिया, कॅनडा, पूर्व अफ्रिका, फ्रान्स, नैरोबी, न्युयॉर्क, जॉर्जिया, कामेरुन, युनायटेड अरब अमिराती, कांगो अशा विविध देशातून प्रवासी मुंबईत दाखल झाले आहेत.

बृहन्मुंबईतील प्रवाशांसाठी संस्थात्मक क्वारंटाइनची सुविधा विविध हॉटेल्समध्ये करण्यात आली आहे. इतर जिल्ह्यांतील व राज्यातील प्रवाशांना त्यांच्या जिल्हा मुख्यालयी पाठवण्याचे काम जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्यामार्फत करण्यात येत आहे. हे प्रवासी त्यांच्या जिल्ह्यात गेल्यानंतर तेथील जिल्हाधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्तांमार्फत त्यांना क्वारंटाइन करण्याचे काम करण्यात येत आहे.

महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुनर्वसन विभाग यांच्या २४ मे २०२० च्या मार्गदर्शक सूचनेनुसार आलेल्या प्रवाशांना क्वारंटाइन करण्याचे काम करण्यात येत आहे. इतर राज्यातील प्रवाशांचे वाहतूक पासेस संबंधित राज्याकडून प्राप्त होईपर्यंत या प्रवाशांना मुंबईतील क्वारंटाइन सेंटरमध्ये ठेवले जात आहे. तसेच या प्रवाशांचे वाहतूक पास संबंधित राज्याकडून प्राप्त होताच त्यांना त्यांच्या राज्यात पाठवण्यात येत आहे. वंदे भारत अभियानातील कामकाज जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर, बृहन्मुंबई महानगरपालिका, प्रादेशिक परिवहन अधिकारी, बेस्ट, महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळ, भारतीय विमानतळ प्राधिकरण, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरण लि. यांच्या समन्वयाने केले जात आहे. वंदे भारत अभियान केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालय, विदेश मंत्रालय व केंद्रीय गृह मंत्रालय यांच्या समन्वयाने महाराष्ट्र शासन यशस्वीरीत्या पार पाडत आहे.

(सदरची आकडेवारी ३१ जुलै २०२० पर्यंतची आहे.)

# कोरोनामुक्तीच्या दिशेने

'कोविड-१९' आणि 'कोरोना' या शब्दांचे मोहोळ सदैव आपल्याभोवती घोंगावत आहे. पण हेही तितकेच खरे की, अनिष्टतेचे हे मोहोळ जास्त काळ घोंगावणार नाही. चीननंतर अनेक देशांना या विषाणूने विळखा घातला. तो एवढा घट्ट होता की अनेक प्रगत देश हतबल झाले. आपण मात्र वेळीच सावध झालो.

या विषाणूचा प्रसार होण्याचे प्रमाण प्रचंड असल्याने कोरोनाबाधितांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसते. आपला देश पर्यायाने राज्यही त्याला अपवाद ठरले नाही. परंतु ज्या पद्धतीने आपण त्यावर नियंत्रण मिळवत आहोत, त्याची प्रशंसा जगभर होत आहे. जेव्हा जेव्हा राष्ट्रीय आपत्ती आली, तेव्हा तेव्हा महाराष्ट्र खंबीरपणे उभा राहिला. त्याचे प्रत्यंतर धारावीच्या रूपाने अवघ्या जगाला आले. जागतिक आरोग्य संघटनेचे प्रमुख डॉ. टेड्रोस अडहॅनम गेब्रेयेसुस यांनी ज्या देशांनी कोरोना नियंत्रणात उत्तम कामगिरी केली त्यांची उदाहरणे देताना धारावीतील एकात्मिक प्रयत्नांचा आवर्जून उल्लेख केला. केंद्र सरकारनेही धारावी पॅटर्नचे कौतुक केले. मात्र कोरोनाविरोधी लढ्यातील यशाची ही पहिली पायरी आहे.



प्रतिचौरस किलोमीटर २ लाख २७ हजार १३६ व्यक्ती एवढी लोकसंख्येची घनता असलेल्या आणि दररोज शेकडो कोरोना संसर्गाचे केंद्र ठरलेल्या धारावीसारख्या आव्हानात्मक परिसरात जर कोरोनावर नियंत्रण मिळवून जगासमोर आदर्श ठेऊ शकतो, तर राज्यातील इतर भागातील कोरोनाचे उच्चाटन करण्यास आपल्याला वेळ लागणार नाही. धारावीने आपल्याला एक प्रकारे बळ, प्रेरणा आणि आत्मविश्वास दिला. अर्थातच याचे श्रेय सूक्ष्म नियोजन आणि त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व लोकसहभागाला जाते. आता तोच कित्ता राज्यभर गिरवायचा आहे. त्या दृष्टीने राज्य शासन निर्णायक पावले टाकत आहे.

जानेवारीच्या शेवटापासून कोरोना या विषाणूच्या धोक्याची कुणकुण लागताच राज्याने आवश्यक ती पावले टाकायला सुरुवात केली. मात्र, कोरोनासारख्या वेगाने पसरणाऱ्या या साथीच्या रोगाशी सामना करण्याच्या दृष्टीने सुरुवातीला आपल्याकडे ना प्रयोगशाळा होत्या, ना आवश्यक वैद्यकीय सामग्री पीपीई कीट, एन-९५ मास्क, व्हेंटिलेटर्स अशा गोष्टींची कधीच एवढ्या मोठ्या प्रमाणावर गरज भासली नसल्याने त्याही दुर्लभ होत्या. मात्र गेल्या पाच महिन्यात या बाबतीत राज्य आत्मनिर्भर बनले. नव्याने उभारण्यात आलेल्या १३१ प्रयोगशाळा, पुरेशी कोविड समर्पित आरोग्य केंद्रे आणि रुग्णालये, आयसोलेशन बेड्स, ऑक्सिजन बेड्स, आयसीयू बेड्स, व्हेंटिलेटर्स, पीपीई किट्स, मास्क आदी वैद्यकीय सुविधांनी आरोग्ययंत्रणा सज्ज आणि समर्थ झाली. मुंबईनंतर इतर मोठ्या शहरांतही जम्बो सुविधा उभारल्या जात आहेत.

या संकटकाळात प्रत्येक आघाडीवर शासन शर्थीने लढत आहे. परंतु आणखी एक घटक आहे जो यंत्रणेच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे आणि तो म्हणजे सर्वसामान्य नागरिक. लॉकडाऊनच्या काळात उद्योगधंदे, बाजार बंद झाल्याने असंख्य नागरिकांची मोठी गैरसोय झाली. मात्र या आणीबाणीच्या कठीण प्रसंगात तो अधिक खंबीर बनला. कोरोनावर मात करण्यासाठी जमेल तेवढा हातभार लावू लागला. कुणी सॅनिटायझर फवारणी यंत्र बनवले, कुणी कल्पकतेतून सॅनिटायझर स्टँड बनवले, कुणी गावातील शेतकऱ्यांचा भाजीपाला घेऊन थेट शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये विकू लागला, कुणी कोविड योद्धा म्हणून शासकीय यंत्रणेला मदत करू लागला. अशा कल्पक प्रयोगांची, प्रयत्नांची यादी लांबलचक आहे. मात्र जेव्हा सर्वसामान्य नागरिक एखाद्या चळवळीत वा लढाईत सामील होतो, तेव्हा जगातली कुठलीही लढाई यशस्वी होते. याचे इतिहासात अनेक दाखले आहेत. याही वेळी इतिहासाची पुनरावृत्ती होईलच. कोरोना हरेल, देश जिंकेल.

या संकटावर मात करण्यासाठी राज्य शासन युद्धपातळीवर काम करत आहे. याचाच परिणाम म्हणून कोरोनाबाधित रुग्णांपेक्षा आता बरे होऊन घरी जाणाऱ्यांची संख्या वाढली आहे. लॉकडाऊनच्या तीन टप्प्यांतून आपण यापूर्वीच गेलो आहोत. आता 'मिशन बिगिन अगेन'चा टप्पा सुरू झाला आहे. उद्योग, व्यवसाय सुरू झाल्याने सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय दूर होत आहे. जीवनमान पूर्वपदावर येत आहे. शासन करत असलेल्या विविध उपाययोजना, यशकथा, महत्त्वपूर्ण घडामोडी, मंत्रिमंडळ निर्णय याबाबतचा आढावा आम्ही 'लोकराज्य'च्या या अंकात घेतला आहे. हा अंक आपणास आवडेल, असा विश्वास आहे.

आपण १५ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्यदिनाचा ७३वा वर्धापनदिन साजरा करत आहोत. कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवरचा हा स्वातंत्र्यदिन आपल्याला कोरोनापासून लवकरात लवकर मुक्ती देण्यासाठी प्रेरित करो, ही सदिच्छा. तसेच आमचे सर्व वाचक, लेखक, नागरिक यांना स्वातंत्र्यदिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा.

**डॉ. दिलीप पांढरपट्टे**
(मुख्य संपादक)




# मिशन बिगिन नवनिर्मितीचे, नव्या पर्वाचे

**कोविडबाबत धोक्याची कुणकुण लागताच राज्याने जे काही केंद्राने सांगितले त्यानुसार सगळी पावले टाकायला सुरुवात केली. आपल्याकडे ना प्रयोगशाळा होत्या, ना आवश्यक वैद्यकीय सामग्री. पण ५ महिन्यांच्या काळात आपण सुविधांची उभारणी ज्या वेगाने केली आणि साहित्यांची जमवाजमव केली त्याकडे संपूर्ण देशात उदाहरण म्हणून पाहिले जात आहे. त्यामुळे आजघडीला रुग्ण दुप्पट होण्याचा कालावधी वाढला असतानाच रुग्ण बरे होण्याच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. आता 'मिशन बिगिन अगेन'चा तिसरा टप्पा सुरू झाला आहे. हळूहळू सगळे काही पूर्ववत होत आहे. कोरोना विषाणूवर नियंत्रण मिळवण्यासाठी मुंबईप्रमाणे इतर मोठ्या शहरात मोठ्या सुविधा उभारण्याच्या दृष्टीने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.**

**उद्धव बाळासाहेब ठाकरे,** मुख्यमंत्री



'मिशन बिगिन अगेन'चा तिसरा टप्पा सुरू झाला आहे. तत्पूर्वी लॉकडाऊनच्या तीन टप्प्यांतून आपण गेलो आहोत. या काळात आपण स्वत:ला आणि परिवाराला अक्षरश: घरात कोंडून ठेवले आणि आता हळूहळू सगळे काही पूर्ववत सुरू करण्याकडे वाटचाल सुरू आहे. वाटचाल एवढ्यासाठीच म्हटलं कारण आपला प्रवास अजून सुरूच आहे. वाट खरोखरच खडतर आहे, इथपर्यंत तर आपण आलो पण आपण नेमके या प्रवासाच्या मध्यावर आहोत की, हा भयानक प्रवास आता संपतोय की, नेमके अजून किती जायचे आहे हे सगळं काही खूप धूसर आहे.

एक निश्चित सांगतो कुठलंही संकट खूप शिकवून जातं. आपण खूप नव्या संधी शोधण्याचा प्रयत्न करतो. काही जुन्या बिनकामाच्या गोष्टींचे ओझे मागे टाकून देतो त्याप्रमाणे आपल्या सगळ्यांचे झाले आहे. मार्च



महिन्यात काय होतं आपल्याकडे? कोरोनाने 'आ' वासायला सुरुवात केली होती. जानेवारीच्या शेवटापासून या धोक्याची कुणकुण लागताच राज्याने जे जे काही केंद्राने सांगितले त्यानुसार सगळी पावले टाकायला सुरुवात केली होती. पण ती खूपच प्राथमिक स्वरूपाची होती. आपल्याकडे ना प्रयोगशाळा होत्या, ना आवश्यक वैद्यकीय सामग्री. पीपीई कीट, एन-९५ मास्क, व्हेंटिलेटर्स या गोष्टी म्हणजे आपणासाठी दुर्लभच होत्या. पण आज ५ महिन्यांच्या काळात आपण सुविधांची उभारणी ज्या वेगाने केली आणि साहित्यांची जमवाजमव केली या संपूर्ण देशात उदाहरण म्हणून पाहिले जात आहे, असा मला विश्वास वाटतो.

## राज्यासमोरील उद्दिष्ट

आज आपले उद्दिष्ट आहे पॉझिटिव्हिटी दर १० टक्क्यांपेक्षा खाली आणण्याचे, आज फक्त १२ जिल्ह्यांमध्ये तो कमी आहे. दर दशलक्ष लोकसंख्येमागे दिवसाला १४० चाचण्या करायच्या आहेत. आज केवळ १७ जिल्ह्यांत ते शक्य झाले आहे. मृत्युदर १ टक्क्यापेक्षा कमी करायचा आहे. आज फक्त ४ जिल्ह्यांत तो कमी आहे.

## जम्बो सुविधांची उभारणी

सध्याच्या आरोग्य परिस्थितीबाबत विस्तृतपणे बोलत नाही मात्र एवढे निश्चित सांगतो की, रुग्ण दुप्पट होण्याचा कालावधी वाढणे आणि रुग्ण बरे होण्याच्या संख्येत मोठी वाढ ही आमच्यासाठी जमेची बाजू आहे. मुंबईतील काही उदाहरणे आम्ही आत्मविश्वासाने सांगू शकतो. धारावीमध्ये ज्या पद्धतीने आम्ही साथीचा मुकाबला केला. वरळीसारख्या मोठ्या परिसरात आम्ही ज्या पद्धतीने 'चेस दि व्हायरस' मोहीम राबवली त्याची प्रशंसा देश पातळीवरच नव्हे, तर जागतिक पातळीवर केली गेली. आम्ही ज्या जम्बो सुविधांची उभारणी मुंबई भागात केली आहे, त्याच पावलावर पाऊल टाकून मुंबई महानगर, पुणे तसेच इतर मोठ्या शहरांमध्ये देखील अशा मोठ्या सुविधा लवकरच उभारलेल्या दिसतील. त्या दृष्टीने युद्ध पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. आम्ही मुंबईच्या परिसरात साथीच्या रोगांवरील उपचारांसाठी कायमस्वरूपी देशातील सर्वात मोठे ५ हजार बेड्सचे रुग्णालय उभारण्याचे ठरवले आहे, त्या दृष्टीने पण हालचाली सुरू केल्या आहेत.

## भीती दूर करण्यासाठी प्रयत्न

रुग्ण शोधणे आणि त्यांचे जास्तीत जास्त संपर्क शोधणे हे अत्यावश्यक आहे. तोपर्यंत तुम्ही कितीही सुविधा उभारा, त्याचा उपयोग नाही हे मी वारंवार जिल्हा प्रशासनाला, पालिकांना सांगतोय. रुग्ण सेवा, वेळीच ऑक्सिजन व्यवस्था, रुग्णवाहिकांची उपलब्धता, बेड्सचे व्यवस्थापन या गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे लोकांमधील भीती दूर होऊन एकूणच वैद्यकीय यंत्रणा आणि प्रशासनाविषयी त्यांच्या मनात विश्वास निर्माण होईल.

### आरोग्य सुविधेत वाढ

फेब्रुवारीमध्ये १ प्रयोगशाळा होती आपल्याकडे आज १३१ प्रयोगशाळा आहेत. राज्यात २६६५ कोविडसमर्पित आरोग्य केंद्रे आणि रुग्णालये असून एकूण ३ लाख ६ हजार १८० आयसोलेशन बेड्स, ४२ हजार ८१३ ऑक्सिजन बेड्स, ११ हजार ८८२ आयसीयू बेड्स, ३७४४ व्हेंटिलेटर्स, ७ लाख ६ हजार ९११ पीपीई किट्स, १२ लाख ५९ हजार ३८२ एन-९५ मास्क आहेत.

## प्लाझ्मा दान, टास्क फोर्स

या संपूर्ण काळात आमच्या यंत्रणेने केलेल्या अनेक गोष्टी मी सांगू शकतो. देशात प्रथमच प्लाझ्मा थेरपीचा सर्वात मोठा उपयोग महाराष्ट्रात करणे सुरू झाले

आहे.

५०० पेक्षा जास्त रुग्णांचे प्राण यातून वाचवायचे असे सुरुवातीचे उद्दिष्ट्य आहे. शेकडो दाते पुढे येत आहेत. देशात प्रथमच तज्ज्ञ डॉक्टर्सचा टास्क फोर्स महाराष्ट्रात आणि सर्व जिल्ह्यांमध्ये नेमला आहे, त्यांचा एकमेकांमध्ये संपर्क असतो.

## गावोगावी दक्षता समित्या

गावोगावी कोरोना ग्रामदक्षता समित्यांची स्थापना होत आहे. लोकांचा सहभाग वाढवणे यावर भर दिला आहे जेणेकरून जनजागृती अधिक परिणामकारक होईल. याशिवायही इतर अनेक महत्त्वाचे निर्णय आम्ही घेतलेत जसे की, महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ सर्व नागरिकांना देणे, रुग्णालयांमधील ८० टक्के बेड्स राखीव ठेवणे, खासगी रुग्णालयांवर अधिकाऱ्यांची देखरेख पथके नियुक्त करणे, मुंबईत प्रिस्क्रिप्शनशिवाय मुक्त चाचणी करण्यास मुभा देणे, चाचणीचे दर नियंत्रित करणे वगैरे.


लॉकडाऊन काळामध्ये आम्हांला कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व्यवस्थित पावले उचलता आली. लक्षणे नसलेल्या परंतु कोविड झालेल्या लोकांकडून इतरत्र त्याचा प्रसार रोखता आला. सुविधांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती झाली.

## अनलॉकमुळे अर्थचक्र सुरू

अनलॉकिंग करताना आम्ही विविध देशांतील उद्योगांशी गुंतवणुकीचे करार केले, राज्यातील पायाभूत सुविधांच्या कामाला वेगाने सुरुवात केली, उद्योग बऱ्याच प्रमाणात सुरू झाले असून कामगार कामावर येत आहेत. महापरवानाच्या माध्यमातून उद्योगांना कोणत्याही त्रासाशिवाय परवाने मिळणे सुलभ केले आहे. यासंदर्भात उद्योगांना सुलभ व्हावे म्हणून अनेक जुने अडचणीचे निर्णय बदलले आहेत. लवचीकता वाढवली आहे.

## विकासकामांना वेग

नुकतेच आम्ही सिडकोच्या माध्यमातून सर्वसामान्यांना घरे वाटपाचा शुभारंभ केला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे काम सुरू झाले आहे. सर्व मोठ्या शहरांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवण्याचा निर्णय आम्ही घेतला असून त्यामुळे गरीब आणि कष्टकरी यांना घरे मिळण्याचा मार्ग मोकळा होत आहे.




## कृषी, शिक्षण, रोजगारावरही भर

गेल्या १० वर्षांत झाली नाही इतकी विक्रमी कापूस खरेदी आम्ही करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. मधल्या काळात थांबलेल्या शेतकरी कर्जमुक्ती योजनेचे लाभ परत देणे सुरू केले. जे शेतकरी राहिले होते त्यांच्यासाठी तरतूदही केली. खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन खते आणि इतर साहित्य निविष्ठा यांचे वाटप केले.

जूनपासून ऑनलाइन शिक्षणाला प्रारंभ केला. राज्यात परत पर्यटनाला तेजी यावी म्हणून पावलेही टाकली आहेत, काही धोरणे आम्ही बदलत आहोत. युवक युवतींना रोजगार मिळावा म्हणून 'महाजॉब्स पोर्टल' आणि मोबाईल ॲपही सुरू केले. त्यावर हजारो तरुण आपले नाव दररोज नोंदवत आहेत.

## दृष्टिकोन बदलला

लॉकडाऊन आवश्यक असला तरी एकूणच सर्वसामान्यांमध्ये त्याविषयी एक नकारात्मकता आली आहे आणि म्हणूनच आम्ही 'मिशन बिगिन अगेन' असे म्हणून हळूहळू सर्व गोष्टींची सुरुवात करतो आहोत. गेल्या ४ महिन्यात आपली सर्व राज्ये, संपूर्ण देशच जणू एक प्रयोगशाळा बनला आहे असे वाटतेय. कोरोना हे मोठे संकट आहे, यात काही शंका नाही; पण यात इष्टापत्ती ही की, आरोग्याकडे पाहण्याचा आपला अतिशय संकुचित दृष्टिकोनच मुळात बदलून गेला. आपण आता पुढील काळात कुठलीही योजना, कार्यक्रम आखताना आरोग्य या बाबींना अधिक प्राधान्य देणार असून त्यासाठी अधिकाधिक निधी मिळत राहील हे पाहणार आहोत.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे वैद्यकीय क्षेत्रात आता नवनवीन संशोधन, स्टार्ट अप्स यांना खूप मोठी संधी आहे असे वाटते. कोरोनाच्या काळात अनेक लहान मोठे प्रयोग झाले. औषधे आली. पण मला वाटते की, वैद्यकीय उपकरणे, वैद्यकीय साहित्य किंवा या अनुषंगाने इतरही क्षेत्रात दैनंदिन जीवनात लोकांनी कल्पकतेने काही संशोधन करून वस्तूंची निर्मिती केली. ती खरी आत्मनिर्भरता आहे. अशा उपक्रमांना पुढे जाऊन प्रोत्साहन देण्याची गरज आहे हे लक्षात घेऊन आम्ही धोरणे आखणार आहोत.

या बदलत्या परिस्थितीत महाराष्ट्राचे योगदान देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने अधिक मजबूत कसे होईल हे पाहण्यासाठी 'मिशन बिगिन अगेन' ही एक सुरुवात आहे, असे मी समजतो.

**शब्दांकन : अनिरुद्ध अष्टपुत्रे,**
मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी

**'कोरोना'चे संकट हे आपल्या राज्यावर, देशावर, जगावर आलेले आजवरचे सर्वात मोठे संकट आहे. महाराष्ट्राचे आर्थिक, व्यापारी, औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान लक्षात घेतले तर या संकटाची सर्वात मोठी झळ महाराष्ट्राला बसली आहे. असे असले तरी कोरोनाविरुद्धच्या लढाईत सर्वाधिक प्राधान्य जनतेचा जीव वाचवण्याला राहिला असून तीच शासनाची पहिल्यापासून ठाम भूमिका राहिली आहे.**

**अजित पवार**
उपमुख्यमंत्री



कोविड हे जागतिक संकट आहे. त्यामुळे कोविडशी लढताना आर्थिक नुकसान नंतर भरून काढता येईल म्हणून जनतेचा जीव वाचवायला सुरुवातीपासून सर्वोच्च प्राधान्य दिले. टाळेबंदीसारखा निर्णय नाइलाजाने घ्यावा लागला. त्यामुळे कोरोनाच्या प्रसारावर आपण बऱ्यापैकी नियंत्रण ठेवू शकलो. कोरोनाप्रसाराचा वेग नियंत्रित करण्यात आणि मृत्यूदर कमीत कमी ठेवण्यात आपल्याला यश मिळाले. दरम्यानच्या काळात राज्याच्या आरोग्य यंत्रणेला सक्षम, सुसज्ज, प्रभावशाली करण्याचे काम केले. कोविड उपचार, अलगीकरण, विलगीकरण केंद्रांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती केली. मनुष्यबळ प्रशिक्षित केले. गावागावात, वस्तीवस्तीत, घरोघरी जाऊन तपासणी केली. मुंबईतल्या झोपडपट्ट्यांमध्ये प्रादुर्भाव रोखणे हे मोठे आव्हान होते. तेदेखील आपण पेलले.

मुंबईच्या दाट झोपडपट्टीच्या धारावी भागात राबवलेल्या कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांची व यशाची दखल जागतिक पातळीवर घेतली गेली हे देखील या निमित्ताने लक्षात घेतले पाहिजे. सर्वात मोठे यश म्हणजे, कोरोनाला घाबरण्याचे कारण नाही, कोरोना निश्चितपणे बरा होतो, हा विश्वास आपण नागरिकांमध्ये निर्माण करू शकलो. अर्थात हे यश राज्यातल्या प्रत्येक नागरिकाने केलेल्या सहकार्याचे, दाखवलेल्या एकजुटीचे आहे.

### सामूहिक प्रयत्नांचे यश

कोरोनाविरुद्धच्या लढाईत मिळालेल्या यशात मोठा वाटा हा कोरोनाविरुद्ध पहिल्या फळीत लढत असलेल्या डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, सफाई कामगार, अंगणवाडी सेविका, आशाताई, पोलीस बांधव, स्थानिक स्वराज संस्थांचे अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते यांचा आहे. मंत्रिमंडळातील सर्व सहकारी, राज्यातील सर्व लोकप्रतिनिधी

# हम होंगे कामयाब...



## कोरोनायोद्ध्यांना विमा संरक्षण

डॉक्टर, परिचारिका, पॅरामेडिकल स्टाफ 'कोरोना' लढाईतील कर्तव्ये पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण देण्यात आले. त्याची व्याप्ती वाढवत कोरोना साथ प्रतिबंधक व उपचार कार्याशी कर्तव्ये पार पाडणाऱ्या शासकीय, खासगी, कंत्राटी, बाह्यस्रोतांद्वारे घेतलेले कर्मचारी, मानसेवी, तदर्थ कर्मचारी अशा सर्व कर्मचाऱ्यांना ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण पुरवण्याचा निर्णय शासनाने घेतला. या निर्णयानुसार, कोविडविरुद्धच्या लढ्यात सहभागी असलेले जिल्हा प्रशासन, पोलीस, होमगार्ड, अंगणवाडी कर्मचारी, लेखा व कोषागारे, अन्न व नागरी पुरवठा, पाणी पुरवठा व स्वच्छता, घरोघरी सर्वे क्षणासाठी नेमलेले अन्य विभागाचे कर्मचारी अशा सर्व घटकांना ५० लाख रुपयांचे विमासंरक्षण मिळाले.

तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात रस्त्यावर उतरून केलेल्या परिश्रमांना याचे श्रेय आहे.

कोरोनासारख्या संकटकाळात सर्वांना सोबत, विश्वासात घेऊन, जनतेला दिलासा देत, अत्यंत निर्धाराने राज्याचे नेतृत्व करीत असलेले मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वालाही याचे श्रेय द्यावेच लागेल. कोरोना संकटकाळात विरोधीपक्षांसह अखंड महाराष्ट्र संकटाचा एकजुटीने सामना करत आहे, हे चित्र आनंद, दिलासा देणारे आहे. त्याबद्दल मी महाराष्ट्रातील नागरिकांचे आभार मानतो.

कोरोनाविरुद्ध राज्यातील संपूर्ण यंत्रणा लढत आहे. कोरोना रुग्ण रुग्णालयापर्यंत येण्याची वाट न पाहता यंत्रणा संभाव्य रुग्णापर्यंत पोहोचायला सुरुवात केली आहे. 'चेस दि व्हायरस' मोहिमेंतर्गत देशात सर्वाधिक कोरोना चाचण्या महाराष्ट्रात होत आहेत. राज्यात रुग्णांची संख्या अधिक दिसत असली तरी रुग्ण बरे होण्याचा दरही समाधानकारक आहे. 'मिशन बिगन अगेन'च्या माध्यमातून राज्यातील टाळेबंदी हळूहळू शिथील करण्यात येत आहे. स्थानिक परिस्थिती पाहून शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून काही ठिकाणी पुन्हा टाळेबंदी करावी



लागत आहे. कोरोनाचा मुकाबला करण्यासाठी आरोग्य विभागासह इतर विभागांना लागणारी आर्थिक रसद पुरवण्याबरोबरच राज्याचे अर्थचक्र पूर्ववत करण्यास राज्य शासनाचे प्राधान्य दिले असून त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

कोरोनाविरुद्धची लढाई लढताना राज्याचा दैनंदिन कारभार, लोकांच्या जीवनाचा गाडा सुरू राहिला पाहिजे, हा आपला प्रयत्न आहे. त्यासाठी कोरोनाविरुद्धची लढाई तसेच राज्याच्या विकासाचा गाडा दोन्ही सुरू ठेवण्यासाठी गेल्या चार महिन्यात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले गेले.

### मोफत उपचार

'कोविड-१९' विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन राज्य शासनाने महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ राज्यातील सर्व नागरिकांना अंगीकृत रुग्णालयांमार्फत उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मे महिन्यातच घेतला आहे. राज्यातील सर्व जनतेला या योजनेंतर्गत 'कोविड-१९' वर मोफत उपचार देण्यात येत आहेत. उपचारांचा खर्च राज्य सरकारकडून महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत करण्यात येत आहे. राज्यात आरोग्य सुविधा वाढवण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

मार्च महिन्यात राज्यात २ कोरोना चाचणी केंद्रे होती. ती संख्या आजमितीस १३० पेक्षा अधिक आहे. वैद्यकीय महाविद्यालयात नवीन कोरोना चाचणी केंद्रे सुरू केली आहेत. राज्यात आजमितीस २ हजार ६६५ कोविड समर्पित आरोग्य केंद्रे, रुग्णालये आहेत. राज्यात ३ लाखांवर आयसोलेशन बेड्स. ४३ हजारांच्या आसपास ऑक्सिजन बेड्स, सुमारे १२ हजार आयसीयू बेड्स, ४ हजार व्हेंटिलेटर्स, पीपीई किट्स आणि मास्क आदी पुरेसे साहित्य आज राज्यात उपलब्ध आहे. कोरोनाविरुद्धच्या लढाईत कुठलीही उणीव राहू नये, यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत.

### रुग्णवाहिकांची खरेदी

राज्यातील आरोग्यसुविधा भक्कम करण्यासाठी आपण १००० नवीन रुग्णवाहिका घेण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी अर्थसंकल्पातच २५ कोटींची तरतूद केली आहे. यापैकी ५०० रुग्णवाहिका यंदा तर उर्वरित पुढच्या वर्षापर्यंत उपलब्ध होतील. राज्यावरील कोरोना संकटकाळात तातडीने रुग्णवाहिका उपलब्ध होण्यासाठी काही खासगी रुग्णवाहिका अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. रुग्णवाहिकांच्या दरावर नियंत्रण आणण्यात आले आहे. खासगी रुग्णवाहिकांचे दरही निश्चित करण्यात आले असून त्यावर विशेष समित्यांद्वारे देखरेख केली जात आहे. कोरोनारुग्णांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी राज्य शासन व सर्व संबंधित यंत्रणा समन्वयाने काम करीत आहेत.

### आर्थिक निर्बंधातून सूट

कोरोना प्रादुर्भावाचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक खर्चाला तातडीने

मंजुरी देण्यासाठी आर्थिक निर्बंधातून सूट देण्याचा निर्णय सुरुवातीलाच घेण्यात आला आहे. तसेच कोरोनाच्या आनुषंगिक साहित्य खरेदीचे सर्व अधिकार विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे कोरोनाच्या साहित्य खरेदीला कोणताही अडथळा येणार नाही. कोरोनासह आरोग्यासाठी जिल्हा वार्षिक निधीतून (डिपीसी) २५ टक्के निधी खर्च करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आले आहेत.

## आरोग्य विभागातील पदभरती

राज्यातील आरोग्य यंत्रणा भक्कम करण्यासाठी वर्ग एक आणि वर्ग दोन पदांसह एकूण १७ हजार कर्मचाऱ्यांची भरती करण्याचा निर्णय आपण घेतला आहे. यासाठी नियमात शिथिलता आणून प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचा प्रयत्न



आहे. आवश्यकतेनुसार खासगी डॉक्टरांच्या सेवाही अधिग्रहित करण्याचा विचार सुरू आहे. प्रत्येक खासगी डॉक्टरने किमान सात दिवस सेवा शासनाला द्यावी, असा प्रयत्न आहे. राज्याला कोरोनामुक्त करण्यासाठी आवश्यक ते सर्वकाही करण्याचा शासनाचा निर्धार आहे.

## शेतकरी कर्जमुक्ती योजना

महात्मा जोतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत राज्यातील ३२ लाख ९० हजार पात्र शेतकऱ्यांची यादी पोर्टलवर सुरुवातीलाच प्रसिद्ध करण्यात आली होती. या योजनेच्या प्रत्यक्ष लाभालाही सुरुवात झाली होती, मात्र 'कोरोना'च्या संकटामुळे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आचारसंहितेमुळे या प्रक्रियेची गती मंदावली होती. 'कोरोना' संकटाच्या काळात शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी पुन्हा एकदा या योजनेच्या अंमलबजावणीची प्रक्रिया गतिमान करण्यात आली आहे. २० जुलै २०२० पर्यंत राज्यातील २७ लाख ३८ हजार पात्र खातेधारकांच्या खात्यावर १७ हजार ६४६ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. पात्र खातेदारांपैकी ८३ टक्के लाभार्थ्यांना लाभ झाला आहे.

## शेतीपूरक व्यवसायांना सूट

टाळेबंदीच्या सुरुवातीपासूनच शेती आणि शेतीपूरक उद्योगांना काहीअंशी सूट देण्यात आली होती. त्यासाठी कृषी केंद्र सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावरच खते, बी-बियाणे, इतर कृषी निविष्ठांचा पुरवठा कृषी विभागाच्या मार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला, त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेष काळजी घेण्यात आली. भाजीपाला, दूध, अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा कायम सुरळीत ठेवण्यासाठी ठोस पावले उचलण्यात आली. खरीप हंगामात शेतकऱ्यांना वित्तीय पुरवठा करण्यासाठी सर्व बँकांना जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत विशेष बैठका घेऊन सूचना देण्यात आल्या.

## तज्ज्ञ समितींचे गठण

राज्यावरील कोरोना संकटाच्या प्रभावी मुकाबल्यासाठी माझ्या (उपमुख्यमंत्री) अध्यक्षतेखाली मंत्री उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. याचबरोबर अर्थव्यवस्था पुनरुज्जीवनाच्या उपाययोजना सुचवण्यासाठी अकरा तज्ज्ञ सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितींच्या निर्मितीमुळे 'कोरोना' लढ्याला निश्चित दिशा आणि गती प्राप्त झाली आहे.

## 'सामाजिक न्याया'साठी निधी

सामाजिक न्याय विभागासाठी तब्बल १ हजार २७३ कोटी २५ लाख रुपयांचा आगाऊ (ॲडव्हान्स्) निधी तातडीने वितरित करण्यात आला आहे. कोरोनामुळे राज्याच्या उत्पन्नात घट असतानाही दुर्बल, वंचित, उपेक्षित घटकांना दिलासा देण्यासाठी हा निर्णय प्राधान्याने घेण्यात आला.

सामाजिक न्याय विभागातर्फे संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्तिवेतन योजना, केंद्रपुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तिवेतन, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तिवेतन योजना आणि राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना राबवण्यात येतात. या योजनांसाठी अर्थसंकल्पात २

### एसटी बस, श्रमिक रेल्वे आणि वंदे भारत विमानसेवा

'कोराना'च्या काळात परदेशात अडकलेल्या आपल्या राज्यातील नागरिकांना 'वंदे भारत' योजनेंतर्गत ३१३ विमान फेऱ्यांद्वारे जवळपास ४४ हजार ९०१ प्रवाशांना भारतात आणण्यात आले आहे. वंदे भारत अभियान केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालय, विदेश मंत्रालय व केंद्रीय गृह मंत्रालयाच्या समन्वयाने महाराष्ट्र शासनाने यशस्वीरीत्या पार पाडले. लाखो लोकांना त्यांच्या राज्यात सुखरूप जाता यावे यासाठी महाराष्ट्र परिवहन मंडळाच्या बसेसची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. स्थलांतरितांना त्यांच्या राज्यांच्या सीमेपर्यंत किंवा नजिकच्या रेल्वे स्टेशनपर्यंत एसटी बसने सोडण्यात आले. यासाठी शासनाने १०० टक्के निधी उपलब्ध करून दिला. श्रमिक रेल्वेने परराज्यातील लोकांना सुखरूपपणे पोहोचवण्यात आले. यासाठी केंद्राशी सातत्याने संपर्क आणि समन्वय ठेवण्यात आला.

हजार ७२३ कोटी ४९ लाखांची तरतूद केली होती. मात्र, कोरोनामुळे परिस्थिती बदलली आहे. कोरोनामुळे राज्याचे उत्पन्न ठप्प झाले असतानाही वंचित घटकांना याचा फटका बसू नये, त्यांना या कठीण काळात आधार मिळावा यासाठी एप्रिल, मे आणि जून या तीन महिन्यांच्या अनुदानाची तब्बल १ हजार २७३ कोटी २५ लाख रुपयांची रक्कम सामाजिक न्याय विभागाला आगाऊ देण्यात आली. त्याचा लाभ समाजातील गरीब, वंचित, निराधार, विधवा, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांना मिळाला.

## मेगा पोलीस भरती

'कोरोना'सह इतर बाबींचा पोलीस प्रशासनावरचा ताण लक्षात घेऊन पोलीस दलामध्ये विविध पदांवर जवळपास १२ हजार ५३८ पदांची तातडीने मेगा भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील युवक-युवतींना नोकरीची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. ही भरती प्रक्रिया डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येईल. नागपूरजवळील काटोल येथे 'एसआरपीएफ'च्या महिला बटालियनची स्थापना करण्यास मंजुरी देण्यात आली. या निर्णयाची गतीने अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

## दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

टाळेबंदीमुळे राज्यातील दूध उत्पादकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी राज्यभरातून दररोज १० लाख लिटर दुधाची खरेदी २५ रुपये दराने करण्याचा निर्णय सरकारने घेतला. सुरुवातीला दोन एप्रिल व मे या दोन महिन्यांसाठी असलेली योजना आपण जून आणि जुलै या दोन महिन्यांसाठी वाढवली. यासाठी सुमारे २०० कोटी रुपयांची तरतूद केली. खरेदी केलेल्या दुधाची पावडर करण्यात येणार असून यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.



## कापसाची विक्रमी खरेदी

विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील बहुतांश शेतकरी हे कापूस उत्पादक आहेत. या शेतकऱ्यांकडील सुमारे २१९ लाख क्विंटल इतका विक्रमी कापूस जुलैच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत खरेदी करण्यात आला आहे. यातून शेतकऱ्यांच्या खात्यात ४६०० कोटी रुपये जमा करण्यात येत आहेत. यंदाची खरेदी विक्रमी खरेदी असून यातून शेतकऱ्यांना फार मोठा दिलासा देण्याचे काम सरकारने केले आहे. नोंदलेल्या संपूर्ण कापसाची खरेदी केली जाणार असून त्यासाठी सुट्टीच्या दिवशीही खरेदी केंद्रे सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्यातील मका, धान, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी नोंदवलेल्या संपूर्ण उत्पादनांची खरेदी करण्यात येणार आहे.

## कम्युनिटी किचन आणि भोजनालये

'कोरोना'च्या काळात कोणीही व्यक्ती उपाशी राहू नये यासाठी राज्यभर ५ रुपयांत शिवभोजन थाळी विविध केंद्रांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली होती. दररोज या योजनेचा लाभ लाखो नागरिक घेत आहेत. त्याचबरोबर राज्यभर रात्रनिवाऱ्यांचीही उभारणी करण्यात आली. संस्थात्मक अलगीकरणात असणाऱ्या नागरिकांसाठी खासगी कम्युनिटी किचनलाही परवानगी देण्यात आली, त्यामुळे अलगीकरणात असणाऱ्या नागरिकांना दर्जेदार भोजनाची व्यवस्था



उपलब्ध झाली. लाखो परप्रांतीय मजूर, स्थलांतरितांनाही रोजच्या जेवणाची व निवाऱ्याची सोय राज्य शासनाने करून दिली होती. त्याचबरोबर राज्यभरातील प्रत्येक शिधापत्रिकाधारक नागरिकाला राज्य शासनाच्यावतीने गहू, तांदूळ, डाळीच्या वितरणाची व्यवस्था प्रभावीपणे करण्यात आली आहे. या रेशनचे वितरण योग्य प्रकारे आणि जलदगतीने करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांना यामध्ये लक्ष देण्याच्या विशेष सूचना देण्यात आल्या आहेत.

## अर्थचक्राला गती

'कोरोना'मुळे राज्याच्या महसुलावर मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळे राज्याच्या अर्थचक्राला गती देण्यासाठी राज्यात 'मिशन बिगन अगेन' ची सुरुवात करण्यात आली. यानुसार राज्यातील उद्योग पुन्हा सुरू करण्यासाठी त्यांच्यावरील निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत. तसेच राज्याच्या उद्योग विभागाकडून उद्योगांसाठी विविध सवलती देण्यात आल्या आहेत. अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी टप्प्याटप्प्यांचे नियोजन करण्यात आले आहे. 'कोरोना' प्रतिबंधक नियमांचे काटेकोर पालन करूनच शेती, बँकिंग, उद्योग, व्यापाराला परवानगी देण्यात आली आहे.

## 'निसर्ग'बाधितांना मदत

'कोराना' संकट असतानाच राज्यावर 'निसर्ग' चक्रीवादळाचे संकट आदळले. यामध्ये रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पुणे जिल्ह्यातील काही भागांचा समावेश

होता. या चक्रीवादळात बाधित झालेल्या घरांसाठी दीड लाखाची, तर शेतीसाठी हेक्टरी ५० हजारांची मदत देण्यात येणार आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद निधी व राज्य शासनाच्या निधीमधून विशेष निधीची तरतूद करण्यात आली आहे. या मदतीच्या वाटपाचे काम सुरू आहे. प्रत्येक बाधिताला यामधून दिलासा देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

### पुणे जिल्ह्यासाठी विशेष यंत्रणा

मुंबई पाठोपाठ 'कोरोना'बाधितांची संख्या पुणे शहर परिसरात अधिक होती. पुणे शहरातील कोरोना प्रतिबंधक कार्यवाही प्रभावी व गतिमान करण्यासाठी चार वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. 'कोरोना'चाचणी समन्वयासाठी 'टेस्टिंग इन्चार्ज' म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. पुण्यात सहा जुलैपासून रॅपिड अँटिजेन टेस्टला सुरुवात करण्यात आली. ससून रुग्णालयातील 'कोविड-१९' चाचण्यांची क्षमता वाढवण्यासाठी १२ कोटी ४४ लाखांचा निधी देण्यात आला. स्वॅब चाचण्यांसह अँटिजन चाचण्या मिळून रोज सहा ते साडेसहा हजार चाचण्या करण्यात येत आहेत. अँटिजन टेस्ट अत्यंत प्रभावी, फायदेशीर ठरत आहेत. 'कोरोना'ला प्रतिबंध करण्यासाठी लोकांचा सहभाग, स्वयंसेवी संस्था व तज्ज्ञ डॉक्टरांच्या समन्वयाने पुण्यात काम सुरू आहे. शहर व जिल्ह्यात खासगी रुग्णालयांच्या अधिग्रहणाची कारवाई सुरू आहे.

### वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रश्न मार्गी

सातारा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी जलसंपदा विभागाची शहरालगतची ६४ एकर जागा देण्यात यावी. त्या बदल्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यातील ७० एकर शासकीय जमीन जलसंपदा विभागाला हस्तांतरित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यामुळे अनेक वर्षे रखडलेला सातारा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रश्न मार्गी लागला आहे. उपलब्ध आरोग्य यंत्रणेचा उपयोग करून पुढील शैक्षणिक वर्षापासून जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालयाचे कामकाज सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे सातारावासीयांसाठी मोठी आरोग्य यंत्रणा उभी राहणार आहे.

### 'सारथी'ला गती

'कोरोना'च्या संकट काळातही मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासासाठी स्थापन करण्यात आलेली 'सारथी' म्हणजेच 'छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था' कोणत्याही स्थितीत बंद पडू दिली जाणार नाही, संस्थेची स्वायतत्ता संपुष्टात येणार नाही, याची खात्री मराठा समाजाच्या संघटनांच्या प्रतिनिधींना मुंबईतील बैठकीत देण्यात आली.

'सारथी' संस्थेसाठी तातडीने आठ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. सारथी संस्थेच्या पुण्यातील मुख्यालयासाठी शासकीय जागा उपलब्ध करून देण्याच्या सूचना स्थानिक प्रशासनाला करण्यात आल्या आहेत. 'सारथी'बरोबरच 'अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ' या दोन्ही संस्था नियोजन विभागाच्या अखत्यारीत घेण्यात येत आहेत. त्यामुळे दोन्ही संस्थांच्या कामांना गती मिळणार आहे.

महाराष्ट्र कोरोनाशी लढत असताना राज्यातील जनतेचा जीव वाचवणे हे आपले नेहमीच प्राधान्य राहिले आहे, राहणार आहे. राज्याच्या विकासाचा गाडा सुरू राहिला पाहिजे यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. कोरोनामुळे राज्याला आर्थिक, व्यापारी, औद्योगिकदृष्ट्या झळ बसत असली तरी भविष्यात ही झळ भरून काढून महाराष्ट्र पुन्हा एकदा दिमाखाने उभा राहील, त्यासाठी आपल्या सर्वांची एकजूट कायम राहिली पाहिजे आणि ती राहील, असा मला विश्वास आहे.

**शब्दांकन : संजय देशमुख,**
उपमुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी

### जम्बो रुग्णालये



पुणे जिल्ह्यात तीन नवीन जम्बो कोविड रुग्णालयांची उभारणी करण्यात येत आहे. शासन, पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे महानगर प्राधिकरण आदी संस्थांच्या सहकार्यातून ही जम्बो रुग्णालये उभी राहतील. रुग्णसंख्या नियंत्रित ठेवत असतानाच नवीन रुग्णांसाठी आरोग्य सुविधा कमी पडणार नाहीत याची दक्षता घेण्यात येत आहे. खासगी रुग्णालयांतील कोरोना रुग्णांच्या मोठ्या रकमेच्या बिलांची स्वतंत्र लेखा परीक्षकांमार्फत तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. राज्यात कुठेही कोरोना उपचारासाठी निधी कमी पडू न देण्याची काळजी घेण्यात येत आहे.

**कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना सुरू आहेत. कोरोनाच्या रुग्ण संख्येत वाढ होत असली तरी कोरोनामुक्त होणाऱ्या रुग्णांची संख्या त्याहून जास्त आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात बरे झालेल्या रुग्णांची संख्या एक लाखाच्या घरात पोहोचली तर जुलैच्या शेवटच्या आठवड्यात ही संख्या २ लाखांच्या वर गेली. या काळात रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ५६ टक्के होते. हा दिलासा मोठा आश्वासक असा आहे.**

**अजय जाधव**

राज्यात आढळून आलेल्या कोरोना रुग्णांपैकी सुमारे ८० टक्के रुग्णांना लक्षणे नाही तर १५ ते १८ रुग्णांना सौम्य स्वरूपाची लक्षणे आहेत तर पाच ते तीन टक्के रुग्ण गंभीर आहेत. त्यांच्यावर विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

राज्यात २५ जुलैपर्यंत कोरोनाच्या १८ लाख ३६ हजार ९२० चाचण्या झाल्या आहेत. त्यापैकी ३ लाख ६६ हजार ३६८ नमुने पॉझिटिव्ह (१९.९४ टक्के) आले आहेत. राज्याचा मृत्युदरदेखील ३.६५ टक्के एवढा नोंदवण्यात आला आहे. मृत्यूदर कमी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

### दरनिश्चितीमुळे सर्वसामान्यांना दिलासा

कोरोनामुळे सर्वसामान्य रुग्णांना उपचारावरील आर्थिक भार हलका करण्यासाठी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सामान्यांशी निगडित सर्वच बाबींना स्पर्श करीत, त्यावर शासनाने नियंत्रण आणून मनमानी करणारे खासगी रुग्णालये, प्रयोगशाळा, रुग्णवाहिका यांचे दर निश्चित करून दिलासा दिला आहे. कोरोनाच्या काळात प्रतिबंधात्मक उपायांसाठी वापरण्यात येणारे मास्क आणि सॅनिटायजरचा वाढता वापर पाहून त्याच्या किमती सामान्यांच्या आवाक्यात राहण्यासाठी आरोग्यमंत्री श्री. टोपे यांनी समिती नेमली आहे. मास्क आणि सॅनिटायजरचा समावेश जीवनावश्यक वस्तु कायद्यांतर्गत करण्यासाठी केंद्र शासनाकडे मागणी करण्यात येणार असल्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितले.

### त्रिस्तरीय रुग्णालय

राज्यात कोरोना रुग्णांच्या उपचारासाठी त्रिस्तरीय रुग्णालय असून लक्षणांनुसार रुग्णांना या रुग्णालयात दाखल केले जात आहे. रुग्णांवर होणारे उपचार, कोरोना रुग्णालयातील आरोग्य सुविधा यावर देखरेख करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती नेमण्यात आली आहे. ही समिती कोरोना रुग्णालयांना नियमित भेटी देईल. यासंदर्भात आरोग्य विभागाने शासन निर्णय

# करून दाखवले !

### सर्व पॅथी महत्त्वाच्या

राज्यातील कोरोना रुग्णांवर केले जाणारे उपचार हे राज्य टास्क फोर्सने नेमून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार केले जात आहेत. 'आयुष'च्या माध्यमातून प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी राज्य शासनाने समिती नेमली आहे. उपचारामध्ये सर्व पॅथी महत्त्वाच्या असून त्यातील औषधांसाठी सर्वांनी मिळून राज्य शासनाला मार्गदर्शक सूचना तयार करून देण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी आदी पॅथीच्या तज्ज्ञांशी चर्चा केली. कोरोनाच्या संकट काळात आयुर्वेद, युनानी यांचे महत्त्व जगाला पटवून देण्याची संधी असल्याने त्यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञांनी पुढे यावे, असे मुख्यमत्र्यांनी आवाहन केले आहे.



औरंगाबाद येथे रुग्णवाहिनी सेवेचा शुभारंभ करताना ज्येष्ठ नेते खा. शरद पवार, पालकमंत्री तथा उद्योगमंत्री सुभाष देसाई, आरोग्यमंत्री राजेश टोपे, राज्यमंत्री अतुल सावे आदी मान्यवर.

जाहीर करून राज्यातील कोरोना रुग्णालयांमध्ये सीसीटीव्ही बसवावा. उपचार घेत असलेल्या रुग्ण आणि त्यांच्या नातलगांना बोलता येईल यासाठी रुग्णालयात सोय करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ज्या रुग्णालयांमध्ये कोरोना रुग्ण उपचार घेत आहेत अशा ठिकाणी जिल्हा प्रशासनाने सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. रुग्णालयांच्या भेटीदरम्यान समितीला सीसीटीव्ही चित्रीकरण उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. कोरोना रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णाच्या नातेवाईकाला रुग्णालयाच्या आवारात प्रवेश द्यावा व नातलगाला थांबता येईल अशी जागा रुग्णालयात तयार करावी. कोरोना रुग्णालयांनी मदत कक्ष तयार करावा जेथे रुग्णांचे नातेवाईक प्रत्यक्ष येऊन किंवा दूरध्वनीद्वारे उपचार घेत असलेल्या आप्ताची विचारपूस करू शकतील.

## रुग्णालयातील सुविधांसाठी समिती

कोरोनाच्या रुग्णांची काळजी व्यवस्थित घेतली जावी त्यांना मिळणारे उपचार, कोरोनासाठी असलेल्या रुग्णालयांमधील सुविधा यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना महत्त्वाच्या सूचना केल्या. त्यानुसार राज्यात मुंबई वगळता अन्यत्र सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. त्यामध्ये जिल्हा शल्यचिकित्सक सदस्य सचिव आहेत. मुंबई महापालिका क्षेत्रासाठी स्वतंत्र समिती असून महापालिका आयुक्त समितीचे अध्यक्ष तर मुंबई महापालिकेचे कार्यकारी आरोग्य अधिकारी सदस्य सचिव म्हणून काम पाहत आहेत.

## जम्बो सुविधांचा आदर्श

देशातील पहिले मोकळ्या मैदानावरील रुग्णालय उभारून आणि कोरोना उपचारासाठी जम्बो सुविधांचा आदर्श महाराष्ट्राने देशापुढे उभा केला आहे. कोरोना रुग्णांच्या उपचारासाठी सिडकोच्या साहाय्याने मुलुंड येथे, मुंबई मेट्रोच्या सहकार्याने दहिसर येथे, सामाजिक उत्तरदायित्व निधीतून नमन समूहातर्फे महालक्ष्मी रेसकोर्स येथे आणि बीकेसी येथील १२० खाटांचे आयसीयू अशा ३ हजार ५२० बेड्‌सच्या जम्बो सुविधांचा लोकार्पण सोहळाही नुकताच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला.

मुंबईत केलेल्या जम्बो सुविधा आणि केलेल्या उपाययोजनांमुळे धारावीसारख्या दाट लोकवस्तीमधील संसर्गाचे प्रमाण आटोक्यात आणण्यात प्रशासनाला यश येत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. धारावी पॅटर्नची दखल जागतिक आरोग्य संघटनेने घेऊन कौतुक केले. कोरोनासाठी करत असलेल्या महाराष्ट्राच्या उपाययोजनांची जागतिक पातळीवर दखल घेतली जाते, ही नक्कीच गौरवास्पद बाब आहे.

## प्लाझ्मा बँक



कोरोनाचा प्रभाव मुंबईत काही प्रमाणात होत असताना राज्याच्या अन्य भागात प्रादुर्भाव जाणवू लागल्याने आरोग्यमंत्री श्री. टोपे यांनी पुणे, सोलापूर, नाशिक, औरंगाबाद, जालना या जिल्ह्यांचा दौरा करून स्थानिक यंत्रणांना गतिमान केले. मुंबईतील धारावी येथे प्लाझ्मा बँक सुरू करण्याचा निर्णय घेतला. धारावीसारखीच पार्श्वभूमी कोरोना संसर्गाची मालेगावात असू शकते, ही बाब लक्षात घेऊन नाशिक जिल्ह्यात प्लाझ्मा डोनेशनसाठी बँक सुरू करण्याचा निर्णय विचाराधीन आहे. आयसीएमआरच्या परवानग्या घेऊन ती सुरू करण्याबाबत जिल्हा प्रशासनामार्फत पुढील कार्यवाही केली जाईल. तसेच जिल्ह्यातील खासगी व सरकारी रुग्णालयांमध्ये उपलब्ध बेड आणि रुग्णालयाच्या माहितीसाठी टेलीहेल्पलाईन तत्काळ सुरू करण्याच्या सूचना आरोग्यमंत्र्यांनी नाशिक जिल्ह्याच्या दौऱ्यात केल्या.

## खासगी रुग्णालयांमध्ये लेखापाल

खासगी रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर अवाच्यासवा बिले आकारत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने प्रत्येक रुग्णालयात सरकारी लेखापालांची नियुक्ती करून त्यांनी बिल तपासल्यानंतरच व ते योग्य असल्याचे आढळून आल्यावरच रुग्णाला बिल रुग्णालय प्रशासनामार्फत देण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

## मातामृत्यू रोखण्यात यश

कोरोनाचा प्रादुर्भाव जाणवत असताना राज्यासाठी सुखावणारी वार्ता सॅम्पल रजिस्ट्रेशन सिस्टिम (एसआरएस)च्या अहवालातून समोर आली असून मातामृत्यू दर कमी असणाऱ्या राज्यांच्या यादीत या वेळेसही महाराष्ट्राने दुसरा क्रमांक मिळवत सातत्य राखले आहे. राज्यात आरोग्य विभागामार्फत मातामृत्यू रोखण्यासाठी सुरू असलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे महाराष्ट्राने हे यश मिळवले आहे.

कोरोनामुळे आपल्या जीवनशैलीशी निगडित अनेक बदल करणे क्रमप्राप्त आहे. कोरोनाबरोबर जगायला शिकणे म्हणजे नेमके काय करणे असा प्रश्न अनेकांना पडतो. आजच्या घडीला या आजारावर औषध नाही की प्रतिबंधासाठी लसही नाही. लॉकडाऊन किती काळ करायचे याला मर्यादा आहेत. अशा परिस्थितीत कोरोनासोबत जगताना सर्वांनीच सोशल डिस्टन्सिंग, मास्क वापरणे, वारंवार हात धुणे या सवयी लावून घ्यायला हव्यात. उद्योगधंदे, व्यवसायाची जागा, शाळा, महाविद्यालये, क्लासेस, मॉल्स अशी विविध ठिकाणे पुन्हा सुरू करायची आहेत तर त्यासाठी केवळ कोरोनापुरती उपाययोजना न पाहता भविष्यकालीन कायमस्वरूपी उपाययोजना होणे गरजेचे आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**



शिवभोजन थाळीचा लाभ घेणाऱ्या नागरिकाशी संवाद साधताना अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग लॉकडाऊनमध्ये आणि 'मिशन बिगिन अगेन'मध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत आहे. लॉकडाऊननंतर १.१५ कोटी गरजूंनी शिवभोजनाचा लाभ घेतला. सर्वसामान्यांची गरज लक्षात घेऊन शिवभोजनच्या वेळेत सकाळी ११ ते ३ अशी वाढ करण्यात आली. मोठ्या प्रमाणावर गरजूंना धान्य वाटप केले गेले. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत सुरू राहण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या.

# स्वस्त धान्य, स्वस्त भोजन

**दत्तात्रय कोकरे**

राज्यातील गरजू व्यक्तीपर्यंत अन्नधान्य पोहोचवण्याचे काम अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. जून महिन्यात ३० लाख ९६ हजार २३२ शिवभोजन थाळ्यांचे वाटप तर ७२ लाख ९३ हजार ९०५ क्विंटल (राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना, एपीएल शेतकरी योजना, एपीएल केशरी आणि प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना) अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे. १ जुलै ते २७ जुलैपर्यंत ४१ लाख ७६ हजार ४५० क्विंटल अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे. १ जुलै ते २७ जुलैपर्यंत ८७६ शिवभोजन केंद्रातून पाच रूपये प्रतिथाळी याप्रमाणे २६ लाख ९ हजार १६४ शिवभोजन थाळ्यांचे वाटप करण्यात आले.



## केशरी कार्डधारकांना धान्य

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत समाविष्ट होऊ न शकलेल्या ३ कोटी ८ लाख एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना मे व जून २०२० या दोन महिन्यांच्या कालावधीकरिता गहू ८ रुपये प्रति किलो व तांदूळ १२ रुपये प्रतिकिलो या दराने प्रतिमाह प्रतिव्यक्ती ३ किलो गहू व २ दोन किलो तांदूळ या प्रमाणे ५ किलो अन्नधान्य देण्यात आले.

केंद्र शासनाकडून २१ रुपये किलो दराने गहू व २२ रुपये किलोप्रमाणे तांदूळ खरेदी करून केसरी कार्डधारकांना अल्प दरात धान्याचे वितरण करण्यात येत आहे. या योजनेला दोन महिने मुदतवाढ देण्यात आलेली असून जुलै व ऑगस्टमध्येसुद्धा केशरी कार्डधारकांना अल्पदरात धान्याचे वितरण सुरू आहे.

## शिवभोजन थाळी योजना

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील गोरगरीब, शेतकरी, मजूर व विद्यार्थी वर्ग उपाशी राहू नये यासाठी शासनाने केवळ पाच रुपयांमध्ये नागरिकांना जेवण देण्याचा निर्णय मार्चमध्ये घेतला होता. हा सवलतीचा दर जूनपर्यंत होता. मात्र अजूनही नागरिकांच्या हाताला काम नसल्याने कोणाचीही उपासमार होऊ नये या उद्देशाने सवलतीचा दर सप्टेंबरपर्यंत वाढवण्यात आला.

कष्टकरी, असंघटित कामगार, स्थलांतरित, बाहेरगावचे विद्यार्थी, रस्त्यावरील बेघर इत्यादी नागरिकांच्या हाल-अपेष्टा होत असल्याने शिवभोजन थाळी योजनेचा विस्तार एप्रिलपासून तालुकास्तरावर करण्यात आला. प्रत्येक जिल्ह्यात देण्यात आलेल्या शिवभोजन थाळीच्या संख्येत पाचपट वाढ करण्यात आली. शिवभोजनच्या वेळेत वाढ करण्यात आली असून सकाळी ११ ते ३ या वेळेत भोजन उपलब्ध करून देण्यात येत आहे. शहरी भागासाठी प्रतिथाळी ४५ रुपये आणि ग्रामीण भागासाठी प्रतिथाळी ३० रुपये एवढे अनुदान केंद्र चालकास देण्यात येत आहे.

गरीब व गरजूंना एप्रिल महिन्यात २४,९९,२५७, मे महिन्यात ३३,८४,०४०, जून महिन्यात ३०,९६,२३२, जुलैमध्ये (२७ जुलैपर्यंत) २६ लाख ९ हजार १६४ असे १ एप्रिल ते २७ जुलै या कालावधीत एकूण १ कोटी १५ लाख ८८ हजार ६९३ गरीब व गरजू लोकांनी शिवभोजनाचा लाभ घेतला.

## साठेबाजीवर नियंत्रण

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील ५२ हजार ४२४ रास्तभाव दुकानांमध्ये मार्चपासून ई-पासद्वारे लाभार्थी प्रमाणीकरणास सूट देण्यात आली आहे. साठेबाजार व काळाबाजार रोखण्यासाठी भरारी पथके तयार करण्यात आली आहेत. लॉकडाऊनमध्ये जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत सुरू राहण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या वाहनांना लॉकडाऊनमधून सूट देण्यात आली.

## गरीब कल्याण अन्न योजना

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या पात्र ७ कोटी लाभार्थ्यांना एप्रिल, मे व जून या तीन महिन्यांच्या कालावधीत प्रति व्यक्ती ५ किलो मोफत तांदूळ वाटप तसेच प्रतिकुटुंब १ किलो तूरडाळ किंवा चणाडाळ या दोन्हींपैकी एक डाळ प्रतिमाह वाटप करण्यात आले आहे. जुलै ते नोव्हेंबर २०२० या कालावधीत या योजनेंतर्गत प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्य (२ किलो गहू, ३ किलो तांदूळ किंवा ३ किलो गहू, २ किलो तांदूळ) व प्रतिकुटुंब १ किलो चणा/ चणाडाळ वितरित करण्यात येणार आहे.

## संस्थांना सवलतीत धान्य

सध्या अनेक स्वयंसेवी संस्था गरजू लोकांना अन्नधान्य वितरण करीत आहेत. त्यांना ओएमएसएस (ओपन मार्केट सेल स्किम) अंतर्गत भारतीय खाद्य निगममधून २१ रुपये प्रतिकिलो गहू व २२ रुपये प्रतिकिलो तांदूळ उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## विकेंद्रित खरेदी योजना

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेद्वारे रब्बी हंगामातील ज्वारी व मका या भरड धान्याची हमी भावामध्ये खरेदी करण्यात आली. या योजनेचे उद्दिष्ट २.५० लाख क्विंटलवरून ९ लाख क्विंटल मुदतवाढ १५ जुलैपर्यंत करण्यात आली. त्यानुसार शेतकऱ्यांचा संपूर्ण मका खरेदी करण्यात आला. याशिवाय या योजनेखाली रब्बी पणन हंगामात गहू या पिकासाठी राज्यात प्रथमच विकेंद्रित खरेदी योजना लागू करण्यात आली.

विभागीय संपर्क अधिकारी



**आपले राज्य, देश नव्हे तर संपूर्ण जगाचे लक्ष लागलेल्या धारावी परिसरात कोरोनाविरुद्धच्या सुरू असलेल्या युद्धात धारावीकरांची सरशी झाल्याने दिलासा मिळाला. कोरोनाची साखळी तोडण्यासाठी धारावी पॅटर्न समोर आला. धारावीत कोरोना नियंत्रणासाठी शासन–प्रशासन आणि जनता या तीन घटकांच्या प्रयत्नांना पोलिसांची भक्कम आणि समर्थ साथ मिळाली.**



धारावी कोरोनाबाधित क्षेत्रात जाऊन प्रत्यक्ष नागरिकांशी संवाद साधताना गृहमंत्री अनिल देशमुख व पोलीस अधिकारी.

# पोलिसांचा 'धारावी पॅटर्न'

**डॉ. राजू पाटोदकर**

धारावी कोरोना मुक्ती मोहिमेत पोलीस विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जी मौलिक कामगिरी केली, त्याचा आपल्याला अभिमान आहे. अशा शब्दात गृहमंत्री अनिल देशमुख यांनी पोलीस यंत्रणेचे कौतुक केले. गृहमंत्री या नात्याने राज्यातील केवळ सव्वा दोन लाख पोलीस यंत्रणेचाच नव्हे तर त्यांच्या कुटुंबीयांचादेखील कुटुंबप्रमुख आहे. त्यामुळे या सर्वांच्या रक्षणाची जबाबदारी माझी आहे, असे गृहमंत्री अनिल देशमुख मानतात.

धारावीमध्ये २४ मार्चला पहिली कोरोनाबाधित व्यक्ती आढळून आली. तद्‌नंतर कोरोनाबाधित व्यक्तींचा आकडा दररोज वाढत गेला. एके दिवशी ७५ व्यक्ती कोरोनाबाधित आढळून आले. सरासरी दिवसात ३०च्या संख्येने कोरोनाबाधित असे प्रमाण होते. जून महिन्यामध्ये कोरोनाबाधितांची संख्या कमी होऊ लागली ती केवळ दोन झाली.

## जनजागृती

धारावीत सुरुवातीपासून पोलीस यंत्रणेने विविध माध्यमातून नागरिकांना जागृत केले. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यात यश मिळवले. त्यामुळे त्यांचा मोठा फायदा झाला. या परिसरात कोरोनाचा शिरकाव झाल्यापासून लगेच पोलीस यंत्रणा सतर्क झाली. अत्यंत दाट लोकवस्ती, अरुंद गल्ल्या, यातून केवळ एका वेळी एकच व्यक्ती जाऊ शकते अशी परिस्थिती, त्यामुळे सोशल डिस्टन्सिंग पाळणे अत्यंत कठीण. त्यावर नियंत्रण करण्यासाठी पोलिसांनी विविध माध्यमांद्वारे जनजागृती सुरू केली. ध्वनिक्षेपकद्वारे माहिती देण्यात आली, ड्रोनचा उपयोग करून त्यावरील ध्वनिक्षेपकद्वारे लोकांना माहिती देऊन जागृती करण्यात आली. या ड्रोनमुळे जवळपास चार किलोमीटरचा परिसर कव्हर होत होता. काही प्रसंगी नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून, त्यांना कोरोनाचे दुष्परिणाम समजावून सांगण्यात आले. कोरोनाबद्दल काय दक्षता घ्यावी, याची ऑडिओ क्लिप बनवून तिचे प्रसारण व्हॉट्सॲप ग्रुपद्वारे करण्यात आले. सामाजिक सुरक्षा अंतर राखून मीटिंग घेऊन त्याद्वारे, तसेच मंदिर, मशीद यातील ध्वनिक्षेपकाद्वारे लोकांपर्यंत क्लिप पोहोचवण्यात आली. अरुंद गल्ल्यातून पायी गस्त घालून लोकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

## दैनंदिन गरजांची पूर्तता

कोरोना जनजागृतीनंतर लोकांच्या दैनंदिन गरजांची पूर्तता करणे हे मोठे आव्हान होते. त्या कामी पोलीस विभागाने मोठी मदत केली. दुकानदारांना सोशल डिस्टन्सिंगचे महत्त्व पटवून दिले.

त्यानुसारच लोकांना त्यांनी किराणा, भाजीपाला द्यावा अशा सूचना दिल्या, भाजीपाला मटन, चिकन यांची दुकाने मोकळ्या जागी हलवली. याचा फायदा निश्चित झाला. धारावीतील पंचवीस-तीस खानावळवाल्यांनी घरपोच सेवा देण्याची व्यवस्था करण्याची सूचना करण्यात आली. या परिसरात सामाजिक संस्थांच्या माध्यमातून दररोज २५ ते ३० हजार लोकांना दोन वेळेस मोफत जेवणाची व्यवस्था करण्यात आली. धारावी परिसरात मोठ्या प्रमाणात बिहारी नागरिक व्यवसायानिमित्त राहतात, त्यांना बिहारी जनता असोसिएशनमार्फत मदत करण्यात आली. पोलिसांनी धारावीच्या विविध भागातील प्रत्येकी २ स्वयंसेवकांना कोरोनाबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले व त्यांच्यामार्फत या भागात गर्दीवर नियंत्रण ठेवण्यात व लोकांमध्ये जनजागृती करण्यात यश मिळाले.

## मास्क व सॅनिटायझरचे मोफत वाटप

धारावी परिसरातील गोरगरीब लोकांसाठी सामाजिक संस्थांच्या मदतीतून २ लाख मास्क व १ लाख सॅनिटायझरचे वाटप करण्यात आले. ५ लाख रेडी मिक्स फूड पाकिटांचे वाटप करण्यात आले.

## नवा संदेश

आरोग्य यंत्रणा, डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, सफाई कामगार, या भागातील खासदार, आमदार, राज्य प्रशासन, महानगरपालिका, तसेच अन्य लोकप्रतिनिधी यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. या सर्व घटकांच्या सामूहिक प्रयत्नास धारावीतील जनतेने मौलिक साथ दिली. संपूर्ण जगाचे लक्ष धारावीकडे लागले होते. धारावीने कोरोनावर मात करून नवा संदेश जगाला दिला.

## परप्रांतीय कामगार

धारावी भागात राजस्थान, झारखंड, बिहार, ओरिसा, पश्चिम बंगाल या राज्यातील बरेच कामगार राहतात. या काळात त्यांना त्यांच्या राज्यात पाठवण्याची जबाबदारी पोलीस विभागावर होती. या भागातील ६१,४१५ कामगार श्रमिक रेल्वेने व १२,४९५ कामगार एस.टी.बसने त्यांच्या त्यांच्या राज्यात पाठवण्यात आले.

## रुट मार्च व कोंम्बिंग ऑपरेशन

लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये तीन एस.आर.पी.एफ प्लाटून, एक सी.आर.पी.एफ कंपनी व सशस्त्र पोलीस दलातील १०० पोलीस अंमलदार व धारावी पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांच्यासह एकूण ३८ वेळा रुट मार्च व २८ वेळा कोंम्बिंग ऑपरेशनचे आयोजन करण्यात आले.

या सर्व कालावधीत धारावीत ४० पोलीस कर्मचारी व १० एस.आर.पी.एफ. जवान यांना कोरोनाची लागण झाली. त्यावर मात करून हे कर्मचारी पुन्हा आपल्या कर्तव्यावर रूजू झाले. ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. मुंबई पोलीस आयुक्त, सहआयुक्त, उपायुक्त, सहायक आयुक्त अशा सर्व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात धारावी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश नांगरे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली.

## गणेशोत्सवातील दक्षता

कोरोनाविरुद्धच्या युद्धात मिळत असलेले यश आणि दृष्टिक्षेपातील विजय यावर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून पुढील काळातील सण, उत्सवात मोठ्या प्रमाणात दक्षता घेणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने गृहविभागाने गणेशोत्सव तसेच बकरी ईद यासंदर्भात मार्गदर्शक सूचनाही निर्गमित केल्या आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक व शास्त्रोक्त पद्धतीने गणेशोत्सव साजरा करावा लागेल. गणेशोत्सवाचे दहा दिवस त्यानंतर विसर्जनाच्या वेळेस गर्दी होऊ नये याकरिता दक्षता घेण्यात आल्या आहेत. अशाच प्रकारची यंत्रणा राज्यात सर्वत्र कमी-जास्त प्रमाणात पोलीस विभागामार्फत राबवण्यात येत आहे.



**कोरोनाबाधित धारावी क्षेत्रात जनजागृती करणारे आणि माणूसकीचे दर्शन घडवणारे पोलीस.**

**विभागीय संपर्क अधिकारी, गृह विभाग**

**कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाचा उद्योगांना मोठा फटका बसला. मात्र उद्योग विभागाने तातडीने महत्त्वाचे निर्णय घेऊन उद्योगांना पुन्हा उभारी घेण्यासाठी साहाय्य केले आहे. याचाच परिणाम म्हणून ६५ हजार उद्योगांना आपले उत्पादन पुन्हा सुरू करता आले.**




# उद्योगांना चालना

**अर्चना शंभरकर**

कोरोना संकटाने जगातील प्रत्येक रोजचे जगणे बदलून टाकले आहे. त्याला व्यापार, उद्योग, दैनंदिन व्यवहार अपवाद नाहीत. अशा परिस्थितीत उद्योगांना शासनाने मदतीचा हात दिला आहे. उद्योग विभागाने मे-जूनपर्यंत सुमारे ६५ हजार उद्योगांना उत्पादन सुरू करण्यास परवाने दिले. या कारखान्यांमध्ये सोळा लाख कामगार रुजू झाले. उद्योगांचे व्यवस्थापन त्यांची नियमाप्रमाणे काळजी घेत आहे. कामगारांना हॅण्ड सॅनिटायझर आणि मास्क पुरवणे, त्यांची आरोग्य चाचणी घेणे, सामाजिक अंतर ठेवणे या बाबी पाळल्या जात आहेत. ज्यांना शक्य झाले त्यांनी कामगारांना कारखान्याजवळ राहण्याची सोय करून दिली. कामगारवर्ग जोमाने

## महाजॉब्स पोर्टल

राज्यातील बेरोजगार तरुणांना विविध कौशल्यांच्या साहाय्याने रोजगार शोधता यावा आणि कामगारांची कमतरता या समस्येवर मात करून उद्योगांना आपले कार्य सुरळीतपणे पार पाडता यावे या उद्देशाने 'महाजॉब्स' पोर्टल तयार केले गेले आहे. नोकरी शोधणाऱ्या कामगारांना आणि उद्योजकांना सेवा प्रदान करण्याचा याद्वारे सातत्याने प्रयत्न होत आहे.

एका महिन्याच्या कालावधीतच नोकरी शोधणाऱ्या २ लाख ४९ हजार ८४३ लोकांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी १ लाख ५९२ लोकांनी आपली कागदपत्रे पडताळून प्रोफाईल पूर्ण केला आहे. नोकरी देणाऱ्या २००२ उद्योजकांनी आतापर्यंत नोंदणी केली. ११८ उद्योजकांनी कामगारांसाठी मागणी नोंदवली आहे. २ हजार ६१२ जागांसाठी आतापर्यंत ३ हजार ६७१ लोकांनी अर्ज केले आहेत.

**उद्दिष्टे :** ■ नोकरी शोधणारे कामगार आणि उद्योजक यांच्यामधील दुवा.
■ निरनिराळ्या कौशल्यसंचात मनुष्यबळाची मागणी व पुरवठा यांच्यातील दरी कमी करणे. ■ उद्योगांना अखंडपणे कार्य करण्यास सक्षम करणे.
■ महाराष्ट्रातील उद्योगांना योग्य स्थानिक कामगार मिळण्यासाठी कुशल मनुष्यबळासाठी कायमस्वरूपी यंत्रणा निर्माण करणे.

कामाला लागला आहे. उद्यमशील महाराष्ट्र पुन्हा नवी झेप घेत आहे.

## सामंजस्य करार

उद्योग विभागाने मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० (भाग दोन)चा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत केला. यानिमित्त देश-विदेशातील १२ गुंतवणूकदारांसोबत सुमारे १६ हजार ३० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये अमेरिका, चीन, दक्षिण कोरिया, सिंगापूर आदी देशांचा समावेश आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

## उद्योगांसाठी जमीन राखीव

नवीन उद्योगांसाठी राज्यात सुमारे ४० हजार हेक्टर जमीन राखीव ठेवण्यात आली आहे. या ठिकाणी वीज, पाणी, रस्ते आदी सुविधा सज्ज ठेवल्या आहेत.

गेल्या महिनाभरात झूम, स्काईप व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे ३० वेबिनार घेण्यात आले. विविध क्षेत्रातील जाणकारांसोबत चर्चा करण्यात आली. देश-विदेशातील गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. प्रत्येक मोठ्या गुंतवणूकदारासाठी एक अधिकारी उद्योगमित्र म्हणून स्वतंत्रपणे नियुक्त करण्यात आला. गुंतवणूकदाराचे उत्पादन सुरू होईपर्यंत त्याला सर्व टप्प्यांवर हा मित्र साहाय्य करणार आहे. उद्योगाने जमीन आरक्षित केली की, महा-परवाना देऊन अन्य सर्व परवानग्या उत्पादन सुरू झाल्यानंतर देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## शुल्क आकारणीस मुदतवाढ

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे आकारण्यात येत असलेल्या विविध शुल्क आकारणीस मुदतवाढ देण्याचा निर्णय महामंडळाचे अध्यक्ष तथा उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी घेतला आहे. एमआयडीसी सेवा देत असलेल्या उद्योगांकडून प्रिमियम रक्कम, हस्तांतर शुल्क, अतिरिक्त प्रिमियम, पोटभाडे शुल्क आकारले जाते. लॉकडाऊनमुळे उद्योगांना हे शुल्क भरणे शक्य झाले नाही. अशा उद्योगांना ही रक्कम भरण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली. लॉकडाऊनच्या कालावधीत ज्यांना रक्कम भरणे शक्य झाले नाही, त्यांच्याकडून विलंबशुल्क वसूल केले जाणार नाही.

ज्या भूखंडाचा विकास कालावधी, वाढीव विकास कालावधी लॉकडाऊनच्या कालावधीत संपलेला आहे, अशांना सवलत मिळणार आहे. यासंबंधीचा कालावधी वाढवण्याचा अधिकार संबंधित प्रादेशिक अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.

## उद्योग विभागाचे महत्त्वाचे निर्णय

- राज्यातील ६५ हजार उद्योगांना परवानगी, १६ लाख कामगार कामावर रुजू
- परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन, १८ हजार कोटींचे गुंतवणूक करार
- नवीन उद्योग सुरू करण्यासाठी महापरवाना पद्धत सुरू
- माणगाव येथे एमआयडीसीला मंजुरी, अद्ययावत फार्मा पार्क सुरू होणार
- महाजॉब्स पोर्टल सुरू
- एमआयडीसीच्या विविध शुल्क वसुलीस सहा महिन्यांची मुदतवाढ
- अन्नप्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन
- औरंगाबाद जिल्ह्यात एमआयडीसीच्या वतीने २५० खाटांचे कोरोना रुग्णालय सुरू
- उद्योगांसाठी एमआयडीसीची प्लग ॲण्ड प्ले सुविधा, तयार गाळे उपलब्ध
- उद्योगांसाठी ४० हजार एकर जमीन राखीव.

## तळेगावमध्ये इलेक्ट्रॉनिक पार्क

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) ५८ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथे २५० एकरावर स्वयंपूर्ण असे इलेक्ट्रॉनिक पार्क सुरू करण्याची घोषणा करण्यात आली.

**विभागीय संपर्क अधिकारी**

## नवी झेप

''महाराष्ट्र हे देशातील प्रमुख कापूस उत्पादक राज्य आहे. आपला कापूस चांगल्या दर्जामुळे परदेशात किंवा शेजारील राज्यांमध्ये लगेच खपतो. त्याचे मूल्यवर्धन राज्यातच व्हावे म्हणून मी पाच वर्षांपूर्वी फार्म ते फायबर, फायबर ते फेब्रिक व फेब्रिक ते फॅशन अशी साखळी उभारायची कल्पना मांडली. भिवंडी-मालेगाव-इचलकरंजी यांनी कौशल्याची ग्वाही दिली आहे. विदर्भ आणि मराठवाड्याच्या - उत्तर महाराष्ट्राच्या कापूस उत्पादक पट्ट्यात वस्त्रोद्योग उद्याने विकसित करण्याची कल्पना शासनाने स्वीकारली. त्याबरहुकूम अमरावतीजवळ नांदगावपेठ येथे टेक्स्टाइल पार्क एमआयडीसीने उभारले. त्यानंतर रेमंड, सियाराम, पोदार यांसारख्या ब्रँडेड कंपन्यांनी ते व्यापून टाकले.



**सुभाष देसाई**
उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री

कोरोनामुळे चादरी, पडदे, उशांची कव्हरे, टॉवेल्स, हातमोजे, रुग्णांचे कपडे यांची मागणी जगातून वाढू लागली आहे. महाराष्ट्रालाही संधी सोडून चालणार नाही. मागील दोन वर्षात अनुभवलेल्या आर्थिक मंदी पाठोपाठ कोविड-१९चा जबरदस्त धक्का उद्योग व्यापाराला बसला आहे, त्यातून सावरावे लागेल, नव्हे नवी झेप घेण्यास सज्ज व्हावे लागेल, म्हणून शासनाने नियोजन केले आहे. ४०,००० हेक्टर्स जमीन, वीज, पाणी, रस्ते आदी सुविधांसह तयार ठेवली आहे. देशांतर्गत व परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी पावले उचलली आहेत. उद्योगाने जमीन आरक्षित केली की, 'महा-परवाना' देऊन अन्य सर्व परवानग्या उत्पादन सुरू झाल्यानंतर देण्याचे नियोजन आहे.''

# सुवर्णसंधी

**कोरोनामुळे जगभर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. टाळेबंदीच्या काळात स्थलांतरित कामगार आपापल्या गावी परतल्याने उद्योजकांसमोर कामगार भरतीचा प्रश्न निर्माण झाला. राज्यातील बेरोजगार तरुणांना यामुळे नवी संधी मिळाली आहे. ही बाब लक्षात घेऊन शासनामार्फत रोजगार इच्छुक आणि उद्योजक यांच्यात समन्वय साधण्यात येत आहे. औद्योगिक आणि आर्थिक चक्राला गती देण्यासाठी कामगारांना काम आणि उद्योजकांना कामगार मिळवून देण्यासाठी विशेष उपक्रम राबवले जात आहेत.**

कोरोना काळात लक्षावधी स्थलांतरित कामगार त्यांच्या राज्यात गेले. उद्योगांना मनुष्यबळाची अडचण निर्माण झाली, यामुळे स्थानिक तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध झाली. उद्योगांना लागणारे मनुष्यबळ पुरवण्यासाठी उद्योग विभागाने पुढाकार घेऊन औद्योगिक कामगार विनिमय यंत्रणा उभारायचा निर्णय घेतला. यासाठी 'महाजॉब्स' नावाचे वेबपोर्टल तयार करण्यात आले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उद्योगमंत्री सुभाष देसाई, कामगार मंत्री दिलीप वळसे-पाटील, कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक यांच्या उपस्थितीत 'महाजॉब्स' पोर्टलचे उद्घाटन करण्यात आले. पोर्टल सुरू होताच पहिल्या २४ तासांत राज्यातील एक लाखांहून अधिक नोकरी करण्यास इच्छुक असलेल्यांनी पोर्टलवर नोंदणी केली. या पोर्टलवर नोकऱ्या मागणारे व नोकऱ्या देणारे यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न उद्योग विभागाने केला आहे. या पोर्टलद्वारे अकुशल-अर्धकुशल आणि कुशल कामगारांची वर्गवारीनुसार नोंदणी केली जात आहे. अकुशल तरुणांना कौशल्य शिकवणारे अभ्यासक्रम देण्याची तयारी करण्यात आली आहे. कंपनीच्या गरजेप्रमाणे कामगार पुरवठा करणारी महाजॉब्स ही देशातील पहिलीच योजना आहे.

'महाजॉब्स' उद्योग विभाग, कामगार विभाग आणि कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग यांचा, रोजगार शोधणाऱ्यांना उद्योजकांशी जोडण्यासाठीचा संयुक्त उपक्रम आहे.

कोरोना हे केवळ आरोग्य संकट नव्हे तर आर्थिक संकट म्हणून जागतिक पातळीवर ओळखले गेले. या विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे आर्थिक मंदी निर्माण झाली आहे. भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या १५ टक्के वाटा उचलणाऱ्या




### नोकरी इच्छुकांना आवाहन

कोरोना काळात रोजगार उपलब्धतेसाठी कामगार विभागामार्फत मोहीम पातळीवर काम करण्यात येत आहे. इच्छुक तरुण https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर नोंदणी करू शकतात. आधी नोंदणी केलेल्या उमेदवारांनी आपली माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. कुशल उमेदवारांच्या शोधात असलेले उद्योजक, कॉर्पोरेटस् या वेबपोर्टलवर नोंदणी करू शकतात.

देशातील सर्वाधिक उद्योग असणाऱ्या महाराष्ट्राला उद्योगप्रक्रिया सातत्याने सुलभ व उद्योगप्रेमी ठेवण्याची गरज आहे. सध्याच्या संकटाला उत्तर देताना उद्योगाच्या मनुष्यबळाच्या गरजा भागवणे आवश्यक आहे. कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन उद्योगाच्या दृष्टिकोनातून राज्याचे आर्थिक पुनरुज्जीवन करणे हे महाजॉब्सचे लक्ष्य आहे.

## बेरोजगारांना रोजगार

कोरोनाच्या संकटामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण झाली आहे. पण असे असतानाही मागील ३ महिन्यांत कौशल्य विकास विभागाने जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये आयोजित केलेले ऑनलाइन रोजगार मेळावे आणि महास्वयंम वेबपोर्टलमार्फत तब्बल १७ हजार ७१५ बेरोजगारांना रोजगार मिळवून दिला आहे. मागील ३ महिन्यांत कौशल्य विकास विभागाच्या विविध व्यासपीठांवर १ लाख ७२ हजार १६५ बेरोजगारांनी रोजगारासाठी नोंदणी केली असून या सर्व उमेदवारांना नोकरी मिळवून देण्यासाठी विभाग प्रयत्न करीत आहे, अशी माहिती कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक यांनी दिली.

मागील तीन महिन्यात एप्रिल ते जूनअखेर या वेबपोर्टलवर मुंबई विभागात २४ हजार ५२०, नाशिक विभागात ३० हजार १४५, पुणे विभागात ३७ हजार ५६२, औरंगाबाद विभागात ३५ हजार २४३, अमरावती विभागात १४ हजार २६० तर नागपूर विभागात ३० हजार ४३५ इतक्या नोकरी इच्छूक उमेदवारांनी नोंदणी केली. यापैकी १७ हजार १३३ उमेदवारांना नोकरी मिळवण्यात यश आले असून यात मुंबई विभागातील ३ हजार ७२०, नाशिक विभागातील ४८२, पुणे विभागातील १० हजार ३१७, औरंगाबाद विभागातील १ हजार ५६९, अमरावती विभागातील १ हजार ०२२ तर नागपूर विभागातील २३ उमेदवारांचा सहभाग आहे. याशिवाय महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीने त्यांच्या उपक्रमातून ५८२ उमेदवारांना रोजगार मिळवून दिला आहे.

## स्टार्टअप्सना शासनाची कामे

तरुणांच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना वाव देण्यासाठी कौशल्य विकास विभागामार्फत स्टार्टअप योजना राबवण्यात येत आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीतर्फे आयोजित स्पर्धेत देशभरातील १ हजार ६०० स्टार्टअप्सनी सहभाग घेतला. त्यातील उत्कृष्ट १०० स्टार्टअप्सची घोषणा कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक यांनी केली. तरुणांनी वैशिष्ट्यपूर्ण कल्पकता दाखवत कृषी, शिक्षण, कौशल्य विकास, आरोग्य, स्वच्छ ऊर्जा, जलव्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, प्रशासन आदी विविध क्षेत्रात अभिनव बदल घडवू शकणारे स्टार्टअप सादर केले असल्याचे त्यांनी सांगितले. या कल्पनांचा वापर शासनाच्या विविध विभागांमधील कामकाजासाठी करण्यात येणार आहे.

## ऑनलाइन मेळाव्याला प्रतिसाद

कौशल्य विकास विभागाने मागील तीन महिन्यात ऑनलाइन रोजगार मेळाव्यांची मोहीम सुरू केली. प्रत्येक जिल्हास्तरावर ऑनलाइन रोजगार मेळावे घेण्यात येत आहेत. असे २४ ऑनलाइन रोजगार मेळावे झाले असून उर्वरित जिल्ह्यांमध्ये लवकरच मेळावे होणार आहेत. झालेल्या मेळाव्यांमध्ये १६७ उद्योजकांनी सहभाग घेतला. त्यांच्याकडील १६ हजार ११७ जागांसाठी त्यांनी ऑनलाइन मुलाखती घेतल्या. या मेळाव्यांमध्ये ४० हजार २२९ नोकरी इच्छूक तरुणांनी सहभाग घेतला. त्यापैकी आतापर्यंत २ हजार १४० तरुणांना रोजगार मिळाला. उर्वरित जागांसाठी उर्वरित तरुणांमधून निवड प्रक्रिया सुरू आहे. सर्व उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यासाठी विभागामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत.

## शेतमजुरांना प्रशिक्षण

राज्यातील शेतमजुरांसाठी कौशल्य आधारित प्रशिक्षणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. सुमारे १ लाख शेतमजुरांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सध्या कापूस व मका या पिकांसाठी फवारणीची कामे मोठ्या प्रमाणावर करावी लागणार असल्याने ही प्रमुख पिके असलेल्या क्षेत्रात कीटकनाशक फवारणीचे कौशल्य आधारित प्रशिक्षण शेतमजुरांना देण्याचा कार्यक्रम प्राधान्याने हाती घेण्यात आला आहे, अशी माहिती कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी दिली.

प्रशिक्षण घेतलेल्या शेतमजुरांना प्रमाणपत्र देण्यात येईल व त्याची माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली जाणार आहे.

उत्पादकता वाढवण्यासाठी शेतीमधील विविध निविष्ठांसोबत शेतमजुरांची कार्यक्षमता हा घटक महत्त्वाचा आहे. सध्याच्या पीक पद्धतीमध्ये औषध फवारणी, फळबागांची छाटणी, बीबीएफद्वारे पेरणी, कापूस वेचणी, सूक्ष्म सिंचनाची देखभाल दुरुस्ती, रोपवाटिकेतील कामे, नियंत्रित शेती, शेतमालाची स्वच्छता व प्रतवारी इ. सर्व कामे ही कौशल्यावर आधारित आहेत. याबाबत शेतमजुरांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामुळे कामाची गुणवत्ता, दर्जा व वेग सुधारण्यास मदत होईल व शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल.

शेतमजुरांची कौशल्यवृद्धी, ग्रामीण भागात रोजगार निर्मितीस चालना, सुरक्षितता व आरोग्य संरक्षण, कार्यक्षम व्यावसायिक सेवांची शेतकऱ्यांना उपलब्धता, पर्यावरणपूरक कृषी पद्धतीस प्रोत्साहन व गुणवत्तापूर्ण शेतीमालाचे उत्पादन करण्यासाठी शेतमजुरांकरिता कौशल्य आधारित प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या प्रशिक्षणाबाबत संबंधित जिल्ह्यातील आत्मा प्रकल्प संचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून प्रशिक्षणाचा लाभ घेता येईल.

**टीम लोकराज्य**



प्रत्यक्ष शेतबांधावर जाऊन यंत्राच्या साहाय्याने भात लावणी करताना कृषिमंत्री दादाजी भुसे.

**शेतकऱ्यांना अधिकाधिक उत्पादन घेता यावे व त्याचे उत्पन्न वाढावे यासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्याला अत्याधुनिक यंत्र सामग्री, माहिती तंत्रज्ञानाची सुविधा, अत्याधुनिक वाण, मार्केटची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

# तंत्रकुशल बळीराजा

**अजय जाधव**

राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव असताना कृषी विभागातर्फे बळीराजाला खरीप हंगामासाठी बांधावरच खते, बियाणे पुरवण्यात येत आहे. शेतकरी खरिपाच्या पेरणीत व्यस्त असून आतापर्यंत राज्यात (२० जुलैपर्यंत) ८७.४७ टक्के पेरणी झाली आहे.

राज्यात आतापर्यंत सरासरीच्या १०२.९ टक्के पाऊस झाला आहे. आतापर्यंत २४ लाख ९७ हजार मेट्रिक टन खताचा पुरवठा करण्यात आला. कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी गेल्या दीड महिन्यात खरिपाच्या आढाव्यासाठी २७ जिल्ह्यांचा दौरा करून आढावा घेतला. शेतकऱ्यांना खते, बियाणे यांचा वेळेवर पुरवठा व्हावा यासाठी श्री. भुसे यांनी सामान्य शेतकरी बनून औरंगाबाद येथील कृषी सेवा केंद्रावर धाड टाकून कारवाई केली. शासनाने खरीप हंगामासाठी युरिया खताचा ५० हजार मेट्रिक टन संरक्षित साठा करण्याचा निर्णय घेतला.

## नावीन्यपूर्ण उपक्रम

दरवर्षी १ जुलै रोजी कृषिदिन साजरा केला जातो. या वर्षी पिकाची उत्पादकता, गुणवत्ता व शेतकऱ्यांची उत्पन्नवाढ या त्रिसूत्रीवर 'कृषी संजीवनी' सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. शेतीक्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्याच्या बांधावर पोहोचवण्यासाठी श्री. दादाजी भुसे यांच्यासह कृषी अधिकारी, कर्मचारी, कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञ यांनी २३ हजार ५०६ गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कृषिमंत्र्यांच्या संकल्पनेतून नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणाऱ्या शेतकऱ्यांची रिसोर्स बँक तयार केली असून त्यात ३६०६ शेतकऱ्यांची यादी प्रकाशित करण्यात आली आहे. शेतात काम करणाऱ्या शेतमजुरांसाठी कौशल्य आधारित प्रशिक्षण सुरू करण्यात आले.

## कृषी विद्यापीठांना आवाहन

कोरोना संकट काळात सगळ्यांनाच वर्क फ्रॉम होमची सुविधा असताना शेतकरी मात्र शेतात राबून अन्नधान्य पुरवतो. या अन्नदात्याला अधिक बळ देण्यासाठी विकसित तंत्रज्ञानाची जोड प्रयोगशील

शेतकऱ्याला दिली तर कमी जागेत भरपूर उत्पादन घेणे शक्य होईल, असे मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांनी कृषिसंजीवनी सप्ताहाच्या समारोप प्रसंगी सांगितले.

कृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंशी संवाद साधताना महाराष्ट्राची ओळख दर्शवणारी पिके कृषी विद्यापीठांनी विकसित करण्याचे आवाहन श्री. ठाकरे यांनी केले. ज्याला बाजारपेठ आहे अशी पिके घ्यावीत. विद्यापीठातील संशोधनांमुळे शेतकऱ्यांच्या जीवनातील अनिश्चितता संपून त्यांच्या जीवनात बदल झाला पाहिजे.

शेतकऱ्यांशी संवाद साधून मार्गदर्शन करावे. अशा उत्पादनांना, शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी त्याचे मार्केटिंग कसे करता येईल, याचाही विचार व्हावा. शेतीमध्ये दर्जोन्नती (अपग्रेडेशन) आणि सुधारणा (रिफॉर्म्स) खूप महत्त्वाची आहे. यातूनच शेतकरी स्वावलंबी होण्यास मदत होईल. शेतीला उद्योगाचा दर्जा मिळायला हवा. कोणताही उद्योजक कुठेही गुंतवणूक करताना आधी मार्केट सर्व्हे करतो. तसेच शेतमालाचे मार्केट सर्व्हे अत्यंत गरजेचा असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### महाडीबीटी पोर्टल

मातीत राबणाऱ्या शेतकऱ्याला माहिती तंत्रज्ञानाची जोड देऊन कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ केवळ एकाच ऑनलाइन अर्जावर देणाऱ्या महाडीबीटी पोर्टलचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आला. एकाच अर्जावर शेतकऱ्यांना लाभ मिळावा प्रत्येक योजनेसाठी वेगवेगळे अर्ज करण्याची गरज पडू नये अशी संकल्पना कृषिमंत्र्यांनी पदभार स्वीकारतेवेळी मांडली होती त्याला मूर्तस्वरूप देण्यात आले असून 'महाडीबीटी' पोर्टलद्वारे ही सुविधा शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.



**महाडीबीटी पोर्टलच्या ऑनलाइन शुभारंभ प्रसंगी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषिमंत्री दादाजी भुसे, कृषी राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम.**

संघटित शेती आणि संघटित शेतकरी ही संकल्पना राबवून जे विकले जाईल तेच पिकवायची गरज असून शेतकऱ्यांना संघटित करताना विभागवार निश्चित केलेल्या दर्जाचीच पिके पिकतील, ती बाजारपेठेत विकली जातील या दृष्टीने

### विकेल ते पिकेल संकल्पना

विद्यापीठाचे संशोधन शेतकऱ्यांच्या बांधावर नेण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. 'जे विकेल ते पिकेल' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. विद्यापीठांनी विविध वाणांचे संशोधन करताना शेतीसाठी उपयुक्त ठरणाऱ्या लहान यंत्रांसाठी संशोधन करून ते शेतकऱ्यांना उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. रानभाज्या आणि औषधी वनस्पतींचे ब्रँडिंग होणे गरजेचे असल्याचे कृषिमंत्री श्री. भुसे यांनी सांगितले. सोयाबीनचे बियाणे संवेदनशील असते. बियाण्यांवरील आवरण टणक होण्याच्या दृष्टीने विद्यापीठांनी संशोधन करण्याचे आवाहन त्यांनी केले.

### शेतकरी अपघात विमा

शेतकऱ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा विशेष मोहीम राबवून १० ऑगस्टपर्यंत करण्याचे निर्देश श्री. भुसे यांनी दिले आहेत. या योजनेच्या प्रस्तावांचा गतीने निपटारा करण्यासाठी मोबाइल ॲप तसेच पोर्टल तयार केल्यास अर्ज ऑनलाइन येतील व त्यावरील कार्यवाहीबाबत शेतकऱ्यांना माहिती मिळू शकते. पूर्वी या योजनेत ज्या व्यक्तींच्या नावावर शेती आहे अशा शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येत होता. आता मात्र या योजनेंतर्गत सात-बारावर नाव असलेला शेतकरी आणि त्याच्या कुटुंबातील एका सदस्याचा समावेश करण्यात आला आहे. योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळण्यासाठी विमा कंपनी, ब्रोकरेज कंपनी व कृषी विभाग यांनी समन्वयातून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजना

या योजनेंतर्गत राज्यातील ९१ लाख १३ हजार शेतकऱ्यांना लाभ मिळाला असून त्यांच्या खात्यात पाच हप्त्यात ६९४९ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. या योजनेचा ज्या शेतकऱ्यांना लाभ मिळाला नाही त्यासाठी ५ ऑगस्टपर्यंत विशेष मोहीम राबवण्यात आली आहे. लाभार्थ्यांच्या माहितीतील त्रुटींची दुरुस्ती, नवीन लाभार्थ्यांची नोंदणी आदी उपक्रम राबवण्यात येत आहेत.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे असलेल्या लॉकडाऊनच्या काळात सहकार व पणन विभागामार्फत विविध उपाययोजनांच्या माध्यमातून बळीराजाला दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. शेतकरी कर्जमुक्ती योजना, पीक कर्ज, खतांची उपलब्धता, फळे व भाजीपाल्यासारखी शेतमालांची शहरांतील गृहनिर्माण संस्थांमध्ये थेट विक्री, पतसंस्था, बाजार समित्या याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.**

# दिलासा : कर्जमुक्तीचा, पीककर्जाचा

**काशिबाई थोरात**



राज्यातील सततची दुष्काळी परिस्थिती, अतिवृष्टी व इतर नैसर्गिक आपत्तींमुळे पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी अडचणीत आल्याने शासनाने त्याला दिलासा देण्यासाठी 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९' ही योजना जाहीर केली.

## शेतकरी कर्जमुक्ती योजना

१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१९ पर्यंतच्या कालावधीसाठी अल्पमुदतीचे पीक कर्ज घेतलेल्या तसेच, या कालावधीत अल्पमुदतीच्या पीक कर्जाचे पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या राष्ट्रीयकृत बँका, व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, ग्रामीण बँका, विविध कार्यकारी सहकारी संस्था यांच्याकडून शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जाची ३० सप्टेंबर २०१९ रोजी असलेली थकबाकीची रक्कम प्रतिशेतकरी २ लाख रुपयांपर्यंत शासनाच्या वतीने भरून त्यांना कर्जमुक्त करण्यात येत आहे. कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात थेट ऑनलाइन पद्धतीने जमा होत असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे.




या योजनेची अंमलबजावणी संगणकीय प्रणालीद्वारे पारदर्शक आणि गतीने राबवण्यात येत असतानाच कोरोनाचे महासंकट आले. राज्यात लॉकडाऊन जाहीर झाला. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सुरक्षित अंतर ठेवणे गरजेचे होते. त्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये काही अडचणी निर्माण झाल्या. तिसऱ्या यादीतील पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळण्यास थोडा उशीर झाला. कोरोनाच्या प्रादुर्भावाचा अंदाज घेऊन लॉकडाऊन कालावधीतसुद्धा या कर्जमुक्तीच्या अंमलबजावणीला गती देण्यात आली.

या योजनेंतर्गत सुमारे ३२ लाख पात्र खातेदार शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली असून २० जुलै २०२० अखेर सुमारे २७.३७ लाख खातेदारांना

१७ हजार ६४६ कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला. ही योजना अवघ्या दोन महिन्यात अमलात आली. आता त्याची गतीने अंमलबजावणी सुरू आहे. जुलै अखेरपर्यंत सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्याचे प्रयत्न करण्यात



संग्रहित छायाचित्र

आले. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे या शेतकऱ्यांना चालू वर्षाच्या खरीप व रब्बी हंगामासाठी पीककर्ज मिळण्याचा मार्ग अधिक सुलभ झाला.

## खरीप पीक कर्ज वाटप

शेतकऱ्यांना शेती उत्पादनासाठी लागणारे शेती कर्ज विविध बँकांमार्फत उपलब्ध करण्याचे नियोजन सहकार विभागामार्फत करण्यात येते. २०२०-२१ या वर्षातील खरीप हंगामासाठी ४५ हजार ७८५ कोटी एवढा लक्ष्यांक निश्चित करण्यात आला आहे. त्यापैकी १ एप्रिल २०२० ते १५ जुलै २०२० या कालावधीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व व्यापारी बँकांनी सुमारे २६.८४ लाख शेतकऱ्यांना १९ हजार ७९५ कोटी रुपये पीक कर्ज पुरवठा केला. विशेषत: जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी त्यापैकी १९.१३ लाख शेतकऱ्यांना सुमारे १० हजार ५३३ कोटी रुपये दिले. खरीप २०२० मधील पीक कर्ज वाटपाचे प्रमाण मागील वर्षाच्या तुलनेत जास्त आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजनेच्या पात्र यादीमध्ये नाव असलेल्या परंतु कोरोनामुळे अद्याप लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांना बँकांनी खरीप पीक कर्ज पुरवठा करावा अशा सूचना शासनाने बँकांना केल्या. यासाठी या योजनेतील पात्र शेतकऱ्यांचे थकीत कर्ज शासनाकडून येणे दाखवण्यात आले.

व्यापारी बँकांनी शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज पुरवठा करण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रमुख व्यापारी बँकांची मुख्य सचिव यांच्या स्तरावर बैठक घेण्यात आली. त्यामुळे कोरोनाचा प्रादुर्भाव असताना पीक कर्ज वाटप प्रक्रियेला गती दिली.

## माफक दरात दर्जेदार खत

सुमारे २१ हजार ३५० प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांपैकी सुमारे ४५० संस्था त्यांच्या सभासदांना खतांचा पुरवठा करीत आहेत. अशा संस्थांना दर्जेदार खतांचा माफक दरात पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने प्रथमच पुढाकार घेतला असून इफको, कृभको, आरसीएफ इत्यादी नामांकित कंपन्यांनी उत्पादित केलेल्या खताचा जून २०२० अखेर ११ विविध कार्यकारी सहकारी संस्था व ३ शेतकरी उत्पादक कंपन्यांना १६९ मे. टन खताचा पुरवठा करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना खासगी दुकांनापेक्षा माफक दरात दर्जेदार खत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## एनपीए वर्गवारी

कोरोनामुळे निर्माण झालेले आर्थिक संकट विचारात घेऊन राज्यातील सहकारी पतसंस्थांना दिलासा देण्यासाठी थकीत कर्जाच्या एनपीए वर्गवारीसाठी सध्या असलेला ६ महिन्यांचा कालावधी ९ महिन्यांपर्यंत वाढवण्यात आला.

## ओटीएस योजना

राज्यातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांमार्फत विविध प्रकारचे व्यावसायिक व नोकरदार यांना मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा करण्यात येतो. काही विशिष्ट परिस्थितीत कर्जाची विविध कालावधीत परतफेड न केलेल्या थकीत कर्जदाराकडील कर्जाची वसुली होण्यासाठी शासनामार्फत एकरकमी कर्ज परतफेड योजना (ओटीएस) शासनामार्फत लागू करण्यात आली. या योजनेस ३१ मार्च २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

## निवडणुकीस मुदतवाढ

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कोविड-१९ या विषाणुचा संसर्ग रोखण्यासाठी शासनाने घोषित केलेल्या विविध उपाययोजनांतर्गत सोशल डिस्टन्सिंगचे पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. २ लाख सहकारी संस्थांपैकी प्रत्येक वर्षी सुमारे ४० हजार सहकारी संस्थांची निवडणूक घेण्यात येते. मात्र, राज्यात लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर १८ मार्च २०२० व त्यानंतर १७ जून २०२० रोजीच्या आदेशाद्वारे सहकारी संस्थांची निवडणूक तीन महिन्यांसाठी (एकूण सहा महिने) पुढे ढकलण्यात आली आहे.

### सुखरूप परतले...

लॉकडाऊनमुळे सुमारे १ लाख ४१ हजार ऊस तोडणी कामगार संबंधित साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात अडकले होते. या कामगारांना त्यांच्या मूळगावी पाठवण्याबाबत सहकार विभागामार्फत निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार राज्यातील ४४ साखर कारखान्यांनी १ लाख ४१ हजार ऊस तोडणी कामगारांना कारखान्याच्या खर्चाने विशेष वाहनाद्वारे सुखरूप त्यांच्या गावी पाठवण्यात आले. तसेच कारखान्याचा गाळप हंगाम बंद झाल्यापासून या कामगारांना त्यांच्या मुळगावी पाठवण्यापर्यंत त्यांची निवास व भोजनाची व्यवस्था संबंधित कारखान्याच्या खर्चाने करण्यात आली.

## साखर उद्योगासाठी आत्मनिर्भर योजना

मागील तीन वर्षांपासून आंतरराष्ट्रीय बाजारातील साखरेचे बाजारभाव अत्यंत कमी असल्यामुळे राज्यातील साखर कारखाने आर्थिक अडचणीत आले आहेत. कोरोनामुळे सर्वच क्षेत्रात आर्थिक संकट निर्माण झाले आहे. आगामी गाळप हंगाम सुरू करण्यासाठी अनेक सहकारी साखर कारखान्यांना निधी उपलब्ध होण्यात अडचणी येत आहेत. विशेषतः २०२०-२१ च्या गाळप हंगामात ऊसाचे विक्रमी उत्पादन होण्याची शक्यता असल्याने या संपूर्ण ऊसाचे गाळप करणे शक्य व्हावे या दृष्टीने जास्तीत जास्त सहकारी साखर कारखाने सुरू करण्यासाठी सहकार विभाग प्रयत्नशील आहे. त्या दृष्टीने या हंगामात सहकारी साखर कारखाने सुरू करण्यासाठी त्यांना पुरेशा प्रमाणात कर्ज पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सहकारी बँकेमार्फत आत्मनिर्भर योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत बँकेकडे १९ कारखान्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. बँकेमार्फत सहकारी साखर कारखान्यांना वाढीव कर्ज देण्यात येईल.



## मदतीचा हात

कोरोनाबाधित रुग्णांवर करण्यात येणारे उपचार, स्थलांतरित मजूरांची निवास व भोजनाची व्यवस्था यासाठी मदत व्हावी म्हणून सहकारी संस्थांना आर्थिक मदतीचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार राज्यातील ६५०० सहकारी संस्थांनी मुख्यमंत्री सहायता निधीस ३५ कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध करून दिला.

## फळे, भाजीपाला थेट ग्राहकांपर्यंत

राज्यात २४ मार्च २०२० रोजी लॉकडाऊन जाहीर झाल्यानंतर मुंबई, ठाणे, पुणे, इत्यादी मोठ्या शहरातील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सभासदांना थेट फळे व भाजीपाला पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या स्तरावर संकेतस्थळाच्या माध्यमातून जीवनावश्यक वस्तूंच्या ऑनलाइन बुकिंगची व्यवस्था निर्माण करण्यात आली. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाशी संलग्न ७५ शेतकरी उत्पादक कंपन्या/सहकारी संस्थांमार्फत ४१४ सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील ११ हजार ८९९ सभासदांना रुपये १४६४ क्विंटल भाजीपाला माफक दरात थेट पुरवण्यात आला.

## बाजार समित्यांचे व्यवहार सुरळीत

राज्यात सध्या ३०६ बाजार समित्या कार्यरत असून याअंतर्गत सुमारे ६५० उपबाजार कार्यरत आहेत. या समित्यांमध्ये शेतमालाची सुमारे ४० हजार कोटींची दरवर्षी उलाढाल होते. कोरोना काळात जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत चालू राहावा शेतकऱ्याच्या शेतमालाच्या विक्रीमध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये यासाठी बाजार समितीचे मुख्य आवार व उपबाजार सुरू ठेवण्यात आले.



बाजार आवारात गर्दी न होऊ देता, सामाजिक अलगीकरण (सोशल डिस्टन्सिंग)चे निकष, स्वच्छतेबाबतचे नियम पाळून सर्व उपाययोजना करून व्यवहार सुरळीत सुरू ठेवण्यात आले.

गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा उपनिबंधकांची जबाबदार अधिकारी म्हणून आणि विभागासाठी विभागीय सहनिबंधक यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. या विषाणूचा प्रसार होणार नाही याची दक्षता घेऊन बाजार समितीतील व्यवहार कसे चालू राहतील यासाठी नियोजन व अंमलबजावणी करण्याची त्यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली. महसूल आणि पोलीस विभागाचीसुद्धा मदत घेण्यात आली.

बाजार आवारातील गर्दी कमी व्हावी आणि संख्या मर्यादित राहावी, यासाठी शेतकऱ्यांना टोकन देण्याची किंवा पूर्व नोंदणी करण्याची व्यवस्था करण्यात आली. पुणे आणि मुंबई बाजार समित्यांनी वाहनांना पूर्वनोंदणी करून, गेट पास देऊन त्यांची संख्या मर्यादित केली. अशा प्रकारे लॉकडाऊन कालावधीत कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आणि बाजार समितीचे व्यवहार सुरळीत सुरू ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

विभागीय संपर्क अधिकारी





निसर्ग चक्रीवादळानंतर रायगडमधील थळ येथे पाहणी करण्यासाठी आलेले मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना नुकसानीची माहिती देताना पालकमंत्री तथा राज्यमंत्री कुमारी आदिती तटकरे. सोबत पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे, मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, खासदार सुनील तटकरे, खासदार श्रीरंग बारणे आदी.

**रायगड जिल्ह्याला निसर्ग चक्रीवादळाचा अभूतपूर्व तडाखा बसला. यात विविध क्षेत्राचे मोठे नुकसान झाले. जनजीवन अस्त व्यस्त झाले. एका क्षणात होत्याचे नव्हते झाले. पण रायगडचा लढवय्या माणूस लगेच सावरला नि आत्मविश्वासाने कामाला लागला. या आत्मविश्वासाला शासनाचे पाठबळ त्वरित मिळाल्याने पुनर्वसनाच्या कार्यास गती मिळाली.**

# वादळाशी यशस्वी झुंज

**कु. आदिती तटकरे**
पालकमंत्री तथा राज्यमंत्री, उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय.

३ जून २०२० रायगड जिल्ह्याच्या इतिहासातील अत्यंत दुर्दैवी दिवस. याच दिवशी रायगड जिल्ह्याच्या किनारपट्टी भागात निसर्ग चक्रीवादळामुळे प्रचंड नुकसान झाले. हजारो घरे, झाडे, विजेचे खांब, शासकीय इमारती, जिल्हा परिषद तसेच खासगी शाळांची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली. मात्र कोकणातला माणूस तसा खंबीर. तो पुन्हा उभा राहिला. शासनही खंबीरपणे त्याच्या पाठीशी उभे राहिले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ नेते शरद पवार, माझे सहकारी मंत्री, लोकप्रतिनिधींनी तातडीने या भागाला भेट देऊन पाहणी केली. आम्ही तातडीने मदत जाहीर करून पुन्हा संसार उभे केले. वादळापूर्वीची पूर्वतयारी, युद्धपातळीवर मदतकार्य यामुळे जनजीवन सुरळीत झाले आहे.

रविवार ३१ मे २०२० रोजी हवामान खात्याचा चक्रीवादळाचा इशारा मिळताच पालकमंत्री या नात्याने जिल्हा प्रशासनाला आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. वादळापूर्वी जिल्हावासीयांना तातडीने एसएमएस, व्हॉट्सॲप, लाऊडस्पीकर, सायरन आदींच्या माध्यमातून सावधानतेचा इशारा देण्यात आला.

जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी, महत्त्वाच्या व्यक्तींनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत कोणीही घराबाहेर पडणार नाही, याची दक्षता घेण्यात आली. राज्याच्या पश्चिम किनारपट्टीला चक्रीवादळाचा धोका असल्यामुळे मच्छिमार बांधवांनी या काळात समुद्रात जाऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या. चक्रीवादळादरम्यान तब्बल ८१ मच्छीमार बोटींसह ३ हजार १०० मच्छीमारांना सुरक्षितपणे परत आणण्यात आले. विविध शासकीय विभागांच्या तातडीच्या बैठका घेऊन त्यांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या नेमून देण्यात आल्या. गावपातळीपर्यंत समन्वय साधण्यासाठी विविध अधिकाऱ्यांची पथके स्थापित करण्यात आली. विशेषतः किनारपट्टीलगतच्या भागातील एकूण ६२ गावांमधील १३ हजार ५४१ नागरिकांना तेथून बाहेर काढून त्यांची व्यवस्था सुरक्षित ठिकाणी निवारागृहामध्ये करण्यात आली.

## आपत्कालीन संपर्क यंत्रणा

हवामान खात्याचा इशारा मिळताच चक्रीवादळादरम्यान आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्वप्रथम जिल्हाधिकारी कार्यालयात २४ तास कार्यरत 'जिल्हा नियंत्रण कक्ष' स्थापन केला. काही अडचण आल्यास नागरिकांनी नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. याबरोबरच जिल्हा मुख्यालय व तालुका नियंत्रण कक्ष यांच्या संपर्कासाठी या नियंत्रण कक्षात हॅम आणि वायरलेस यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली.

## पूर्वतयारी

चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी बाहेर न पडण्याचे आवाहन करण्यासाठी जिल्ह्यातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, जिल्ह्यातील प्रतिष्ठित व्यक्ती, जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांच्या आवाहनाच्या व्हिडिओ क्लिपस् बनवण्यात आल्या व त्या व्हॉट्सॲप, यू-ट्युब, ट्विटर, फेसबुकच्या माध्यमातून जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आल्या. पालकमंत्री या नात्याने मी व जिल्हाधिकाऱ्यांनी वेळोवेळी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून चक्रीवादळाच्या धोक्यासंबंधी नागरिकांना माहिती दिली.

या सर्व परिस्थितीत प्रशिक्षित यंत्रणेची गरज असल्याने शासनाकडून पाच राष्ट्रीय आपत्ती निवारण पथके, कोस्टगार्डचे एक पथक, संरक्षण विभागाचे एक पथक, राज्य आपत्ती निवारणाचे तीन पथके, दोन अतिरिक्त राष्ट्रीय आपत्ती निवारण पथक आणि पोलीस यंत्रणा संभाव्य आपत्ती निर्मूलनासाठी तैनात करण्यात आली. यांच्या साथीला वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका, जेसीबी, झाडे कापण्यासाठी यांत्रिक सामग्री, जनरेटरर्स, विद्युत खांब, विद्युत विभागासाठी आवश्यक यंत्रसामग्री, तातडीची अन्नधान्य व्यवस्था अशा सर्व बाजूंनी खबरदारी घेण्यासाठी प्रशासन सज्ज होते. यामुळे चक्रीवादळामुळे जिल्ह्यात घरे, झाडे, फळबागा, शेती यांची जरी मोठ्या प्रमाणात हानी झाली तरी जीवितहानी मात्र कमीत कमी झाली. जिल्ह्यात एकूण सहा व्यक्तींचा दुर्दैवी अंत झाला.

बुधवार ३ जून २०२० रोजी सकाळपासून वातावरण काहिसे भीतीदायक जाणवू लागले होते. मात्र या वादळाशी सामना करण्यासाठी संपूर्ण पूर्वतयारी करण्यात आली होती. जिल्हाधिकारी व इतर अधिकारी किनारपट्टी भागातील हरिहरेश्वर, श्रीवर्धन, मुरुड, अलिबाग येथील क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या संपर्कात राहून तेथील परिस्थितीचा अंदाज घेत होते व ही माहिती माझ्यापर्यंत पोहोचवत होते.

निसर्ग चक्रीवादळाने हरिहरेश्वर येथे धडक दिली, होत्याचे नव्हते करीत ते पुढे श्रीवर्धन, मुरुड, अलिबाग, पेण, उरण, पनवेलच्या काही भागात नुकसान करून निघून गेले. बराच वेळ मोबाइल नेटवर्क नव्हते. मात्र, या वेळी हॅम व वायरलेस यंत्रणा उपयुक्त ठरली. नियंत्रण कक्ष क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी हॅम व वायरलेसद्वारे संपर्क साधून झालेल्या नुकसानीचा अंदाज घेत होते.

नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन केल्यामुळे मनुष्यहानी घडली नाही. योग्य नियोजनाची ही पावती होती.

झाडे, घरे, शाळांवरील पत्रे, विद्युतखांब, नारळी, सुपारी, आंबा, काजू इत्यादी

### नुकसानग्रस्तांसाठी सुधारित निर्णय

नुकसानग्रस्तांसाठी आधी जे मदतीचे निकष होते त्यात शासनाने बदल करून वाढीव मदत देण्याचा निर्णय घेतला.

- ज्यांच्या घरांचे पुर्णतः नुकसान झाले आहे त्यांच्यासाठी पूर्वी ९५ हजार १०० रुपये इतकी नुकसानभरपाई होती, आता सुधारित दराने १ लाख ५० हजार रुपये तर कपडे, भांडी यासाठी पूर्वी ५ हजार इतकी नुकसानभरपाई होती, आता सुधारित दराने १० हजार असे एकूण १ लाख ६० हजार रुपयांची तातडीची मदत.
- नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना यापूर्वी हेक्टरी १८ हजार रुपये मदत दिली जात होती. आता त्यात वाढ करून हेक्टरी ५० हजार रुपये मदत.
- अंशतः पडझड परंतु १५ टक्के नुकसान झालेल्या पक्क्या/कच्च्या घरांसाठी मदत ६ हजार रुपये प्रतिघर इतकी नुकसानभरपाई होती परंतु आता सुधारित दराने १५ हजार रुपये मदत.
- अंशतः पडझड परंतु २५ टक्के नुकसान झालेल्या पक्क्या/कच्च्या घरांसाठी सुधारित २५ हजार रुपये नुकसानभरपाई.
- अंशतः पडझड परंतु ५० टक्के नुकसान झालेल्या पक्क्या/कच्च्या घरांसाठी मदत ६ हजार रुपये प्रतिघर, मदतीचे वाढीव दर १५ हजार रुपये प्रतिघर इतकी नुकसानभरपाई होती, आता सुधारीत ५० हजार रुपये देण्याचा निर्णय.
- कोकणातील शेतीचे मोजमाप हे गुठ्यांमध्ये होत असल्यामुळे प्रति गुंठ्यासाठी अधिकाधिक मदत देण्यासाठी शासन प्रयत्नशील.
- छोट्या दुकानदारांना नुकसानभरपाई.
- निसर्ग चक्रीवादळातील मोठे नुकसानभरपाईसाठी निकष बदलून सुधारित दराने नारळाच्या झाडाकरिता २५०/- रुपये प्रतिझाड व सुपारी झाडाकरिता ५०/- रुपये प्रतिझाड नुकसानभरपाई देण्याचा निर्णय.
- रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवड योजना सुरू करण्याचा निर्णय.
- रायगड जिल्ह्यातील १ हजार ५७६.४९ हेक्टर क्षेत्रावरील एकूण १६ लाख ८६ हजार ७६१ नारळ व सुपारीच्या झाडांचे नुकसान झाले. सुधारित निर्णयामुळे या बागायतदारांना नुकसानभरपाई पोटी ११ कोटी ९३ लाख १६ हजार २५० रुपये देण्यात येणार. लवकरच नुकसानभरपाईची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणार.

फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची माहिती मिळू लागली.

### वाहतूक तातडीने सुरळीत

निसर्ग चक्रीवादळानंतर लागलीच संपूर्ण यंत्रणा नव्या दमाने, नव्या उमेदीने कामाला लागली. झाडे पडल्यामुळे बंद झालेले मुख्य रस्ते युद्ध पातळीवर वाहतुकीसाठी मोकळे करण्यात आले. जिल्हा पोलीस प्रशासन आणि एनडीआरएफच्या पथकांनी यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. प्रत्येक तालुक्यात, नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्र तसेच ग्रामीण भागात तातडीने यासाठी विविध पथके तयार करण्यात आली. पडझड झाल्यामुळे बंद पडलेले जिल्ह्यातील २९९ रस्ते तातडीने वाहतुकीसाठी खुले करण्यात आले.

**मोबाइल नेटवर्क पूर्ववत** : १० जून २०२० पर्यंत जिल्ह्यात सेवा देणाऱ्या मोबाइल कंपन्यांची एकूण १ हजार ५०० साईटस्‌पैकी १ हजार ४०० साईटस् पूर्ववत सुरू करण्यात आल्याने मोबाइल नेटवर्क पूर्ण क्षमतेने सुरू झाले.

### अल्पावधीत वीजपुरवठा पूर्ववत

निसर्ग चक्रीवादळामुळे वीजपुरवठा खंडित झाल्याने अनेक अडचणी उद्‌भवल्या होत्या. ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत आणि राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांच्याशी जिल्ह्यातील वीजपुरवठा तातडीने सुरू करण्याच्या अनुषंगाने आवश्यक दुरुस्तीसाठी अधिक तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याविषयी विनंती केली. चक्रीवादळानंतर दुसऱ्या दिवशी ऊर्जामंत्र्यांनी रायगड जिल्ह्यास भेट देऊन विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि खंडित झालेला विद्युत पुरवठा सुरू करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्याचे आदेश दिले. वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी व दुरुस्तीच्या कामाला वेग देण्यासाठी अतिरिक्त विशेष पथकाची नियुक्ती करीत जिल्ह्यात कल्याण परिमंडळातील २५ अभियंते, ८० कर्मचारी, ८ कंत्राटदार व त्यांच्या कामगारांना कोलमडलेल्या वीज वितरण यंत्रणेच्या दुरुस्तीसाठी बाधित क्षेत्रात मदत करण्यासाठी तत्काळ पाठवले.



निसर्ग चक्रीवादळातील मृतांच्या कुटुंबीयांना मदतीचा धनादेश देताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे. सोबत पालकमंत्री तथा राज्यमंत्री कु.आदिती तटकरे, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे.

वीजपुरवठा खंडित झालेल्या १ हजार ९७६ गावांपैकी १ हजार ९२३ गावातील वीजपुरवठा तातडीने सुरू करण्यात प्रशासनाला यश मिळाले. उर्वरित ५३ गावांमधील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी कार्यवाही करण्यात आली. चक्रीवादळामुळे बंद पडलेली अति उच्च दाबाची चारही उपकेंद्रे पूर्ववत सुरू झाली. नादुरुस्त झालेल्या ६ हजार ७७३ रोहित्रांपैकी ६ हजार ३९८ रोहित्रे दुरुस्त करून ती पूर्ववत सुरू करण्यात आली आहेत. उच्चदाबाचे ६ हजार ४८९ खांब नव्याने उभारण्यात आले आहेत. लघुदाबाचे १४ हजार ८६५ खांब चक्रीवादळामुळे पडले होते, त्यातील १० हजार ६५५ खांब नव्याने उभारण्यात आले. बाधित २६१ फिडर पूर्ववत सुरू करण्यात वीज प्रशासनाला यश मिळाले आहे. यासाठी महावितरणच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कष्ट घेतले.

**भूमिगत वीज वाहिनी** : अलिबाग येथे नॅशनल सायक्लॉन रिस्क मिटिगेशन प्रोजेक्ट (एन.सी.आर.एम.पी.) अंतर्गत भूमिगत वाहिनीनुसार वीज वितरण व्यवस्था करण्याचे काम सुरू आहे. याच धर्तीवर रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन शहर व लगतचा भाग, मुरूड शहर व लगतचा भाग, उरण तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली शहर व लगतचा भाग, त्याचप्रमाणे गुहागर शहर व लगतचा भाग येथे एन.सी. आर.एम.पी. योजनेंतर्गत भूमिगत वीज वितरण वाहिनी टाकण्याचे काम मंजूर होण्याबाबत ऊर्जामंत्र्यांना विनंती केली.

### मृतांच्या वारसांना मदत

अलिबाग तालुक्यातील उमटे गावातील ५८ वर्षीय दशरथ बाबू वाघमारे, ही व्यक्ती चक्रीवादळात विजेचा खांब अंगावर पडून मृत्युमुखी पडली. त्यांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई म्हणून चार लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते देण्यात आला. चक्रीवादळात झालेल्या उर्वरित मृतांच्या वारसांनाही नुकसानभरपाईचे धनादेश देण्यात आले.

### नागरिकांना धीर

चक्रीवादळानंतर मी लगेच एकूण परिस्थितीबाबत प्रमुख अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेऊन ४ जून २०२० रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषद घेतली. त्या माध्यमातून चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या जनतेला धीर दिला. त्यांना तातडीची आर्थिक मदत

दिली जाणार असल्याचे सांगत शासन त्यांच्याबरोबर असल्याचा विश्वास दिला.

## १०० कोटींची मदत

५ जून रोजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रायगड जिल्ह्याला भेट देऊन थळ येथील नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली. रायगड जिल्ह्याला तातडीची मदत म्हणून शासनाकडून १०० कोटी रुपये देण्याची घोषणा या वेळी त्यांनी केली. त्याचबरोबर नुकसानग्रस्त लोकांनी नुकसानीचे काढलेले फोटो, व्हिडिओ पंचनाम्याच्या कार्यवाहीत ग्राह्य धरण्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून नुकसानग्रस्त जनतेच्या अन्नधान्याचा आणि जेवणाचा प्रश्न शासन निश्चितच सोडवणार, असे सांगून त्यांनी जनतेला धीर दिला.

निसर्ग चक्रीवादळामुळे नुकसानग्रस्त कोकणवासीयांना धीर देण्यासाठी तसेच सुधारित दराने नुकसानभरपाई देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अत्यंत तातडीने निर्णय प्रक्रिया राबवली.

## मान्यवरांच्या भेटी

कोरोनासारख्या संकटात ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार हे चक्रीवादळातील संकटग्रस्त कोकणवासीयांना धीर देण्यासाठी तातडीने रायगडला आले. जिल्ह्यातील बागायतदार पुढील दहा वर्षे उत्पन्नापासून दुरावला असून हेक्टरी मदत न देता झाडांच्या संख्येनुसार नुकसानभरपाई देण्यात येण्याची मागणी शासनाकडे करण्याचे सांगून त्यांनी कोकणवासीयांना धीर दिला. त्याचबरोबर महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, कृषिमंत्री दादाजी भुसे, मत्स्यव्यवसाय, बंदरे विकास मंत्री अस्लम शेख, ऊर्जा, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, खासदार सुप्रिया सुळे, खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी रायगड जिल्ह्यातील नुकसानग्रस्त भागांना भेट देऊन तेथील नागरिकांशी संवाद साधून शासनाकडून आवश्यक व योग्य ती सर्व प्रकारची मदत केली जाईल, असा विश्वास दिला.

## मदतीचे वाटप व वाढीव मदत

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नुकसानग्रस्तांसाठी ५ जून रोजी १०० कोटी रुपयांची तातडीची मदत जाहीर केली. त्यापैकी ७२ कोटी रुपयांचे अनुदान जिल्ह्याला प्राप्त झाले असून मदत वाटपाचे काम तत्काळ सुरू झाले. ही मदत जिल्ह्यासाठी पुरेशी नसल्याने वाढीव मदत देण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली. त्यानुसार शासनाने आणखी ३०१ कोटींची मदत रायगड जिल्ह्यासाठी जाहीर केली. यापैकी २४२ कोटींची मदत घरांच्या नुकसानभरपाईसाठी आहे. आतापर्यंत केलेल्या पंचनाम्यांनुसार घरांचे अंदाजे ३९५ कोटींचे नुकसान झाले आहे.

चक्रीवादळातील नुकसानग्रस्तांना शासनाकडून नुकसानभरपाई म्हणून २९३ कोटीहून अधिक इतका निधी प्राप्त झाला. आतापर्यंत २१३ कोटींहून अधिक निधीचे वाटप पूर्ण झाले. ही नुकसानभरपाई घर, गोठे, झोपड्यांसाठी, मयत व्यक्ती, जखमी व्यक्ती, कपडे, भांड्यांसाठी अर्थसाहाय्य, शेती नुकसानीसाठी अर्थसाहाय्य, शेतकऱ्यांना मृत झालेल्या जनावरांच्या नुकसानीपोटी अर्थसाहाय्य, मासेमारी साधनसामग्री, दुकान, टपरी अर्थसाहाय्य, राहत केंद्रामध्ये निवारा अर्थसाहाय्य या बाबींसाठी देण्यात आली.

## मत्स्य व्यावसायिकांना मदत

- बोटिच्या अंशतः दुरुस्तीसाठी ४ हजार १०० रुपये इतकी नुकसानभरपाई होती. आता सुधारित दराने १० हजार रुपये मिळणार.
- पूर्णतः नष्ट झालेल्या बोटींसाठी ९ हजार ६०० रुपये इतकी नुकसानभरपाई होती परंतु आता सुधारित दराने २५ हजार देण्याचा निर्णय.
- अंशतः बाधित जाळ्यांच्या दुरुस्तीसाठी २ हजार १०० रुपये इतकी नुकसानभरपाई होती आता सुधारित दराने ५ हजार देण्याचा निर्णय.
- पूर्णतः नष्ट झालेल्या जाळ्यांच्या दुरुस्तीसाठी २ हजार ६०० रुपये इतकी नुकसानभरपाई होती, आता सुधारित दराने ५ हजार देण्याचा निर्णय.

## पाणी आणि केरोसिनचे मोफत वाटप

चक्रीवादळामुळे रायगड जिल्ह्यातील अनेक गावांमधील वीजपुरवठा खंडित झाला. केरोसीन नसल्यामुळे लोकांना घरामध्ये कंदील, दिवे लावण्यासाठी अडचणी उद्‌भवल्या. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांनी नुकसानग्रस्त नागरिकांना मोफत केरोसीन देण्याचा निर्णय घेतला. जिल्ह्यातील ७ लाख ६९ हजार ३३५ शिधापत्रिकाधारकांना प्रति शिधापत्रिकाधारकास ५ लिटर केरोसिन वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला. वीजपुरवठा खंडित झाल्याने ज्या गावांमध्ये पाण्याची समस्या उद्‌भवली. त्या ठिकाणी टँकरद्वारे पिण्याचे पाणी पोहोचवण्यात आले.

## केंद्रीय पथकाला निवेदन

केंद्रीय पथकाने निसर्ग चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीची अलिबाग तालुक्यातील आक्षी, नागाव, नागाव बीच, चौल आग्राव येथे भेट देऊन पाहणी केली, नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच मुरुड तालुक्यातील नांदगाव, मुरुड, राजापुरी येथे तर श्रीवर्धन तालुक्यातील आदगाव, दिवेआगर आणि शेवटी हरिहरेश्वर या ठिकाणी भेट देऊन तेथील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. दरम्यान केंद्र शासनाने एनडीआरएफ निकषात बदल करून सुधारित निकषानुसार मदत करावी, अशी मागणी केंद्रीय पथकाचे अध्यक्ष रमेश कुमार (सह सचिव, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण) यांच्याकडे सविस्तर निवेदनाद्वारे केली. एनडीआरएफ व एसडीआरएफची सध्याचे निकष निसर्ग सारख्या चक्रीवादळाला पूरक नाहीत. केंद्र शासनाकडून नुकसानग्रस्तांना देण्यात

येणारी भरपाई ही सध्याच्या निकषानुसार अपुरी आहे. कोरोना विषाणूच्या प्रादूर्भावामुळे घरगुती पर्यटन ही संकल्पना पूर्णत: डबघाईस आली आहे. कोकणातील घराजवळील परसबागेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या परसबागेसाठी विशेष मदतीचे पॅकेजही केंद्र शासनाने जाहीर करणे आवश्यक आहे. भविष्यात निसर्गसारखे चक्रीवादळ पुन्हा आल्यास विस्थापित लोकांसाठी कायमस्वरूपी निवारा घरे ही काळाची गरज आहे. म्हणून निकषात बदल करून अंतर्गत निवारागृहांच्या बांधकामांना मंजूरी देणे आवश्यक आहे, अशी मागणी करण्यात आली.

## पोलीस, कंपन्या, संस्थांची मदत

जिल्ह्यावर आलेल्या निसर्ग चक्रीवादळाच्या संकटातून सावरण्यासाठी पोलीस यंत्रणेने, महाराष्ट्र भूषण नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा, राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्ट, पार्थ पवार फाऊंडेशन, हिराजी होरमोसजी बारिया, गजेंद्र तुकाराम दली, मावळा प्रतिष्ठान, अलिबाग, फिनोलेक्स इंडस्ट्रीज, हिंदुजा फाऊंडेशन, मुकुल महादेव फाऊंडेशन यासारख्या सामाजिक संस्थांनी, औद्योगिक क्षेत्रातील विविध कंपन्यांनी नुकसानग्रस्त नागरिकांना जीवनोपयोगी वस्तू, अन्नधान्य, पत्रे, आर्थिक मदत, श्रमदान या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर मदत करण्यास पुढाकार घेतला.

**महाविद्यालयांना मदत :** निसर्ग चक्रीवादळाचा तडाखा मोठ्या प्रमाणात रायगड व रत्नागिरी जिल्ह्यांना बसला. यातील सुमारे १३ महाविद्यालयांच्या इमारतीचे तसेच शैक्षणिक साहित्याचे, साधनसामग्रीचे मोठे नुकसान झाले. या महाविद्यालयांना राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्या माध्यमातून १०० संगणकांची तसेच ५ हजार पत्रे व इतर मदत करण्यात आली.



मदत साहित्याच्या वाहनाला हिरवी झेंडी दाखवताना जलसंपदा मंत्री जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, राज्यमंत्री कुमारी आदिती तटकरे आदी.

## पोल्ट्रीधारक, लघुउद्योगांना मदत

निसर्ग चक्रीवादळामुळे जिल्ह्यातील नुकसानग्रस्त पोल्ट्री व्यावसायिकांना त्यांच्या पोल्ट्री फार्मवरील पत्रे, पोल्ट्रीच्या जाळ्या, खाद्याची भांडी, पोल्ट्री फार्ममधील कोंबड्याची मरतूक इत्यादींच्या झालेल्या नुकसानीसाठी द्यावयाची नुकसानभरपाई या विषयाबाबत पशुसंवर्धन मंत्री सुनील केदार यांची भेट घेऊन चर्चा केली. नुकसानग्रस्तांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. निसर्ग चक्रीवादळामुळे जिल्ह्यातील नुकसानग्रस्त गणेश मूर्ती कारखानदारांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू करण्यात आले. त्यांनाही योग्य ती नुकसानभरपाई मिळण्यासाठी शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. त्याचबरोबर लघुउद्योग व्यावसायिकांनाही नुकसानभरपाई मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

## शेल्टर होम, झाडांची लागवड

चक्रीवादळासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी नागरिकांना सुरक्षित ठिकाणी राहण्यासाठी किनारपट्टी भागात सुरक्षित, मजबूत शेल्टर होम उभे करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. श्रीवर्धनसारख्या पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या समुद्र किनाऱ्यावर वारा गावामध्ये घुसू नये म्हणून सुरुच्या झाडांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात आली होती. मात्र चक्रीवादळामुळे ५० टक्क्यांहून जास्त झाडांचे पूर्ण नुकसान झाले. या दृष्टीने ही झाडे पुन्हा लावण्यासाठी वनविभागाला सूचना देण्यात आल्या आहेत.

निसर्ग चक्रीवादळामुळे उद्ध्वस्त झालेल्या नागरिकांचे जीवन पूर्ववत सुरू करण्यासाठी अहोरात्र लढणारे मंत्रिमंडळातील माझे सहकारी मंत्री, जिल्ह्यातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी-कर्मचारी, पोलीस यंत्रणा या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानते. या संपूर्ण संकटात रायगडकरांनी अजिबात खचून न जाता नवी सुरुवात करण्याच्या निश्चयाने कामाला लगेच सुरुवात केली. वीज मंडळाचे कर्मचारी विजेचे खांब उभे करण्यासाठी जेव्हा गावागावांत पोहोचले तेव्हा स्थानिक गावकरी स्वत:चे दु:ख विसरून त्यांच्या मदतीसाठी धावून गेले. प्रशासनाच्या प्रत्येक मदतकार्यात कोणतीही तक्रार न करता स्वयंप्रेरणेने गावागावातील आबालवृद्ध झोकून देऊन काम करीत होते. यामुळे रायगडकरांचे दैनंदिन जीवन खूप लवकर पूर्वपदावर आले. म्हणूनच रायगडकरांच्या धैर्याला आणि लढवय्येपणाला सलाम..!

**शब्दांकन : मनोज शिवाजी सानप,**
जिल्हा माहिती अधिकारी, रायगड–अलिबाग

**कोरोनाचे संकट असतानाही वादळाच्या संकटात सिंधुदुर्ग प्रशासनाने चांगले काम केले. योग्य नियोजन व पूर्वतयारी केल्यामुळे निसर्ग चक्रीवादळात होणारे मोठे नुकसान टळले. जिल्ह्यामध्ये कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. वादळानंतर झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून मदत केली गेली.**

# धैर्याची कसोटी !

**प्रशांत सातपुते**

कोकणचे प्रवेशद्वार असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्याला निसर्ग चक्रीवादळाचा फटका बसला. अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली. रस्ते वाहून गेले, विजेचे खांब कोसळले, शहरांसह ग्रामीण भागातील वस्त्यांमध्ये पाणी शिरले. मात्र, या संकटाचा सिंधुदुर्गवासीयांनी, जिल्हा प्रशासनाने धैर्याने सामना केला. पालकमंत्री उदय सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी के. मंजुलक्ष्मी यांनी उपलब्ध असलेल्या निधीतून गतीने कामास सुरुवात केली.

## नागरिक सुरक्षित स्थळी

या वादळापूर्वी किनारपट्टीच्या, खाडी किनाऱ्याच्या गावांमधील लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यास सुरुवात केली. गावातील शाळा, नातेवाइकांच्या घरी नागरिकांची सोय करण्यात आली. मच्छीमारांच्या होड्या किनाऱ्यावर आणण्यासाठी जेसीबीची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे होड्या लवकर किनाऱ्यावर आणणे शक्य झाले.

## तातडीने मदत

चक्रिवादळाशी लढण्याची तयारी झाली. चक्रीवादळ किनारपट्टीच्या दिशेने सरकले. सोसाट्याच्या वाऱ्यासह वृक्ष उन्मळून पडण्याच्या घटना सुरू झाल्या. वादळ उत्तर दिशेकडे सरकले, जिल्ह्यातील वातावरण निवळले. पण मागे नुकसानीचे चित्र रेखाटूनच. निसर्ग चक्रीवादळाने जिल्ह्यातील ८ ही तालुक्यांमध्ये घरांची पडझड केली. एकूण ७१ घरांची पडझड झाली. प्रशासनाने या नुकसानीची तातडीने दखल घेत त्याचे पंचनामे केले. पडझड झालेल्या सर्व ७१ जणांना १०० टक्के मदतीचे वाटप करण्यात आले. ज्या लोकांना निवारागृहांमध्ये हलवण्यात आले. त्यांना दोन वेळचा शिधा, पुरवठा शाखेतून करण्यात आला. आपत्ती व्यवस्थापनमधून पालकमंत्री उदय सामंत यांच्या सूचनांनुसार मदतीचे वाटप करण्यात आले.



रस्त्यांवर कोसळलेली झाडे दूर करताना एनडीआरएफचे जवान

इतर सर्व विभागांच्या नुकसानीचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये अनेक ठिकाणी विद्युत खांब पडले होते. त्यांची उभारणी तातडीने हाती घेऊन काम सुरू करण्यात आले. सिंधुदुर्ग किल्ल्यामध्ये वीजपुरवठा करणारे खांब कोसळले होते. त्यामुळे संपूर्ण किल्ला आणि त्यामध्ये वस्तीस असलेली ८ कुटुंबे अंधारात होती. प्रशासनाने याची दखल घेत समुद्रात तातडीने खांब उभारण्याचे काम हाती घेतले व ८ दिवसांच्या प्रयत्नांनंतर किल्ल्यात विद्युत पुरवठा सुरळीत केला.

## पंचनामे तत्काळ

शेतीच्या नुकसानीचेही तातडीने पंचनामे करण्यात आले. त्यामध्ये सुलभता यावी व लोकांमध्ये नाराजी पसरू नये यासाठी बांधावर जाऊन प्रत्यक्ष पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावर जिल्हाधिकारी के. मंजुलक्ष्मी स्वतः लक्ष ठेऊन रोजच्या रोज आढावा घेत होत्या. जिल्ह्यात एकूण १९ हेक्टर बागायतीचे नुकसान झाले. याचे सर्व पंचनामे ४८ तासात प्रशासनाने पूर्ण केले, नुकसानीचा अहवाल शासनाकडे पाठवण्यात आला. तर इतर विभागांच्या नुकसानीचे पंचनामेही तातडीने करण्यात आले. या वादळाने झालेल्या नुकसानीचे वाटप करण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जिल्ह्याला २५ कोटी रुपयांची मदत जाहीर केली.

अनेक ठिकाणी काजू, आंबा, नारळ, सुपारी यांच्या बागांचे नुकसान झाले आहे. त्यांचाही पंचनामा पूर्ण झाला. वैयक्तिक घरासमोरील झाडे पडलेल्या ठिकाणांचा पंचनामा पूर्ण करण्यात आला. त्याच्या नुकसानभरपाईचा प्रस्ताव तयार करून शासनास सादर करण्यात आला.

प्रशासनाने उपलब्ध असलेल्या निधीतून पालकमंत्री उदय सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली कामास सुरुवात केली. पावसाळा सुरू होणार असल्यामुळे विद्युत पुरवठा, रस्ते वाहतूक सुयोग्य करणे गरजेचे होते. याचा विचार करून जिल्हा प्रशासनाने तात्पुरत्या स्वरूपात कामास सुरुवात करून रस्ते वाहतूक आणि विद्युत पुरवठा सुरळीत केला. तसेच तातडीचे काम जसे शाळा, अंगणवाड्या यांच्यावरील उडून गेलेले पत्रे बसवणे यांसारखी कामे हाती घेतली आहेत.

जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग

**निसर्ग चक्रीवादळाने रत्नागिरी जिल्ह्यात थैमान घातले. परंतु त्याची पूर्वसूचना प्राप्त होताच प्रशासन कामाला लागले होते. मिशन झिरो कॅज्युअल्टी अर्थात प्राणहानी रोखणे हे प्रमुख ध्येय ठेवण्यात आले होते. त्याप्रमाणे पूर्ण तयारी केली गेली. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.**

# सुरळीत आणि सुरक्षित

**प्रशांत दैठणकर**

निसर्ग चक्रीवादळाचा सामाना करताना प्रशासनाला साथ देण्यासाठी एनडीआरएफच्या ३ तुकड्या कोल्हापूरवरून मागवण्याचा निर्णय व आनुषंगिक कार्यवाहीला गती दिली गेली. वादळाचा वेध घेण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करून क्षणाक्षणाला त्याची हालचाल टिपण्यात येत होती. वादळ धडकणार त्या भागाचा अंदाज घेऊन २४ तास आधी हालचालींना गती देण्यात आली. या निसर्ग चक्रीवादळाच्या मार्गाचा अभ्यास करून गुहागर, दापोली आणि मंडणगड तालुक्यातील ५ हजारांहून अधिक नागरिकांना सुरक्षित निवारा मिळेल असे हलवण्यात आले.

## यंत्रणा कामाला लागली

३ जून २०२० च्या पहाटेच्या सुमारास वाऱ्याची गती आणि मुसळधार पावसाला प्रारंभ झाला. ही वादळाची वर्दी होती. एव्हाना प्रशासनातील सर्व प्रमुख अधिकारी संभाव्य लक्ष्य असणाऱ्या तालुक्यापर्यंत पोहोचलेले होते. साधारण ताशी १२० ते १५० मैल वेगाच्या वाऱ्यांनी लाटांच्या तांडवात मंडणगड आणि दापोली किनारपट्टीला धडक दिली. येथे तासाभरात जमिनीवरचे सारेच चित्र पालटले. हजारो एकरांवरील नारळी-पोफळी जमीनदोस्त झाल्या, घरांचेही अतोनात नुकसान झाले. दुपारी १२ वाजेपर्यंत हा निसर्ग तांडवाचा खेळ सुरू होता. मात्र वादळ पुढे सरकताच यंत्रणा कामाला लागली. रत्नागिरी जिल्ह्यात इतर तालुक्यात नुकसानीची पाहणी, पंचनामे आदी कामे दुपारी २ वाजता सुरू झाली होती. रस्त्यांवर पडलेली झाडे दूर करून वाहतूक सुरळीत करण्याचे काम सुरू झाले होते. स्वतः जिल्हाधिकारी लक्ष्मीनारायण मिश्रा आणि पोलीस अधीक्षक डॉ. प्रवीण मुंढे यांनी यंत्र हाती घेऊन यात सहभाग घेतल्याने स्थानिकांना या आपत्तीतून पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा मिळाली.



रत्नागिरी जिल्ह्यात नुकसानग्रस्त भागात पाहणी करताना पालकमंत्री तथा परिवहन मंत्री ॲड. अनिल परब.

## तातडीची मदत

अनेक भागात रस्ते वाहतूक आणि वीज पूर्णपणे विस्कळीत होती. दळणवळण साधने ठप्प झाली असली तरी नियोजन असल्याने पुन्हा जनजीवन सुरळीत करण्याचे काम मात्र गतिमान पद्धतीने सुरू झाले होते. या भागात ४७ वीज उपकेंद्रे जमिनदोस्त झाली होती. परिणामी ६२८ गावांचा वीजपुरवठा थांबला. पंचनाम्याचे काम सुरू झाली. दरम्यान मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तातडीची मदत म्हणून १०० कोटी रुपयांचा निधी जाहीर केला होता. यापूर्वी मदत देताना जे निकष होते ते कालबाह्य ठरलेले असल्याने नव्या निकषानुसार मदत वाटपाचा महत्त्वाचा निर्णय शासनाने घेतला. यात मच्छीमार बांधवांचे नुकसानही दोन पटीने वाढवण्याचा निर्णय महत्त्वाचा आहे.

चक्रीवादळ झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसात ५०० गावांचा वीजपुरवठा सुरळीत झाला. आता तो पूर्ण झाला आहे. वाढीव निकषांप्रमाणे मदत देण्याची घोषणा झाल्याने नुकसानीचे फेरअंदाज व पंचनामे झाले. आतापर्यंत ११६.७ कोटी रुपये मदत वाटपासाठी प्राप्त झाले. घरांच्या नुकसानीबाबत वाटप पूर्ण होत आले आहे.

नारळ आणि सुपारी झाडांना झाडनिहाय मदत दिली जाणार आहे. ती रक्कम पुन्हा निश्चित करून ती वाटप करण्यात येणार आहे. पालकमंत्री तथा परिवहन मंत्री ॲड. अनिल परब यांनी याबाबत आग्रही भूमिका घेतली. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी पूर्ण काळ मदत व पुनर्वसनाबाबत मार्गदर्शनाचे काम या काळात केले. मदत व पुनवर्सन मंत्री विजय वडेट्टीवार, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, फलोत्पादन आणि माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री कुमारी आदिती तटकरे यांनी वेळोवेळी नागरिकांना आश्वस्त केले.

जिल्हा माहिती अधिकारी, रत्नागिरी

प्रतिचौरस किलोमीटर २ लाख २७ हजार १३६ व्यक्ती एवढी लोकसंख्येची घनता असलेल्या आणि दररोज शेकडो कोरोना संसर्गाचे केंद्र ठरलेल्या धारावी सारख्या अत्यंत आव्हानात्मक परिसरात जर कोविडवर नियंत्रण मिळवता येऊ शकते, तर जगात इतर कुठेही सुव्यवस्थित प्रयत्नांतून कोरोना नियंत्रणात आणला जाऊ शकतो, असा संदेश धारावीच्या उदाहरणाने जगाला दिला.

# 'रोल मॉडेल' धारावी





**तानाजी कांबळे**

महापालिकेच्या स्तरावर करण्यात आलेले नियोजन आणि त्याची काटेकोरणपणे अंमलबजावणी यामुळे धारावीतील संसर्ग नियंत्रणात आणता आला. जागतिक आरोग्य संघटनेसह केंद्र सरकारनेही बृहन्मुंबई महापालिकेच्या कामांची आणि धारावी पॅटर्नची दखल घेत धारावी पॅटर्नचे कौतुक केले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील धारावी परिसर म्हणजे जगातील सगळ्यात मोठा झोपडपट्टी परिसर, अशी ओळख असणारा एक आव्हानात्मक परिसर. केवळ अडीच चौरस किलोमीटरच्या धारावीमध्ये ५ लाख ६७ हजार ८४० नागरिक राहतात. या परिसरात रोज कामानिमित्त येणाऱ्यांची संख्या जमेस धरली तर ती संख्या निश्चितच ८.५ ते ९ लाखांच्या घरात जाईल.

धारावीतील अनेक छोट्या-छोट्या खोलीवजा घरांमध्ये १०-१० व्यक्ती राहतात. अशा या दाट लोकवस्तीच्या परिसरात एप्रिल महिन्यात कोरोनाचा पहिला रुग्ण सापडल्यानंतर महाराष्ट्राचीच नव्हे, तर देशाची चिंता वाढणे स्वाभाविक होते. मात्र बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या यंत्रणेने धारावीकरांना विश्वासात घेत धारावीमध्ये सर्वस्तरीय उपाययोजना प्रभावीपणे राबवल्या आणि यातून तयार झालेला 'धारावी पॅटर्न' संपूर्ण जगाचे 'रोल मॉडेल' ठरला !



'आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी व दाट लोकसंख्या असलेल्या धारावीने स्वयंशिस्तीने आणि सामूहिक प्रयत्नांतून कोरोनावर नियंत्रण ठेवता येते हे जगाला दाखवून दिले आणि कोरोनाविरुद्धच्या लढ्यातील रोल मॉडेल म्हणून जागतिक स्तरावर नाव नोंदवले. महापालिका प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक धारावीकर यांच्या एकात्मिक प्रयत्नांचे हे फलित म्हणावे लागेल.'

**- श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे, मुख्यमंत्री**

## देशाला धारावीची काळजी !

बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रात ११ मार्च २०२० रोजी पहिला कोरोनाचा रुग्ण सापडला आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने कोरोनाचे रुग्ण वाढू लागले. मुंबईतील धारावी परिसरात कोरोनाचा संसर्ग वाढू लागला. हा परिसर केवळ मुंबईकरांसाठी आणि संपूर्ण देशासाठी चिंतेचा विषय ठरला.

या परिसरात दिवसाला कोरोनाचे शेकडो रुग्ण आढळून येत होते. १ एप्रिल २०२० पासून धारावीत सुरू झालेल्या कोरोनाने दीड-दोन महिन्यातच रौद्र रुप धारण केले. सामाजिक दूरीकरण, स्वतंत्र शौचालय आणि सुरक्षित साधने हे कोरोना संसर्ग रोखण्याचे व टाळण्याचे सूत्र आहे. मात्र, या सूत्रांची अंमलबजावणी धारावीसारख्या दाट लोकवस्तीच्या आणि सुमारे साडेचारशेपेक्षा अधिक सार्वजनिक शौचालये असणाऱ्या परिसरात करणे कठीण होते. काहींसाठी ही वस्तीच दिसायला केवळ एक झोपडपट्टी असेलही.

मात्र, येथे सुमारे १ हजार कोटी रुपयांची उलाढाल असलेले ५ हजारांपेक्षा अधिक उद्योग आहेत. येथील बाजारपेठ ही जगाच्या बाजारपेठेला पूरक असल्याने जगालाही या वस्तीबद्दल कुतूहल वाटणे स्वाभाविक आहे.

## मनपा कर्मचाऱ्यांचे 'वर्क इज होम' !

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जगभरात 'वर्क फ्रॉम होम'चा बोलबाला होत असताना, महापालिकेचे सर्वच अधिकारी आणि कर्मचारी महापालिका आयुक्तांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवत अक्षरश: दिवसरात्र एक करत आपापल्या कामांचे पद्धतशीर नियोजन आणि परिणामकारक अंमलबजावणी करत आहेत. अनेक कर्मचारी कर्तव्यावर येण्यासाठी आठ तासांचा प्रवास करताहेत तर काही कर्मचारी सलग आठवडा-पंधरवडा रुग्णालयातच किंवा कार्यालयाच्या जवळपास जिथे जागा मिळेल, तिथे राहून मुंबईकरांची सेवा करत आहेत. त्यामुळेच महापालिकेचे कर्मचारी हे 'वर्क फ्रॉम होम' नव्हे, तर 'वर्क इज होम' या पद्धतीने काम करत आहेत.

## सूक्ष्म नियोजन

बृहन्मुंबई महापालिकेच्या सर्वच २४ प्रशासकीय विभागात सदोदित सूक्ष्म नियोजन अव्याहतपणे करण्यात येते. यामध्ये घर, सोसायटी, रस्ता, गल्ली अशा सर्वच बाबींचा विचार करून नियोजन करण्यात येते. धारावी परिसराचा समावेश असलेला 'जी उत्तर' विभागाचे साहाय्यक



'जगभरात अशी अनेक उदाहरणे आहेत त्यांनी सिद्ध केलंय की कोरोनाचा उद्रेक भीषण असला तरी त्याला आळा घालता येऊ शकतो. त्यापैकी काही उदाहरणे म्हणजे इटली, स्पेन, दक्षिण कोरीया आणि मुंबईतली घनदाट वस्ती असलेली धारावी. लोकसहभागातून होणाऱ्या सामाजिक उपक्रमावर भर देणे तसेच टेस्टिंग, ट्रेसिंग, अलगीकरण आणि सगळ्या रुग्णांवर उपचार या मूलभूत गोष्टी कोरोनाच्या संसर्गाची साखळी तोडण्यासाठी फार महत्त्वाच्या आहेत.'

**- डॉ. टेड्रोस अडहॅनम गेब्रेयेसुस, महासंचालक,**
**जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यु.एच.ओ.)**

आयुक्त किरण दिघावकर यांनी येथील गरजांचा आणि अपेक्षांचा परिपूर्ण विचार करत आपली रणनीती ठरवली. यानुसार धारावीचे अनेक छोटे विभाग कल्पून प्रत्येक विभागासाठी एक 'टीम' नेमली. या चमूतील प्रत्येक सदस्याला त्याचे काम नेमून दिले. धारावीतील प्रत्येक झोपडीचा विचार साकल्याने करण्यात येऊन अंमलबजावणी सुरू करण्यात आली.

## चतु:सूत्री

धारावीसह बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व २४ प्रशासकीय विभागांमध्ये नियोजनबद्ध पद्धतीने विविध स्तरीय उपायोजना अव्याहतपणे राबवण्यात येत आहेत. यामध्ये प्रामुख्याने 'चेस द वायरस' आणि 'ट्रेसिंग-टेस्टिंग-ट्रॅकिंग-ट्रिटिंग' या चतु:सूत्रीवर आधारित उपाययोजनांचा समावेश आहे. याअंतर्गत बाधित रुग्णांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींचा शोध घेत संबंधित व्यक्तींचे अलगीकरण (विलगीकरण) करणे, आवश्यकतेनुरूप संशयितांच्या व बाधितांच्या वैद्यकीय चाचण्या करणे आणि लक्षणे असलेल्या बाधितांवर 'सुनिश्चित कार्यपद्धतीनुसार' अर्थात 'मेडिकल प्रोटोकॉल'नुसार औषधोपचार करण्याचा समावेश आहे. २४ तासांच्या आत महापालिकेकडे चाचण्यांचा अहवाल प्राप्त होतो व त्याप्रमाणे सुनिश्चित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्यात येते. त्याचबरोबर बाधित रुग्णाच्या निकटच्या संपर्कातील व्यक्तींची वैद्यकीय चाचणी करण्याची व आवश्यकतेनुरूप १४ दिवसांचे अलगीकरण करण्याची प्रक्रिया प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. 'को-मॉर्बिडिटी' असणाऱ्यांसह ज्येष्ठ नागरिकांच्या रक्तातील प्राणवायूची पातळी व शरीराचे तपमान या बाबींची तपासणी घरोघर जाऊन मोहीम स्वरूपात करण्यात येते. तसेच महापालिकेने 'फीव्हर क्लिनिक'सारखा उपक्रम राबवून ज्यांना गरज आहे, त्यांना वेळेवर औषधोपचार मिळतील, याकडे प्राधान्याने लक्ष दिले.

## मिशन झिरो : शीघ्रकृती कार्यक्रम

धारावीसह बृहन्मुंबई महापालिका

## शासन व प्रशासन सज्ज

बृहन्मुंबई महापालिकेद्वारे अविरतपणे करण्यात आलेल्या या कामगिरीमागे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे वेळोवेळी मिळालेले प्रेरणादायी मार्गदर्शन तर आहेच, त्याचबरोबर मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री अस्लम शेख, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, मुंबईच्या महापौर श्रीमती किशोरी पेडणेकर यांच्यासह महापालिकेतील मान्यवर पदाधिकाऱ्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाला वेळोवेळी केलेले बहुमोल मार्गदर्शनही आहे. तसेच मुंबईतील सर्व खासदार व आमदार आणि महापालिकेतील नगरसेविका व नगरसेवक यांचेही बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन महापालिका प्रशासनाला वेळोवेळी लाभले आहे व लाभत आहे. महापालिका आयुक्त इकबाल सिंह चहल, अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) श्रीमती अश्विनी भिडे, अतिरिक्त महापालिका आयुक्त (शहर) संजीव जयस्वाल, अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) पी. वेलरसु आणि आरोग्य विभाग सांभाळणारे अतिरिक्त महापालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) सुरेश काकाणी यांच्या मार्गदर्शनानुसार महापालिकेच्या सर्वच अधिकाऱ्यांनी आपापल्या स्तरावर सूक्ष्मस्तरीय नियोजन केले. यामुळेच आज धारावीसह मुंबईतील कोविड परिस्थिती नियंत्रणात आहे, असे निश्चितपणे म्हणता येते.

## प्रत्यक्ष पाहणी



भारतीय प्रशासकीय सेवेतील इकबाल सिंह चहल यांनी ८ मे २०२० रोजी बृहन्मुंबई महापालिकेच्या आयुक्त पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर दुसऱ्याच दिवशी धारावी परिसराला भेट दिली. पायी चालत हा परिसर पिंजून काढला. धारावीकरांशी आणि तिथे काम करणाऱ्या महापालिका कर्मचाऱ्यांशी मनमोकळा संवादही साधला. पीपीई किट परिधान करत महापालिकेच्या नायर कोविड रुग्णालयाला देखील भेट देत तेथील डॉक्टर, नर्स, कर्मचारी आणि रुग्णांशीही संवाद साधला. यानंतर महापालिका आयुक्तांच्या मार्गदर्शनात महापालिकेच्या सर्वच खात्यांनी सूक्ष्मस्तरीय नियोजन आणि त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली.

क्षेत्रात 'कोविड-१९'ची रुग्णसंख्या शून्यावर आणण्यासाठी शीघ्रकृती कार्यक्रमाची अभियान स्वरूपात अंमलबजावणी करण्याचा कार्यक्रम बृहन्मुंबई महापालिकेने हाती घेतला. या प्रयत्नांना लोकप्रतिनिधींसह सामाजिक संस्थाचे सहकार्य लाभत असून या प्रयत्नांना आता यश येत आहे. जुलै अखेरीस मुंबईतील रुग्ण दुपटीचा सरासरी कालावधी ७६ दिवसांवर गेला. धारावीमध्ये हाच कालावधी ८४ दिवसांवर, तर वांद्रे पूर्व आणि खार पूर्व परिसरात तब्बल १६६ दिवस तर कुर्ला परिसरात १०८ दिवस इतका आहे. ज्या भागांमधील रुग्णदुप्पटीचा कालावधी सरासरीपेक्षा कमी असेल, त्या विभागांमध्ये शीघ्रकृती कार्यक्रम नियमितपणे राबवण्यात येत आहेत. या अंतर्गत प्रामुख्याने ५० फिरते दवाखाने विविध परिसरांमध्ये जाऊन प्राथमिक तपासणी करून बाधितांचा शोध घेत आहेत. गरज असणाऱ्या भागांमध्ये २ ते ३ आठवडे मिशन मोडमध्ये हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. मुंबई पोलिसांच्या मदतीने धारावीमध्ये कंटेनमेंट झोनची अंमलबजावणी काटेकोरपणे होत आहे.

## निर्जंतुकीकरण

झोपडपट्टी परिसरांसह इतर परिसरात असणाऱ्या ४५० पेक्षा अधिक सार्वजनिक शौचालयांचे सातत्याने निर्जंतुकीकरण केले जाते. तसेच सार्वजनिक शौचालयांमध्ये साबण, सॅनिटायझर असण्याकडे लक्ष पुरवण्यात येते.

## विभागस्तरीय 'वॉर रुम'

बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील बाधित रुग्णांसह त्यांच्या निकटच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींची चाचणी वेळच्यावेळी होऊन त्यापैकी 'पॉझिटिव्ह' चाचणी अहवाल हे महापालिकेकडे २४ तासात उपलब्ध व्हावेत, तर यापैकी ज्यांना गरज असेल त्यांना महापालिका क्षेत्रातील सार्वजनिक किंवा खासगी रुग्णालयात किंवा जम्बो फॅसिलिटी असलेल्या उपचार केंद्रात वेळच्यावेळी 'बेड' उपलब्ध व्हावेत, यासाठी महापालिकेच्या सर्व म्हणजे २४ प्रशासकीय विभागांमध्ये विभागस्तरीय 'वॉर रुम' कार्यान्वित करण्यात आल्या. या विकेंद्रित व्यवस्थापनामुळे गरजूंना त्यांच्या परिसरानिकटच्या रुग्णालयात 'बेड' मिळण्याच्या शक्यतेसह तुलनेने लवकर उपचार सुरू होण्यास गती मिळाली.

## फिल्ड हॉस्पिटल

नागरिकांची गरज लक्षात घेऊन मुंबईतील अनेक ठिकाणी अत्यल्प कालावधीत 'जम्बो फॅसिलिटी' रुग्णालये उभारण्यात आली. याच धर्तीवर धारावीमध्ये २०० खाटांचे एक 'फिल्ड हॉस्पिटल' महापालिकेने केवळ १५ दिवसात उभारले. विशेष म्हणजे या केंद्रात लागणारी साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात मोलाचा वाटा उचलला तो सुप्रसिद्ध अभिनेते अजय देवगण यांनी. धारावीतील 'साई हॉस्पिटल' व 'प्रभात नर्सिंग होम' या दोन्ही खासगी रुग्णालयांच्या व्यवस्थापनाने पालिका प्रशासनाला सहकार्य केल्यामुळे रुग्णांना अधिक चांगले उपचार मिळण्यास मदत झाली. यासोबतच धारावी परिसरात अनेक छोटे दवाखाने आहेत. या डॉक्टरांनी महापालिकेला आवश्यक ते सहकार्य केले.

## कामगारांच्या जेवणाची सोय

धारावी परिसरात सुरू असलेल्या विविध कामांना अनेक स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी विविध प्रकारे मदत केली. त्याचबरोबर 'क्राऊड फंडिंग' पद्धतीने बहुमूल्य मदत वेळोवेळी मिळाली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या 'लॉकडाऊन'मुळे धारावी परिसरातील लघुउद्योगांमध्ये कार्यरत अनेक कामगारांची पालिकेच्या वतीने माहिती घेऊन, त्यांच्या दोन वेळच्या जेवणाची सोय केली.

## इतर उपक्रम

धारावीत मोठ्या प्रमाणात अलगीकरण करण्यात आलेल्या नागरिकांच्या मनातील कोरोनाची भीती दूर करण्यासाठी अलगीकरण कक्षात योग, व्यायाम, मनोरंजन कार्यक्रम, ध्यान साधना या मार्गांचा अवलंब करण्यात आला. धारावी परिसरात घरोघरी करण्याबत आलेले सर्वेक्षण, तपासणी आणि अलगीकरण, उपचार आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नागरिकांचे मिळालेले बहुमोल सहकार्य; या सर्व बाबींचा सुयोग्य मेळ म्हणजे 'धारावी मॉडेल'. या परिसरातील नागरिकांनी आता आणखी एक सकारात्मक पाऊल 'प्लाझ्मा डोनेशन'च्या निमित्त टाकले आहे. कोरोना संसर्ग होऊन बरे झालेल्या धारावी परिसरातील अनेक व्यक्ती आज स्वत:हून 'प्लाझ्मा डोनेशन' करण्यासाठी पुढे येत आहेत. दररोज शेकडो कोविड संसर्गाचे केंद्र ठरलेली धारावी जगाच्या कौतुक आणि अनुकरणाचा विषय ठरला आहे.

**जनसंपर्क अधिकारी (प्र.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**कोरोना विषाणूने अवघ्या जगाला विळखा घातला असला तरी योग्य उपचार घेऊन कोरोनावर मात करता येणे शक्य आहे. नवजात बालकापासून ते वयोवृद्ध आजी-आजोबांपर्यंत सर्वच कोरोनावर सहज मात करत आहेत. आपण खंबीर राहिलो तर कोरोना आपल्या शरीरात जास्त काळ राहू शकणार नाही, याची प्रचिती देणाऱ्या या काही यशकथा.**

# आम्ही जिंकलो...

## योग्य उपचारांमुळे जीवनदान

कोरोनाला घाबरू नका पण जागरूक राहा. आरोग्य विभागाकडून चांगले उपचार व सेवा नक्कीच मिळत असते. कोरोना झाल्यानंतर रुग्णालयात मिळालेले चांगले उपचार व सेवेमुळेच आम्ही आमच्या परिवारात सुखरूप परतू शकलो. अशा प्रातिनिधिक भावना कोरोनातून पूर्णपणे बरे होऊन घरी परतलेल्या जळगाव जिल्ह्यातील काही रुग्णांनी बोलताना व्यक्त केल्या.

## विश्वास सार्थ ठरला

जळगाव शहरात राहणाऱ्या २८ वर्षाच्या महिलेस तपासणी अहवाल पॉझिटिव्ह येताच शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. कोरोना झाल्याची प्रथम भीती वाटली पण तेथे रूग्णालयातील डॉक्टर, पारिचारिका यांनी दिलेला विश्वास, दाखवलेली ममता आणि वाढवलेले मनोबल यामुळे आपण बरे होऊन घरी लवकर परत जाऊ हा आपल्याला विश्वास वाटू लागल्याचे त्या सांगतात. हा विश्वास सार्थ ठरला. २१ मे रोजी पूर्णपणे बरे होऊन घरी परतले. घरच्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद हा मला मिळालेल्या उपचाराने मिळवून दिला असे त्या सांगतात. कोरोना विषाणूचा संसर्ग झाला तरी आवश्यक खबरदारी घेतल्याने तो बरा होऊ शकतो. त्याचा उगाच बाऊ करण्याचे कारण नाही. आपल्याला शासकीय रूग्णालयात उत्तम सेवा मिळत असते यावर विश्वास ठेवा, असा सल्ला त्या कोरोनाग्रस्तांना देतात.

## सुखरूप परतलो

जळगावच्या एकाच परिवारातील दोन महिलांना कोरोनाची लागण झाली. दोघींचाही १० मे रोजी तपासणी अहवाल पॉझिटिव्ह येताच येथील शासकीय कोरोना रुग्णालयात दाखल केले गेले. डॉक्टरांकडून नियमित उपचार व वेळेवर औषधे मिळत होती. रुग्णालयात चांगल्या दर्जाचा चहा, नाश्ता, जेवण मिळाल्याने औषधांचा सकारात्मक परिणाम लवकर झाल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. आमच्यावर चांगला इलाज झाल्याने आम्ही आमच्या कुटुंबात सुखरूप परतल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## तीन महिन्याची चिमुकली



कोरोनावर मात केल्यानंतर तीन महिन्याच्या चिमुकलीला आईसह निरोप देताना आरोग्य यंत्रणा.

जळगाव जिल्ह्यातील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील कोरोना सेंटरमधील कोरोनाबाधित रुग्णांपैकी सर्वप्रथम कोरोनावर विजय मिळवण्याचा मानही याच चिमुकलीचाच.

## शासकीय रुग्णालयात उपचार

अमळनेरच्या ५६ वर्षांच्या व्यक्तीनेही योग्य उपचार मिळाल्यामुळे बरे झालो असल्याचे म्हटले. कोरोनाची लक्षणे दिसू लागताच त्यांना जळगावला दाखल केले गेले होते. 'मनात काहीशी भीती होती. पण तेथे मिळणारा उपचार मला धीर देणारा ठरला. डॉक्टर आणि परिचारिकांच्या सहकार्याने चांगले उपचार झाल्याने २० मे रोजी घरी परतू शकलो. शासकीय रुग्णालयातदेखील चांगले उपचार होतात असे मी आवर्जून सांगतो' असे ते विश्वासाने सांगतात.

## कर्मचाऱ्यांनी मनोबल वाढवले

पाचोऱ्याचा २१ वर्षाचा युवक म्हणाला, मला लक्षणे जाणवू लागताच पाचोऱ्याच्या ग्रामीण रूग्णालयात गेलो. त्यांनी तातडीने जळगावला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील वसतिगृहात ८ मे रोजी क्वारंटाइन केले. ९ मे रोजी पॉझिटिव्ह रिपोर्ट येताच जळगावच्या कोविड रुग्णालयात हलवले. पॉझिटिव्ह रिपोर्ट येताच भीतीचे वातावरण पसरले. रूग्ण परतणार नाही अशी भावना सर्वसाधारणपणे जनमानसातून व्यक्त होते. मात्र मी अजिबात डगमगलो नाही. रुग्णालयातील उपचार करणाऱ्या सर्व वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बरे होण्याचा आत्मविश्वास दिला. त्यामुळे माझे मनोबल वाढले. रुग्णालयातील डॉक्टर करीत असलेल्या

उपचारावर पूर्ण विश्वास ठेवला. इलाजादरम्यान सकारात्मक राहिलो. त्यामुळे जीवनदान मिळून मी पूर्ण बरा होऊन २१ मे रोजी घरी परतलो.

### संपूर्ण कुटुंब झाले बरे

जळगावच्या वाघनगरात राहणाऱ्या एकाच कुटुंबातील १३ जणांना कोरोनाची लागण झाली. घरात एका व्यक्तीला कोरोना झाला. मात्र तो लवकर लक्षात न आल्याने त्यांना गमवावे लागल्याचे दु:ख त्यांच्या कुटुंबातील २३ वर्षाचा युवकाने व्यक्त केले, आम्हांला लक्षणे दिसताच आम्ही रुग्णालयात दाखल झालो. वेळेवर आम्हांला चांगले उपचार मिळाले आणि आम्ही घरी परतलो. आज घरातील सगळ्यांची प्रकृती ठणठणीत असल्याचे हा युवक आनंदाने सांगतो.

### दम्याचा त्रास तरी कोरोनावर मात

अमळनेर येथील (जि. जळगाव) चौधरी वाड्यातील रहिवासी असलेले एका ९२ वर्षीय आजोबांना दम्याचा आजार असतानाही केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर कोरोनाशी दोन हात करत त्यांनी कोरोनावर विजय मिळवला. त्यांची जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून सुटी करण्यात आली तेव्हा गल्लीतील नागरिकांनी त्यांच्यावर पुष्पवृष्टी करून त्यांचे स्वागत केले.

सुखदेव सखाराम महाजन (वय ९२) असे या आजोबांचे नाव. त्यांना सुरुवातीपासून दम्याचा त्रास होता. अमळनेर शहरात कोरोनाचा प्रभाव वाढल्यानंतर १० जून रोजी थोडा दम्याचा त्रास वाढून त्यांचा जीव घाबरत होता, सुरुवातीला नातू तुषार व मुलाने त्यांना खासगी रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांचे वय पाहता व्हेंटिलेटरची आवश्यकता असल्याने त्यांना १५ जून रोजी जळगाव येथील कोविड रुग्णालयात हलवण्यात आले होते. तेथे जाताच त्यांना डॉक्टरांनी तत्काळ व्हेंटिलेटर उपलब्ध करून दिले. तेथे त्यांचा स्वॅब घेतल्यानंतर अहवाल पॉझिटिव्ह आल्याने चिंता अधिकच वाढली. मात्र हे आजोबा उपचारास प्रतिसाद देत असल्याने रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांची विशेष काळजी घेतली. २ ते ५ दिवसानंतर त्यांना मध्ये व्हेंटिलेटरची गरज पडत होती. मात्र प्रकृतीत सुधारणाही दिसून येत होती. या वेळी त्यांचा आत्मविश्वास आणि इच्छाशक्ती प्रचंड असल्याने मला काहीच होणार नाही. मी निश्चितपणे ठणठणीत होऊन घरी जाणार असल्याचे ते वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना सांगत. त्यांची काळजी घेण्यासाठी नातू तुषार चौधरी हा स्वतः लक्ष ठेवून होता. तोही चांगली काळजी घेत होता. २० दिवस उपचार घेतल्यानंतर त्यांची प्रकृती बऱ्यापैकी सुधारली यामुळे पुन्हा त्यांचा स्वॅब घेऊन अहवाल तपासणीसाठी पाठविण्यात आला. हा अहवाल निगेटिव्ह आल्याने रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रचंड आनंद व्यक्त केला.


सुखदेव महाजन हे घरी आल्यानंतर त्यांनी भीतिग्रस्त असलेल्या नागरिकांना भयमुक्त केले. कोणताही आजार खरेतर आपल्यापेक्षा वरचढ नसतोच, आपली इच्छाशक्ती आणि आत्मबल मजबूत असले तर त्याला हरवणे अशक्य नसते. डॉक्टर मंडळी दैवीरूपात येऊन आपल्यावर उपचार करतात. मात्र त्या वेळी आपले मनोबल शाबूत ठेवणे हे आपले काम असते आणि ते ढासळले तर दैवीशक्तीही कमी पडते असा सल्लाही आजोबांनी दिला.

**– विलास बोडके,**
जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव

### बालके झाली कोरोनामुक्त

गेल्या दोन महिन्यांपासून आलेल्या कोरोनाच्या संसर्गात अनेकजण होरपळले आहेत. नाशिक जिल्ह्यातील रुग्णसंख्या दीड हजारपेक्षा जास्त झाली. यापैकी ९०० हून अधिक रुग्णांनी कोरोनाशी दोन हात करून हा लढा जिंकला आहे. मात्र या लढ्यात जिल्ह्यातील ८७ बालकांचाही समावेश असल्याने त्यांच्या पालकांसह आरोग्य यंत्रणेचाही जीव टांगणीला लागला होता. मात्र आरोग्य यंत्रणेचे योग्य उपचार, पालक आणि बालकांची उपचारपद्धतीला मिळालेली साथ त्यामुळे अलीकडेच जिल्ह्यातील ५६ बालके कोरोनामुक्त झाली आहेत. यात अगदी पाच दिवसाच्या नवजात बाळाचाही समावेश आहे. तसेच उर्वरित ३१ बालकेही लवकरच कोरोनामुक्त होऊन सुखरूप घरी परततील, असा विश्वास आरोग्य यंत्रणेने व्यक्त केला आहे.

जिल्ह्यात बालकांचीही रुग्णसंख्या तब्बल ८७ वर गेल्याने आरोग्य यंत्रणेपुढे



#### भीती ठेवली दूर

मी मालेगाव नगरपालिकेच्या रुग्णालयात परिचारिका आहे. माझ्यासह पती व मुलालाही कोरोनाची लागण झाली. आम्ही येथील कोरोना केअर सेंटरमध्ये ॲडमिट होतो. मुलाला कोरोना झाल्याने आम्ही खूप घाबरलो. परंतु त्याने उपचारास योग्य साथ दिली व आरोग्य विभागाने काळजी घेतली. त्यामुळे आम्ही तिघे आज कोरोनामुक्त आहोत.

**- मीनाक्षी दुधाणे, कोरोनामुक्त बालकाची आई, मालेगाव**

#### आरोग्य यंत्रणेचे यश

माझ्यासह पत्नी व माझा दोन वर्षांचा मुलगा असे तिघे कोरोनाबाधित झालो होता. आरोग्य यंत्रणेने वेळोवेळी गरम पाणी, काढा, जेवण देत आमची विशेष काळजी घेतली. आरोग्य यंत्रणेने अहोरात्र केलेल्या प्रयत्नांमुळे आमच्यासह मुलगा कोरोनामुक्त झाला आहे.

**- रईस शेख, सिडको, कोरोनामुक्त बालकाचे वडील, नाशिक**

मोठा पेच उभा राहिला होता. या मुलांना परिस्थिती समजावून सांगणे, त्यांना परिवारापासून दूर ठेवणे, वेळेवर उपचार करणे अशी तारेवरची कसरत आरोग्य यंत्रणेने केली. बालकांना कोरोना संसर्ग होण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. लक्षणेदेखील सौम्य असतात. त्यामुळे अशा बालकांसह त्यांच्या पालकांच्या समुदेशनावर भर दिला. त्यांना सर्वसाधारण औषधी देण्यात आली. नवजात बालकांची प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी स्तनपान गरजेचे होते. त्यामुळे बालकांसह आईचीदेखील खूप काळजी घेतली गेली. त्यामुळे आज ० ते १२ या वयोगटातील ५६ बालके कोरोनामुक्त झाली आहेत.

**जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक**

## चिमुकलीची कोरोनावर मात



नंदुरबार जिल्हा रुग्णालयात उपचार घेत असलेल्या ६ वर्षाच्या चिमुकलीसह ६६ वर्षीय वयोवृद्धाने कोरोनावर मात केली. या विषाणूच्या विरोधातील लढाई आपण जिंकल्याचे समाधान रुग्णालयामधून बाहेर पडताना त्यांच्या चेहऱ्यावर पाहायला मिळाले.

## दोन वर्षांचा बालवीर

पंढरपूर तालुक्यातील वाखरी येथील कोविड सेंटर येथे उपचारासाठी दाखल असलेल्या दोन वर्षाच्या चिमुकल्याने कोरोनावर मात केली असून, चिमुकल्याला टाळ्यांच्या गजरात व फुलांचा वर्षाव करीत मोठ्या उत्साहात घरी सोडण्यात आले.

परदेशातून कुटुंबासह पंढरपुरात आलेल्या दोन वर्षाच्या बालकाचा तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आल्यानंतर त्याला तत्काळ वाखरी येथील एमआयटी कोविड केअर सेंटर येथे दाखल करून उपचार सुरू करण्यात आले. उपचारानंतर बालकाचे सर्व तपासणी अहवाल व चाचण्या निगेटिव्ह आल्यानंतर कोविड उपचार पथकाने बालकाला निरोप दिला.

**जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर**

## ८२ वर्षांच्या आजीही जिंकल्या


अकोला येथील रहिवासी असलेल्या आणि जिल्ह्यात उपचार घेत असलेल्या ८२ वर्षाच्या आजींनी कोरोनावर मात केली. योग्य उपचार, डॉक्टरांनी मायेने घेतलेली काळजी आणि दिलेला मानसिक आधार यामुळे या जीवघेण्या आजारातून मुक्त झाल्याची प्रतिक्रिया आजींनी व्यक्त केली.

अकोल्याहून वर्धा येथे आलेली एक व्यक्ती कोरोनाबाधित निघाल्यामुळे त्यांच्यासोबत आलेल्या त्यांच्या आईचीसुद्धा कोरोना चाचणी करण्यात आली. त्यांची चाचणी पॉझिटिव्ह आल्यावर त्यांच्यावर १६ जूनला सावंगी मेघे येथील विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू केले. त्यांनी उपचाराला चांगला प्रतिसाद दिला. चौदाव्या दिवशी तपासणी अहवाल निगेटिव्ह आल्यावर त्यांना घरी सोडण्यात आले.

**जिल्हा माहिती कार्यालय, वर्धा**

## अन्..भीती निघून गेली..!

सदाराम गणपत शिंदे, वय ५५ वर्षे, राहणार पाले बुद्रुक रोहा (जि. रायगड). ते रुग्णालयात दाखल होण्याअगोदर ८ दिवस आधीच मुंबईहून गावाला राहायला आले होते. ताप येत असल्याने गावातील डॉक्टरांनी त्यांना तात्पुरत्या तापाच्या गोळ्या देऊन लागलीच स्वॅब टेस्ट करायला सांगितले. दोन दिवसांनी श्री. शिंदे यांचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आला. पुढे त्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. त्यांना १०८ या रुग्णवाहिका सेवेतून अलिबाग येथील



जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या मनात भीती होती की, अलिबागला कोणीही ओळखीचे नाहीत आणि नातेवाईकसुद्धा सोबत नाहीत. २६ मे रोजी पहाटे २ वाजता त्यांना अतिदक्षता विभागामध्ये भरती करण्यात आले.

सदाराम शिंदे हे आधीपासूनच उच्च रक्तदाब आणि मधुमेहाचे रुग्ण. त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल केल्यावर तेथील डॉक्टरांच्या लक्षात आले की, त्यांच्या शरीरातील ऑक्सिजनची पातळी कमी झाली आहे. श्री. शिंदे यांना तत्काळ ऑक्सिजन लावण्यात आला.

या परिस्थितीतही श्री. शिंदे जिल्हा रुग्णालयातील वॉर्डबॉयपासून ते डॉक्टरांपर्यंत सर्वजण या रुग्णालयात दाखल झालेल्यांसोबत कसे वागतात, त्यांना कशी सेवा देतात, याचे निरीक्षण करीत होते, अनुभवत होते. ते बरे झाल्यानंतर हे सर्व करताना जिल्हा रुग्णालयातील परिचारीका येथील रुग्णांशी एवढ्या आत्मीयतेने वागत होत्या की, त्यामुळे माझी भीती पूर्ण निघून गेली. येथील सर्व परिचारीका आमच्याशी एवढ्या आपुलकीने वागत होत्या की, आम्हाला कोरोना झाला आहे, याची बिलकूल जाणीव होऊ देत नव्हत्या. आमची अत्यंत मायेने विचारपूस करून आमचे मानसिक दडपण कमी करत होत्या. सर्व डॉक्टर्ससुद्धा खूप प्रेमाने आमची चौकशी करीत. सफाई कामगारसुद्धा वेळोवेळी साफसफाई करून वॉर्ड अतिशय स्वच्छ व सुंदर ठेवत होते. कोरोनाच्या संकटातून मुक्त होऊन पूर्ण बरा झाल्यावर मी जिल्हा रुग्णालयातून २ जून रोजी सुखरूपपणे घरी परतलो. अलिबाग जिल्हा रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी, परिचारीका व सफाई कर्मचारी या सर्वांनी आमची खूप सेवा केली.

**जिल्हा माहिती कार्यालय, रायगड**

**राज्य शासनाच्या सर्व यंत्रणा कोरोनाचा संसर्ग कमी होण्यासाठी रात्रंदिवस झटत आहेत. अशा बिकट परिस्थितीत कुणी शर्थीचे प्रयत्न करत आहेत तर कुणी प्रयोगशील राहून बदल घडवण्याचा प्रयत्न करत आहे. कोरोना विषाणूवर मात करण्यासाठी वैयक्तीक तसेच प्रशासकीय पातळीवर अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत. प्रशासन, आरोग्य यंत्रणा, पोलीस आणि अत्यावश्यक सेवेतील सर्व घटक कोरोनावर मात करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करत आहे. यापैकी काही निवडक उपक्रम व यशकथा..**

# कोरोना योद्धे

## नायरमध्ये विक्रमी रुग्णसेवा

कोरोना या विषाणूच्या संसर्गामुळे आरोग्य यंत्रणेवर मोठा ताण आला आहे. अशा स्थितीत रुग्णसेवेवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता अधिक असते. त्यात कोरोना पॉझिटिव्ह गर्भवतींची प्रसूती व बाळाचा कोरोनापासून बचाव करणे हे काम अत्यंत जिकिरीचे. मात्र या कामी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयातील डॉक्टर्सनी तत्परता दाखवत रुग्णसेवेचा वस्तुपाठ घालून दिला आहे. या



नायर रुग्णालयातील स्त्री रोग व प्रसूती शस्त्रक्रिया विभागातील कोविड योद्धे डॉक्टर्स.

रुग्णालयात लॉकडाऊन काळात १४ एप्रिलपासून आतापर्यंत (३१ जुलै) तब्बल ५२० कोरोना पॉझिटिव्ह गर्भवतींची यशस्वी प्रसूती करण्यात आली आहे. एखाद्या कोविड केअर सेंटरमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रसूती होणे हा एक विक्रम आहे.

या रुग्णालयात लॉकडाऊन काळात एकूण ७५४ गर्भवती रुग्णांवर उपचार करण्यात आले. त्यापैकी ७१९ महिला रुग्ण बरे होऊन त्यांना घरी सोडण्यात आले. येथे झालेल्या ५२० प्रसूतींमध्ये कोरोना पॉझिटिव्ह गर्भवती महिलांनी ५२३ बालकांना जन्म दिला. यामध्ये एक तिळे तर आठ जुळ्या जोड्यांचा समावेश आहे. या रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. मोहन जोशी, स्त्री रोग व प्रसूती शस्त्रक्रिया विभागप्रमुख प्रा. डॉ. गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नीरज महाजन, बालरोगतज्ज्ञ सुषमा मलिक, प्रो. डॉ. अलका गुप्ता, प्रो. डॉ. शैलेश कोरे यांच्या टीमने यासाठी अथक परिश्रम घेतले.

बृहन्मुंबई महापालिका व राज्य शासनाचीही वेळोवेळी मदत मिळाली असल्याचे रुग्णालयातर्फे सांगण्यात आले.

या विक्रमाची दखल स्त्री रोग व प्रसूतिशास्त्र यासंबंधीच्या फिगो (एफआयजीओ) या आंतरराष्ट्रीय संघाने घेतली असून त्यांच्या फिगो आंतरराष्ट्रीय नियतकालिकात याचा समावेश केला जाणार असल्याची माहिती नोडल अधिकारी डॉ. नीरज महाजन यांनी सांगितले.

## नवजात बालके कोरोनामुक्त

कोरोना पॉझिटिव्ह गर्भवतींच्या प्रसूती दरम्यान सिझेरियन, आईची बाधा बाळाला होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक



नायर रुग्णालयात प्रसूतीनंतर आईचा कोरोना संसर्ग बाळाला होणार नाही याची विशेष काळजी घेतली जाते.

होते. प्रसूतीदरम्यान काही बालके कोरोना पॉझिटिव्ह होती. त्या सर्वांची पुन्हा चाचणी केली गेली. त्यात ती निगेटिव्ह आली. गर्भात किंवा स्तनपानाने बाळाला संसर्ग होत नाही. परंतु हाताळण्यातून संसर्ग होऊ शकतो, त्याची खबरदारी येथील आरोग्य यंत्रणेने घेतल्याने येथे जन्मलेली नवजात बालके कोरोनाचा संसर्गापासून दूर राहिली. दरम्यान या रुग्णांच्या नातेवाइकांना साहजिकच चिंता लागून राहणे क्रमप्राप्त ठरते. अशा वेळी त्यांना आई व बाळाच्या तब्येतीविषयी माहिती देणे, त्यांचे समुपदेशन करणे व त्यांना धीर देण्याचे काम रुग्णालयाने केले.

**– टीम लोकराज्य**

## महाळूंगचे कोविड सेंटर आयएसओ

माळशिरस तालुक्यातील (जि. सोलापूर) महाळूंग येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कोविड केअर सेंटरला आयएसओ - ९००१ : २०१५ मानांकन प्राप्त झाले आहे. आरोग्य वर्धिनी इमारतीत अत्याधुनिक सोयी-सुविधायुक्त कोविड केअर सेंटर उभारण्यात आले आहे. कोविड केअर सेंटरला आयएसओ मानांकन मिळाल्याबद्दल पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी अधिकाऱ्यांचे कौतुक केले. त्याचबरोबर या आरोग्य केंद्राला अशा प्रकारे बहुमान मिळाल्याचा जिल्हा प्रशासनाला अभिमान आहे, असे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी सांगितले.

या सेंटरमध्ये हॅण्ड वॉश स्टेशन, टोमॅटिक सॅनिटायझर यंत्रणा बसविण्यात आली आहे. आर.ओ. प्लांट, अखंडित वीज पुरवठ्यासाठी जनरेटरची सुविधा लोकसहभागातून करण्यात आली आहे. उपचारासाठी वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी तसेच स्वच्छतेसाठी पुरेसे मनुष्यबळ २४ तास उपलब्ध आहे. कोरोनाबाधित रुग्ण व संशियत रुग्ण तपासणीसाठी व्यवस्था करण्यात आली आहे. आरोग्य अधिकारी कर्मचारी यांना पी.पी.ई.किट, फेस शिल्ड, एन-९५ मास्क, हॅण्ड ग्लोव्हज् तसेच उपचारासाठी पुरेसा औषध साठा उपलब्ध आहे.

संशियत रुग्णांसाठी ३४ बेड्सची तर कोरोना बाधित रुग्णांसाठी १८ बेड्सची व्यवस्था करण्यात आली. दाखल रुग्णांना प्राथमिक सुविधा देण्यात येतात. त्यामध्ये दैनंदिन वापरासाठी हॅण्डवॉश, सॅनिटायझर, मास्क, कपड्यांचा व अंगाचा साबण, तेल, पावडर, टॉवेल, नॅपकिन आदी वस्तू दिल्या जातात. रुग्णांना पौष्टिक आणि सकस आहार दिला जातो. आहार प्रत्येकाला डिस्पोजेल प्लेट व ताटात दिला जातो.



आयएसओ मानांकन मिळालेले सोलापूरच्या महाळुंग येथील कोविड केअर सेंटर.

## पॅटर्न कोरोनाच्या प्रतिबंधाचा!

सोलापूरला लागून असलेल्या विडी घरकूल आणि मुळेगावने (साईनगर) प्रशासनातील सर्व यंत्रणेसह कोरोनाला हरवण्याचा पॅटर्न तयार केला. २२० लोकसंख्येचे साईनगर (मुळेगाव) तर ६० हजार लोकसंख्येचे विडी घरकुल. दोन्हीही गावे सोलापूर शहराला लागून. रोज शहरात नागरिकांचा संपर्क. यातूनच कोरोनाचा संसर्ग वाढण्याची भीती प्रशासनाला होती. पालकमंत्री दत्तात्रय भरणे, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी वेळोवेळी महसूल, आरोग्य, पोलीस यंत्रणांच्या बैठका घेऊन सूचना केल्या होत्या. प्रशासनाने या दोन्ही ठिकाणी योग्य नियोजन, त्वरित उपचार आणि विलगीकरणाचा नावीन्यपूर्ण पॅटर्न राबवल्याने अलीकडेच रूग्ण सापडण्याचे प्रमाण शून्यावर आले आहे.

## फिव्हर क्लिनिक

विडी घरकूल शहराच्या जवळ असल्याने रुग्ण झपाट्याने वाढण्याची भीती प्रशासनाला होती. २८ मे २०२० रोजी पहिला रुग्ण सापडला. बघता बघता ही संख्या ४० वर गेली. मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या गेल्या. या ठिकाणी एकही शासकीय दवाखाना नसल्याने आरोग्य विभागाने ज्येष्ठ नागरिक क्लिनिक आणि फिव्हर क्लिनिक सुरू केले. लोकप्रतिनिधींच्या मदतीने नागरिकांना विश्वासात घेण्यात आले. जनजागृतीमुळे घरकूलमधील काही तरुण मदतीसाठी पुढे आले. नागरिकांच्यात जनजागृती करणे, त्यांच्या हालचाली टिपणे, जीवनाश्यक वस्तूंचा पुरवठा करणे अशी कामे १७५ कोरोना योद्ध्यांनी केली. रेशन दुकाने, मोबाईल एटीएम, जीवनाश्यक वस्तूंचा पुरवठा केल्याने नागरिकांचा सोलापूर शहरातला वावर कमी झाला. आरोग्य विभाग व पोलीस यंत्रणेने इथल्या नागरिकांचा कंटेन्मेंट झोनचा संपर्क तोडण्यास मदत केली. शिक्षक, आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्ती यांच्या १०० टीमद्वारे १२ हजार घरातील कुटुंबांचे सर्वेक्षण करून कोमॉर्बिड रुग्णांना वेगळे काढून त्यांना योग्य आधार दिला. ४० पॉझिटिव्ह कोरोना रुग्णांमधील ३८ रुग्ण बरे झाले (यात एका ८५ वर्षीय आजीबाईंचा समावेश) तर दोन रुग्णांचा कोविडने मृत्यू झाला (यात एका अपघाती मुलीचा समावेश तर दुसऱ्याला पोटाचा कॅन्सर होता). यामुळे हा परिसर कोरोनामुक्तीकडे वाटचाल करत आहे.



गावकऱ्यांना विश्वासात घेऊन आवश्यक सूचना देताना पोलीस व प्रशासकीय यंत्रणा.

## संपूर्ण गावकऱ्यांचे स्वॅब

साईनगरला याउलट स्थिती. येथे केवळ ५० घरे आणि २२० लोकसंख्या. मात्र निरक्षरतेमुळे नागरिकांमध्ये अनेक गैरसमजुती, चालीरिती. या परिस्थितीलाही प्रशासनाने योग्य पद्धतीने हाताळल्याने संसर्ग रोखण्यात यश आले. सुरुवातीला येथे संसर्ग वाढला होता. इवल्याशा गावात अल्पावधीत २७ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळले. पोलीस, महसूल यंत्रणेने

नागरिकांना विश्वासात घेऊन दिलासा दिला. सर्वांना एकत्र करून एकाच दिवशी २०७ नागरिकांचे स्वॅब घेण्यात आले. हा प्रयोग राज्यातील पहिलाच होता. जे रुग्ण पॉझिटिव्ह आले त्यांना तत्काळ विलगीकरण कक्षात ठेवण्यात आले. निगेटिव्ह अहवाल आलेल्यांना तिथेच ठेवून त्यांना सर्व सुविधा पुरवण्यात आल्या. शिवाय त्यांना आयुर्वेदिक आणि होमिओपॅथिकच्या गोळ्यांचाही पुरवठा करण्यात आला होता. सलग १० ते १५ दिवस पोलिसांचा पहाराही होता. याचा परिणाम चांगला झाला असून २७ पॉझिटिव्ह रुग्णांपैकी १९ रूग्ण बरे होऊन घरी आले. यात एकाचा मृत्यू झाला तर सात रुग्णांवर यशस्वी उपचार सुरू आहेत. ते सर्व लवकरच बरे होऊन गाव कोरोनामुक्त होईल. १८ जूननंतर साईनगर परिसरात अद्याप एकही रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळून आला नाही.

'लोकप्रबोधन आणि टीमवर्कने काम केल्याने साईनगर, विडी घरकूल येथील रुग्णसंख्या आटोक्यात आली असल्याचे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी सांगितले. येथील नागरिकांना आयसोलेशनमध्ये न ठेवता पोलिसांच्या मदतीने पूर्ण परिसरच आयसोलेट करून ड्रोनच्या साहाय्याने नागरिकांवर लक्ष ठेवल्याने रुग्णसंख्या आटोक्यात आणता आली असल्याचे पोलीस अधीक्षक मनोज पाटील यांनी सांगितले.

**– धोंडिराम अर्जुन,** माहिती सहायक,
जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर

## सिक्स मिनिट वॉक टेस्ट

सध्या अनेक रुग्ण कोरोनाची लक्षणे नसलेले आढळून आले आहेत. लक्षणे नसलेल्या प्रत्येकाची टेस्ट करणे शक्य होत नसल्यामुळे भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषदेने शिफारस केल्यानुसार सिक्स मिनिट वॉक टेस्टच्या माध्यमातून शरीरातील ऑक्सिजनची पातळी मोजून कोरोना संसर्गासाठी गंभीर जोखमीच्या असणाऱ्या व्यक्तींचा शोध घेण्यात येत आहे. दत्तपूर येथील प्रतिबंधित क्षेत्रात याचा पहिला प्रयोग करण्यात आला.

एखादा रुग्ण आढळल्यास प्रतिबंधित केल्या जाणारा परिसरही मोठा असतो. सध्या कोरोनाची अनेकांना लक्षणेदेखील दिसत नसल्याचे पुढे आले आहे. अशा स्थितीत रुग्णांचा शोध घेणेदेखील अवघड होते. प्रत्येकाची चाचणी करणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत रुग्ण आढळल्यानंतर प्रतिबंधित क्षेत्रातील नागरिकांची आणि विलगीकरणात असलेल्यांची माहिती संकलित ठेवण्याचे कार्य आशा सेविकेकडून केले जाते. त्यामुळे त्यांना अशी माहिती घेण्यासोबतच रुग्णांचीही माहिती मिळावी, याकरिता सिक्स मिनिट वॉक टेस्ट, एक मिनिट सिट अप टेस्टची माहिती देण्यात आली. या टेस्टच्या माध्यमातून रुग्णांची माहिती संकलित केली जात आहे. त्यामुळे कोरोनाची लक्षणे वरकरणी दिसत नसली तरीही रुग्णांची माहिती मिळण्यास मदत होत आहे.

दत्तपूर येथील प्रतिबंधित क्षेत्रात वैद्यकीय जनजागृती मंच आणि आय.एम.ए.च्या संयुक्त विद्यमाने याचे प्रात्यक्षिक करून दाखवत आशा सेविकांना माहिती देण्यात आली. यावेळी ४६ जणांची सिक्स मिनिट वॉक टेस्ट घेण्यात आली.

### अशी आहे टेस्ट

यामध्ये सिक्स मिनिट वॉक टेस्ट किंवा वन मिनिट सिट अप टेस्ट असे दोन पर्याय आहेत. सिक्स मिनिट वॉक टेस्टमध्ये सलग सहा मिनिट चालायचे आहे. तर वन मिनिट सिट अप टेस्टमध्ये एक मिनिट उठाबशा काढायच्या आहेत. जे चालू शकत नाही, त्यांना वन मिनिट सिट अप टेस्टचा पर्याय देण्यात येतो. टेस्टपूर्वी आणि टेस्टनंतर शरीरात रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण ऑक्सिमीटरने तपासले जाते. ऑक्सिजनची पातळी ९४ च्या खाली असल्यास व्यक्ती गंभीर परिस्थितीकडे वाटचाल करत असल्याची शक्यता असते. त्यामुळे त्यास उपचारार्थ दाखल केले जाते. यामध्ये कोरोनाच नव्हे तर अस्थमा, दमा, हृदयरोग, इतर फुफ्फुसाचे आजार, न्यूमोनिया या आजाराचीही माहिती मिळू शकते. त्यामुळे हाय रिस्ककडे जाऊ शकणाऱ्या व्यक्तीवर विशेष देखरेख ठेवता येते.



सिक्स मिनिट वॉक टेस्ट

### रुग्णाची माहिती मिळते लवकर

भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने (आयसीएमआर) शिफारस केलेली ही चाचणी आहे. अनेकदा आजाराची लक्षणे दिसत नाहीत. सहा मिनिटे चालल्यास ऑक्सिजनची पातळी कळून आजाराविषयी माहिती मिळते. यातून रुग्णांची लवकर माहिती मिळणे शक्य होते. पुढील काळात इतर प्रतिबंधित क्षेत्रामध्ये ही टेस्ट करण्याचा प्रयत्न राहील, असे जिल्हाधिकारी विवेक भीमनवार यांनी सांगितले.

**– मनीषा सावळे,**
जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा

## आकर्षक बांबू सॅनिटायझर स्टँड

आपल्या कल्पकतेसाठी व सामाजिक दायित्वासाठी अग्रेसर असणाऱ्या चंद्रपूर येथील बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राने कोरोना संसर्गाच्या काळात कार्यालयीन व घरी वापरासाठी उपयोगी ठरणारे बांबूचे सॅनिटायझर स्टँड तयार केले. लवकरच बाजारात हे स्टँड जनतेच्या सेवेसाठी

उपलब्ध होणार असल्याची माहिती केंद्राचे संचालक राहूल पाटील यांनी दिली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये गेल्या पाच वर्षांपूर्वी सुरू झालेल्या बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्रातून बांबूपासून विविध वस्तू तयार करण्याचे कार्य सुरू आहे. मोठ्या प्रमाणात कौशल्य आधारित रोजगार देणाऱ्या या संशोधन केंद्रातून अनेकांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी कौशल्य प्राप्त झाले आहे. या केंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे बांबूपासून सामान्य माणसाच्या जीवनात उपयोगात येणाऱ्या स्वस्त व आवश्यक टिकाऊ वस्तू तयार करण्याची प्रक्रिया होय. या केंद्रातून आतापर्यंत बांबूपासून सायकल, तिरंगी झेंडा, बांबूची तलवार, बांबूपासून तयार झालेले घरी वापरता येणारे सोफासेट, खुर्च्या - टेबल, याशिवाय या केंद्राची सुप्रसिद्ध बांबूची कव्हर असणारी डायरी देखील प्रसिद्ध आहे. या ठिकाणी पर्यवेक्षक म्हणून काम करणाऱ्या योगिता साठवणे यांच्या कल्पनेतून बांबू पासून सॅनिटायझर स्टँड तयार करण्याची कल्पना पुढे आली. या ठिकाणी डिझायनर म्हणून काम करणाऱ्या किशोर गायकवाड हस्तशिल्प निर्देशक व राजू हजारे बांबू कारागीर यांनी या कल्पनेला राहुल पाटील यांच्या मार्गदर्शनात आकार दिला. बांबू स्टँड चर्चेचा विषय असून लवकरच ते बाजारात उपलब्ध होणार आहे.

**– प्रवीण टाके,**
जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर



आकर्षक बांबू सॅनिटायझर स्टँड

## संशोधकासोबत 'मन की बात'

नाशिकच्या बागलाण तालुक्यातील शेतकरी आणि व्यावसायिक असलेले राजेंद्र जाधव संशोधक आहेत, त्यांनी कोरोनाच्या वाढत्या संसर्गाला रोखण्यासाठी अनोखे आंतरराष्ट्रीय दर्जाचे सॅनिटायझर फवारणी यंत्र विकसित केले आहे. या यंत्रामुळे कोरोनाच्या लढ्यासाठी मोठी मदत झाली आहे व होणार आहे. त्यामुळे या उल्लेखनीय निर्मिती कार्याचे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमात विशेष कौतुकोद्‌गार काढून संशोधकाचा गौरव केला.

कोरोनाविरुद्धच्या लढ्यासाठी 'मेक इन इंडिया'अंतर्गत संशोधित सॅनिटायझर मशीनमुळे कोरोना उच्चाटनाच्या युद्धाला मोठे बळ मिळाले आहे. राष्ट्रपती पुरस्कार विजेते संशोधक राजेंद्र जाधव यांच्या या शोधामुळे नाशिक जिल्ह्याची मान अभिमानाने उंचावली आहे.

झपाट्याने फैलावत असणाऱ्या कोरोनावर मात करण्यासाठी संभाव्य संसर्गित जागांची तातडीने फवारणी मनुष्यबळाचा वापर न करता करणे अत्यावश्यक ठरते. वऱ्हाणे (ता. बागलाण) येथील शेतकरी, संशोधक श्री. जाधव यांनी त्यांच्या शेतातील पिकांवर फवारणीसाठी यंत्र निर्मित केले होते. त्या यंत्राची उपयुक्तता तपासून कोरोना संकट काळात त्यांनी हे यंत्र सटाणा नगरपरिषदेला वापरासाठी दिले. आरोग्यखात्याच्या मानकाप्रमाणे या यंत्रामुळे कोरोना निर्जंतुकीकरणाच्या लढाईला मोठे बळ मिळाले. कोरोना संसर्गाच्या कठीण परिस्थितीत सॅनिटायझेशनसाठी या यंत्रामुळे आत्मनिर्भरतेची शिकवण मिळाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' मधून श्री. जाधव यांच्या संशोधक कार्याचा गौरवास्पद उल्लेख केल्याने यंत्रभूमी नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांची कुशलता देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहे.



सॅनिटायझर यंत्र संशोधक राजेंद्र जाधव

अवघ्या २५ दिवसांमध्ये राजेंद्र जाधव यांनी ट्रॅक्टरवर बसवता येऊ शकेल, अशी नावीन्यपूर्ण फवारा यंत्रणा विकसित केली. या फवाऱ्याच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर रस्ते, सोसायट्या, दारे, कुंपणाच्या भिंती अगदी स्वच्छ धुऊन काढणे शक्य होत आहे.

या स्वच्छता यंत्रामध्ये एका वेळेस ६०० लीटर जंतुनाशक मिश्रित द्रावण टँकरमध्ये ठेवण्याची सुविधा आहे. त्यामुळे या फवाऱ्याने कुंपणाच्या भिंती, दारे यांची स्वच्छता करणे सोयीचे आहे. या फवाऱ्याच्या मदतीने निर्जंतुकीकरणाच्या कामाचा आणखी एक फायदा म्हणजे, या कामामध्ये मानवी हस्तक्षेपाची फार कमी आवश्यकता भासते.

**– रणजितसिंह राजपूत,**
जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक

**राज्याने 'मिशन बिगिन अगेन'मधून झेप घेतली आहे. याअंतर्गत नवीन उपक्रमांना संमती दिली आहे. काही उपक्रमांवर निर्बंधही घालण्यात आले आहेत, अशा अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विविध विभागाचे मंत्री व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून विभागांचा आढावा घेत आहेत, महत्त्वपूर्ण निर्णय घेत आहेत, निर्देश देत आहेत यावर एक दृष्टिक्षेप.**

# अर्थचक्राला गती

## कोरोना उपचार सुविधेचे लोकार्पण

- भारतीय वैद्यक संशोधन परिषद (आयसीएमआर) ने देशातील तीन ठिकाणी उच्च क्षमतेच्या अद्ययावत चाचणी सुविधा उभारली आहे. महाराष्ट्रात मुंबई येथे राष्ट्रीय प्रजनन स्वास्थ अनुसंधान (एनआयआरआरएच) तसेच कोलकाता आणि नोएडा अशी ही तीन ठिकाणे आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या प्रयोगशाळांचे ऑनलाइन उद्घाटन नुकतेच करण्यात आले.
- मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील आरोग्य सेवेच्या पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी मुंबई मनपा आणि टाटा समूह यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणाऱ्या प्लाइमा प्रकल्पांतर्गत टाटा समूहातर्फे महापालिकेला २० रुग्णवाहिका, १०० व्हेंटिलेटर्स आणि दहा कोटींचे अर्थसाहाय्य मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत सुपुर्द करण्यात आले.



कल्याण-डोंबिवली कोविड काळजी केंद्र

- कोरोना रुग्णांच्या उपचारासाठी सिडकोच्या साहाय्याने मुलुंड येथे, मुंबई मेट्रोच्या सहकार्याने दहिसर येथे, सामाजिक उत्तरदायित्व निधीतून नमन समूहातर्फे महालक्ष्मी रेसकोर्स येथे आणि बीकेसी येथील १२० खाटांचे आयसीयू अशा ३ हजार ५२० बेड्सच्या जम्बो सुविधांचे लोकार्पण.
- मुलुंड येथे सिडकोमार्फत उभारण्यात आलेल्या १६५० खाटांच्या कोरोना रुग्णालयात १००० खाटा ऑक्सिजन सोयींयुक्त असून ६५० खाटा विलगीकरणासाठी आहेत. या ठिकाणच्या ५०० खाटा ठाणे महापालिकेसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.
- कल्याण येथील कोविड चाचणी प्रयोगशाळा आणि कल्याण तसेच डोंबिवली येथील समर्पित कोविड काळजी केंद्रांचे ऑनलाइन उद्घाटन करण्यात आले.

## 'आधुनिक भगीरथ' गौरव ग्रंथ व 'लोकराज्य'च्या विशेषांकाचे प्रकाशन

डॉ. स्व. शंकरराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने राज्य शासनाच्या साहित्य संस्कृती मंडळाने निर्मिती केलेल्या 'आधुनिक भगीरथ' या गौरवग्रंथाचे तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'लोकराज्य' मासिकाच्या विशेषांकाचे आणि दै. सत्यप्रभाच्या विशेषांकाचे प्रकाशन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व इतर मान्यवरांच्या हस्ते झाले. या वेळी विधान परिषदेचे सभापती रामराजे नाईक निंबाळकर, विधानसभा अध्यक्ष नाना पटोले, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, उद्योगमंत्री सुभाष देसाई, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, गृहमंत्री अनिल देशमुख, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड, पशुसंवर्धन मंत्री सुनील केदार, मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आदी उपस्थित होते.

साहित्य संस्कृती मंडळाने निर्मिती केलेल्या 'आधुनिक भगीरथ' या गौरवग्रंथाचे संपादन डॉ. सुरेश सावंत यांनी केले आहे. ६४० पृष्ठसंख्या असलेल्या.या गौरवग्रंथाची किंमत ८१८ रुपये एवढी आहे. हे पुस्तक चर्नीरोड, मुंबई येथील शासकीय मुद्रणालयात उपलब्ध आहे.



## पूर नियंत्रणासाठी समिती

पूर परिस्थितीत महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही राज्यात समन्वय व नियंत्रण राखण्यासाठी दोन्ही राज्याची त्रिस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असल्याची माहिती जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी दिली.

गतवर्षी सांगली व त्या भागात आलेल्या महापुराने महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही राज्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले तसे भविष्यात पुन्हा होऊ नये याकरिता करावयाच्या उपाययोजना व दोन्ही राज्यातील संबंधित अधिकारी यांचा योग्य समन्वय व्हावा. नुकसान व हानी होऊ नये याकरिता दोन्ही राज्यांचे जलसंपदा मंत्री व अधिकारी यांची एकत्रित बैठक नुकतीच झाली.



**जयंत पाटील**
जलसंपदा मंत्री

या बैठकीला कर्नाटक राज्याचे जलसंपदा मंत्री रमेश जारकीहोळी, अल्पसंख्याक मंत्री श्रीमंथ पाटील तसेच महाराष्ट्राचे सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, गृह राज्यमंत्री सतेज पाटील, सहकार राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकर, कर्नाटकचे स्लमबोर्ड अध्यक्ष महेश कुमार कुमाटल्ली, खासदार संजय पाटील, खासदार धैर्यशील माने, आमदार राजेश पाटील, आमदार विक्रम सिंह सावंत, कर्नाटक जलसंपदा विभाग अतिरिक्त मुख्य सचिव राकेश सिंह, महाराष्ट्र जलसंपदा अतिरिक्त मुख्य सचिव प्रविणसिंह परदेशी व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

- दहिसर येथे मुंबई मेट्रोच्या सहकार्याने ९५५ खाटांचे रुग्णालय उभारले असून त्या ठिकाणी १०८ खाटांचे आयसीयू उभारण्यात आले आहे. या रुग्णालयातील २०० खाटा मीरा-भाईंदर महापालिकेला उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नमन समूहातर्फे महालक्ष्मी रेसकोर्सवर ६०० खाटांची क्षमता असलेले कोरोना उपचार केंद्र सुरू करण्यात आले आहे.
- जालना जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या परिसरात उभारण्यात आलेल्या कोविड-१९ आरटीपीटीसीआर प्रयोगशाळेचे ई-पद्धतीने उद्घाटन करण्यात आले.
- उस्मानाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र परिसरात उभारण्यात आलेल्या उस्मानाबाद कोविड-१९ तपासणी प्रयोगशाळेचे लोकार्पण.
- नागोठणे येथील भारतीय एज्युकेशन संकुलात रिलायन्स इंडस्ट्रीजने उभारलेल्या ५० बेडची क्षमता असलेल्या कोविड केअर सेंटरचे ई-उद्घाटन करण्यात आले.

## शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेचा लाभ

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ३२.९० लाख पात्र शेतकऱ्यांची यादी पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली. २० जुलै, २०२० अखेर २७.३८ लाख खातेदारांना १७ हजार ६४६ कोटी रुपयांच्या रकमेचा लाभ देण्यात आला आहे. म्हणजेच एकूण प्रसिद्ध केलेल्या पात्र खातेदारांच्या यादीतील ८३ टक्के खातेदारांना या योजनेंतर्गत लाभ देण्यात आला.

## मराठा आरक्षण

मराठा आरक्षणासंदर्भात यापूर्वी जाहीर झालेल्या परंतु अद्याप प्रलंबित असलेल्या उपाययोजना व सवलती लागू करण्याबाबत शासन गांभीर्याने विचार करत असल्याचे मराठा आरक्षणसंदर्भातील उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी सांगितले.



**अशोकराव चव्हाण**
सार्वजनिक बांधकाम मंत्री

या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार हे विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते. या वेळी समितीचे सदस्य तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, कामगार मंत्री दिलीप वळसे पाटील, बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांच्यासह न्यायालयात राज्य शासनाची बाजू मांडणारे विधिज्ञ उपस्थित होते.

## आरक्षणाला अंतरिम स्थगिती नाही

पदव्युत्तर वैद्यकिय अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेतील मराठा आरक्षणाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला, ही अत्यंत समाधानाची बाब आहे. आरक्षणाला विरोध करणाऱ्यांनी वारंवार अंतरिम स्थगिती देण्याची मागणी केली. परंतु राज्य शासनाच्या वकिलांनी प्रभावी बाजू मांडली व विद्यार्थ्यांना दिलासा मिळवून दिला, याचा आनंद आहे, अशी प्रतिक्रिया मंत्री श्री. चव्हाण यांनी दिली.

## आरक्षणावरील सुनावणी समाधानकारक

मराठा आरक्षणासंदर्भात नुकत्याच झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने पदव्युत्तर वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेला स्थगिती दिली नाही. एवढेच नव्हे तर या प्रकरणाची व्याप्ती पाहता ही सुनावणी ऑनलाइन न करता प्रत्यक्ष करावी, याबाबतही सर्वोच्च न्यायालय गांभिर्याने विचार करीत असल्याचे दिसून आले. त्यामुळे ही सुनावणी समाधानकारक झाली.

मराठा आरक्षणाच्या विरोधकांकडून वारंवार स्थगितीची मागणी केली जाते. परंतु, न्यायालयाने कोणतीही स्थगिती देण्यास स्पष्ट नकार दिलेला आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील नोकरभरती

४ मे रोजीच्या शासन निर्णयान्वये थांबलेली आहे. शासनाच्या वकिलांनी ही बाब सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली व नोकरभरतीबाबत तातडीने कोणताही निर्णय घेण्याची आवश्यकता नसल्याचा युक्तीवाद केला. पदव्युत्तर वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेतील मराठा आरक्षणालादेखील कोणतीही स्थगिती मिळाली नाही. परंतु, मराठा आरक्षणाचे विरोधक याबाबत गैरसमज निर्माण करीत असल्याचे मंत्री.श्री चव्हाण यांनी सांगितले.

मराठा आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने सलग तीन दिवस व्हर्च्युअल सुनावणी करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, या प्रकरणाची व्याप्ती पाहता तसेच यामध्ये अनेक हस्तक्षेप याचिकाकर्ते असून त्यांनाही आपली बाजू मांडण्याची पुरेशी संधी मिळणे आवश्यक असल्याने ही सुनावणी ऑनलाइनऐवजी प्रत्यक्ष घ्यावी, अशी शासनाची भूमिका आहे. या संदर्भात राज्य सरकारच्या वकिलांनी आपली बाजू मांडली. या विनंतीवर सर्वोच्च न्यायालय गांभीर्याने विचार करीत असल्याचे दिसून आले. शिवाय काही तांत्रिक बाबी विचारात घेता हे प्रकरण संवैधानिक खंडपीठाकडे सोपवण्याची मागणी पुढे आली. त्याअनुषंगाने येत्या २५ ऑगस्टला सुनावणी घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाने जाहीर केले. या सुनावणीत शासनाच्या अपेक्षेप्रमाणे कल आला आहे. पुढील काळातही शासन भक्कमपणे बाजू मांडणार असून या प्रकरणाचा सकारात्मक निकाल आलेला दिसेल, असा विश्वास श्री. चव्हाण यांनी व्यक्त केला.

## पोलीस भरती प्रक्रिया

राज्यातील पोलीस दलामध्ये विविध पदांवर जवळपास १२ हजार ५३८ पदांच्या भरतीसाठी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना विभागाला देण्यात आल्या आहेत. डिसेंबरअखेर ही प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी सांगितले.



**अनिल देशमुख**
गृहमंत्री

या संदर्भातील बैठक नुकतीच मंत्रालयात झाली. सध्याच्या काळामध्ये पोलीस विभागाने अत्यंत महत्त्वाचे कार्य केले आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस शिपाई वर्गातील पदांची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे या संवर्गातील १०० टक्के रिक्त पदे भरणे आवश्यक आहे. पोलीस शिपाई गट क संवर्गातील २०१९ या भरती वर्षात रिक्त असलेली ५२९७ पदे व २०२० या भरती वर्षात सेवानिवृत्ती, पदोन्नती, राजीनामा यांमुळे रिक्त होणारी पोलीस शिपाई, पोलीस शिपाई चालक सशस्त्र पोलीस शिपाई या संवर्गातील एकूण ६७२६ पदे त्याचप्रमाणे मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयासाठी निर्माण करण्यात आलेल्या पहिल्या टप्प्यातील नवनिर्मित ९७५ पदांपैकी पोलीस शिपाई संवर्गातील ५०५ अशी एकूण १२५३८ पदे भरण्यात येणार आहेत. अशी माहिती श्री. देशमुख यांनी दिली.

## २०१९ मध्ये अर्ज केलेल्यांना दिलासा

२०१९ मध्ये होणाऱ्या पोलीस भरतीसाठी ज्यांनी महा आय. टी.पोर्टल मार्फत अर्ज केलेले आहेत. त्या अर्जाबाबत योग्य कार्यवाही केली जाईल. पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रिया लेखी परीक्षा, शारीरिक चाचणी, कागदपत्रांची पडताळणी, अशा विविध टप्प्यांवर पार पडत असल्याने ही प्रक्रिया दीर्घकाळ सुरू राहते. त्यामुळे एकाच भरती प्रक्रियेत जास्तीत जास्त पदे भरण्याबाबत विभाग विचार करत असल्याचे श्री. देशमुख यांनी सांगितले.

## प्लाझ्मा थेरपी

कोरोना रुग्णांच्या उपचारासाठी उपयोगी ठरत असलेल्या प्लाझ्मा थेरपीच्या उपचारावरून जनतेची फसवणूक होत असल्याचे काही प्रकार उघडकीस आले आहे. या प्रकाराबाबत जनतेने सावध राहावे, असे आवाहन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केले आहे.

कोरोनाच्या आजारातून बाहेर आलेल्या व्यक्तीच्या रक्तातील रक्तद्रव (प्लाझ्मा) काढून रुग्णाला दिला जातो. यामुळे कोरोना रुग्णाच्या प्रतिकार शक्तीमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास आल्याने या उपचार पद्धतीचा अवलंब करण्याचे प्रमाण वाढले आहे. यासाठी काही रुग्णालयांनी प्लाझ्मा बँक व प्लाझ्मा डोनेशन मोहीम सुरू केली आहे. या सुविधेचा काहीजण गैरफायदा घेत असल्याचे समोर आले आहे. लोकांच्या आर्थिक स्थितीचा फायदा घेत बनावट प्रमाणपत्रदेखील तयार केली जात आहे. सायबर गुन्हेगार यासाठी समाजमाध्यमांवर विविध पातळीवर काम करीत आहेत. त्यामुळे संबंधित लोकांनी या प्लाझ्मा थेरपीबाबत अधिक सजग राहण्याची आवश्यकता आहे. प्लाझ्मा डोनर (दाता) ऑनलाइन शोधतानाही काळजी घेण्याची आवश्यकता आहे. डार्क वेब आणि बेकायदेशीर वाहिन्यांवर प्लाझ्माच्या विक्री संदर्भात दाखवून फसवणूक होऊ शकते. त्याविरुद्ध कडक कारवाई केली जाईल.

या संदर्भात कोणालाही तक्रार करावयाची असल्यास जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा www.cybercrime.gov.in या संकेत स्थळावर नोंदवावी, असे आवाहन श्री. देशमुख यांनी केले आहे.

## 'डिजिटल ८ अ' सुविधेचा शुभारंभ

महसूल दिनाच्या पार्श्वभूमीवर महसूल विभागामार्फत 'डिजिटल ८ अ' ऑनलाइन सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या 'डिजिटल ८ अ' सुविधेचा ऑनलाइन शुभारंभ महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते करण्यात आला.



**बाळासाहेब थोरात**
महसूल मंत्री

शासकीय कामात महसूल विभागाची महत्त्वाची भूमिका आहे आणि म्हणूनच या विभागाला प्रशासनाचा कणा असे म्हणतात. महाराष्ट्राच्या विकासात या

विभागाने महत्त्वाचे योगदान दिले असून यापुढील काळातही हा विभाग सर्वसामान्यांसाठी विविध योजना राबवण्यात पुढे राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. गेल्या ४ महिन्यांपेक्षा अधिकचा काळ कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी महसूल यंत्रणा सक्षमपणे काम करत असल्याचा आपणास अभिमान वाटतो, असे श्री. थोरात यांनी स्पष्ट केले आहे.

## औषधांचा साठा पुरेसा

रेमडेसीवर आणि टोसीलीझुमॅब या औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असून, ही औषधे महाराष्ट्रभर अधिक प्रमाणात उपलब्ध करून देण्यात येतील यासाठी आवश्यक नियोजन करण्यात येत आहे, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी दिली.



**डॉ. राजेंद्र शिंगणे**
अन्न व औषध प्रशासन मंत्री

डॉ. शिंगणे यांनी नुकतीच मुंबई शहरातील काही औषध वितरक व रुग्णालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन या औषधाची उपलब्धता, त्यांचे वितरण व आकारण्यात येणारी किंमत याबाबत माहिती प्राप्त करून घेतली. या संदर्भात त्यांना अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तालयामध्ये सिप्ला व मे. हेट्रो हेल्थकेअर या उत्पादकांचे प्रतिनिधी, वितरक/ विक्रेते यांच्या समवेत बैठक घेतली. सध्याचा उपलब्ध साठा, भविष्यात उपलब्ध होऊ शकणारा साठा तसेच वितरण प्रणाली व त्यातील दोष दूर करणे याबाबत या वेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

या औषधांचे वितरण काही ठरावीक वितरकाकडून केले जाते, त्यामुळे रुग्णांची गैरसोय होते ती टाळण्यासाठी या औषधाची विक्री अधिक वितरकांद्वारे करण्याच्या सूचना डॉ. शिंगणे यांनी संबंधित कंपनीला दिल्या.

मुंबई व ठाणे मधील कार्यरत औषध निरीक्षक, सहायक आयुक्त (औषधे), सह आयुक्त (औषधे) यांची बैठक घेऊन या औषधाचा काळाबाजार करणाऱ्यांचा शोध घेऊन कडक कारवाई करण्याचे सक्त निर्देश डॉ. शिंगणे यांनी दिले आहेत. हे औषध डॉक्टरांनी अत्यावश्यक असेल तेव्हाच रुग्णास प्रिस्क्राईब करावे. तसेच या औषधाच्या काळाबाजाराबाबत काही माहिती असल्यास ती प्रशासनाच्या टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर देण्याचे त्यांनी आवाहन केले आहे.

## कौशल्य विकास परीक्षा मंडळ

महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे नाव आता महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळ असे करण्यात आले आहे. राज्यातील कौशल्य विकासाला गती देणे आणि त्या माध्यमातून बेरोजगारांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळवून देण्याचे शासनाचे लक्ष्य आहे. कौशल्य विकास विभागामार्फत अधिकाधिक तरुणांना विविध अभ्यासक्रमांमधून प्रशिक्षित करून त्यांना रोजगाराच्या संधी मिळवून देण्यात येईल.

## उत्कृष्ट १०० स्टार्टअप्सची निवड

तरुणांच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना वाव देण्यासाठी कौशल्य विकास विभागामार्फत स्टार्टअप योजना राबवण्यात येत आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीतर्फे आयोजित केलेल्या स्पर्धेत देशभरातील १ हजार ६०० स्टार्टअप्सनी सहभाग घेतला. त्यातील उत्कृष्ट १०० स्टार्टअप्सची घोषणा कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक यांनी केली. तरुणांनी वैशिष्ट्यपूर्ण कल्पकता दाखवत कृषी, शिक्षण, कौशल्य विकास, आरोग्य, स्वच्छ ऊर्जा, जलव्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, प्रशासन आदी विविध क्षेत्रात अभिनव बदल घडवू शकणारे स्टार्टअप सादर केले. या कल्पनांचा वापर शासनाच्या विविध विभागांमधील कामकाजासाठी करण्यात येणार आहे.

## आयटीआय प्रवेश प्रक्रिया

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदा आयटीआय प्रवेशाची प्रक्रिया केंद्रीयभूत ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार असून १ ऑगस्ट २०२० पासून प्रवेश अर्ज ऑनलाइन स्वरूपात https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध झाले आहेत, अशी माहिती कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मंत्री नवाब मलिक यांनी दिली. तथापी, आयटीआय महाविद्यालये कधी सुरू होतील, याबाबत लॉकडाऊनसंदर्भात शासनाच्या नियमास अनुसरून नंतर माहिती जाहीर करण्यात येईल. सध्या फक्त प्रवेशप्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्यात आली आहे.

## दीड लाखाहून अधिक प्रवेशक्षमता

राज्यात प्रत्येक तालुक्यात किमान एक शासकीय आयटीआय आहे. ३५८ तालुक्यात ४१७ शासकीय आयटीआय कार्यरत असून त्यांची वार्षिक प्रवेश क्षमता ९२ हजार ५५६ इतकी आहे. आदिवासी भागात आदिवासींसाठी ६१ संस्था, अनुसूचित जाती व नवबौद्धांसाठी ४ उच्चस्तर संस्था, अल्पसंख्याकांसाठी २ स्वतंत्र संस्था व ४३ शासकीय आयटीआयमध्ये स्वतंत्र तुकड्या, महिलांसाठी १५ तर २८ आदिवासी (आश्रमशाळा) आयटीआय अशा संस्थांचा समावेश आहे. याचबरोबर राज्यात ५६९ खासगी आयटीआय कार्यरत असून त्यांची वार्षिक प्रवेश क्षमता ५३ हजार २७२ आहे. शासकीय आणि खासगी ९८६ आयटीआय असून त्यांची एकूण प्रवेशक्षमता १ लाख ४५ हजार ८२८ विद्यार्थी इतकी आहे.



**नवाब मलिक**
कौशल्य विकास मंत्री

प्रादेशिक विभागनिहाय शासकीय व खासगी संस्थांची संख्या व प्रवेशक्षमता पुढीलप्रमाणे आहे. अमरावती - ९० संस्था आणि १७ हजार ९८४ प्रवेशक्षमता, औरंगाबाद - १३३ संस्था आणि १९ हजार २६४ प्रवेशक्षमता, मुंबई - १०८ संस्था आणि

२० हजार १२४ प्रवेशक्षमता, नागपूर - २४१ संस्था आणि २८ हजार १३६ प्रवेशक्षमता, नाशिक- २१८ संस्था आणि २९ हजार ५०० प्रवेशक्षमता, पुणे - १९६ संस्था आणि ३० हजार ८२० प्रवेशक्षमता.

अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला चालना देण्याच्या अनुषंगाने यंदा राज्यातील ४४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) दुसऱ्या आणि तिसऱ्या पाळीतील वर्ग चालवले जाणार आहेत. याबरोबरच ४० खासगी आयटीआयमध्ये स्वतंत्र तुकड्या चालवण्यात येणार आहेत. या माध्यमातून ८४ आयटीआयमध्ये एकूण ८ हजार ३४८ जागांवर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी संधी उपलब्ध होत आहे.

### प्रतिकारशक्तीचे मोफत औषध

प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी अर्सेनिक अल्बम व आयुर्वेदिक औषध ग्रामीण भागातील सुमारे पाच कोटी जनतेस मोफत देण्यात येणार असल्याचे ग्रामविकास विभागाचे मंत्री हसन मुश्रीफ यांनी जाहीर केले. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील नियुक्त समितीने उपरोक्त औषधे तत्काळ आवश्यक त्याचप्रमाणे कमीत-कमी कालावधीत निविदा प्रक्रिया पूर्ण करून खरेदी करावी.

आयुष मंत्रालयाच्या सूचनेस अनुसरून आरोग्य विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे मोफत औषध जनतेला तत्परतेने पुरवावे. ही प्रक्रिया व वाटप तीन आठवड्यामध्ये पूर्ण करावे, असेही जिल्हा परिषदांना कळवण्यात आले आहे.



**हसन मुश्रीफ**
ग्रामविकास मंत्री

### गावांमध्ये शहरी दर्जाच्या सुविधा

राज्यातील मोठ्या ग्रामपंचायतींना आता मलनिस्सारण प्रकल्प किंवा घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे यासारखे मोठे प्रकल्पही आता साकारता येणार आहेत. यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध होणार असून यासाठी शासन निर्णयात आवश्यक सुधारणा करण्यात आली आहे. या संदर्भातील योजनेमधून मोठ्या ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये आतापर्यंत सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापनासाठी मर्यादीत स्वरूपाची कामे करता येत होती. त्यामध्ये आता अनेक व्यापक बाबी अंतर्भूत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार आता मोठ्या गावांमध्ये सांडपाणी व्यवस्थापनासाठी मलनिस्सारण प्रकल्पासारख्या मोठ्या प्रकल्पांची कामे करता येणार आहेत. याबाबत शासनाने १ जुलै २०२० रोजी शुद्धिपत्रकाद्वारे सूचना निर्गमित केल्या आहेत.

### ग्रामपंचायतीवर प्रशासक

यापूर्वी मुदत संपलेल्या व डिसेंबरअखेर मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या सल्ल्याने संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रातील योग्य व्यक्तीची प्रशासक म्हणून नेमणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संबंधित गावात सरपंचपद सध्या ज्या प्रवर्गासाठी आरक्षित होते त्याच प्रवर्गाच्या योग्य व्यक्तीच्या नावाची प्रशासक म्हणून शिफारस करण्याची दक्षता घ्यावी. त्यामुळे त्या घटकावर अन्याय होणार नाही, असे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी सर्व पालकमंत्र्यांना पत्राद्वारे कळवले आहे. राज्यातील १९ जिल्ह्यातील १ हजार ५६६ ग्रामपंचायतींची मुदत एप्रिल ते जून २०२० दरम्यान समाप्त झाली असून १२ हजार ६६८ ग्रामपंचायतींची मुदत जुलै ते डिसेंबर २०२० या कालावधी दरम्यान समाप्त होत आहे. मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीवर संबंधित अध्यादेशान्वये प्रशासक म्हणून योग्य व्यक्तीची नियुक्ती करण्याचे शासनाचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

### शैक्षणिक वर्षासाठी पाठ्यक्रम कमी

कोविड १९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रचलित पद्धतीप्रमाणे शाळा सुरू झालेल्या नाहीत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी इयत्ता १ ली ते १२ वीचा इयत्तानिहाय, विषयनिहाय २५ टक्के पाठ्यक्रम कमी करण्यात येत आहे, अशी घोषणा शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी केली आहे.



**प्रा. वर्षा गायकवाड**
शालेय शिक्षण मंत्री

### १०१ विषयांचा २५ टक्के पाठ्यक्रम कमी

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (बोर्ड) यांच्या समन्वयाने आणि अभ्यासक्रम समितीच्या निर्णयानुसार संबंधित विषयाचे सर्व अभ्यासक्रम मंडळ सदस्यांमार्फत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी अभ्यासक्रमाचा मूळ गाभा तसाच ठेवून प्राथमिक स्तरावरील २२, माध्यमिक स्तरावरील २० आणि उच्च माध्यमिक स्तरावरील ५९ असे एकूण १०१ विषयांचा इयत्तानिहाय, विषय निहाय २५ टक्के पाठ्यक्रम कमी करण्यात येत असल्याची माहिती प्रा. गायकवाड यांनी दिली आहे.

### असा आहे निर्णय :

- पाठ्यक्रमातून २५ टक्के भाग वगळत असताना भाषा विषयामध्ये काही गद्य व पद्य पाठ व त्यावर आधारित स्वाध्यायकृती वगळण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी अंतर्गत मूल्यमापन आणि वार्षिक परीक्षा यामध्ये या घटकांवर कोणत्याही कृती विचारल्या जाऊ नयेत.
- भाषा विषयामध्ये वगळण्यात आलेल्या पाठाला जोडून आलेले

व्याकरण किंवा इतर भाषिक कौशल्य वगळण्यात आलेली नाहीत.

- इतर विषयामध्ये कृतीची पुनरावृत्ती टाळणे तसेच काही भाग विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनासाठी देण्यात आला आहे.
- शालेय श्रेणी विषयासंदर्भात परिस्थिती व त्यानुसार उपलब्ध सोयीसुविधा यांचा विचार करून उपक्रम / प्रकल्प घेण्याबाबत सूचित केले आहे.
- प्रात्यक्षिकांवर आधारीत विषयांचे प्रात्यक्षिक कार्य हे अध्ययन - अध्यापन संदर्भाने विचारात घेतलेल्या आशयास अनुसरूनच उपलब्ध परिस्थिती व सोयीसुविधा विचारात घेऊन पूर्ण करण्याबाबत सूचित केले आहे.
- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र यांच्या मार्फत शैक्षणिक दिनदर्शिकेची निर्मिती केली आहे. त्या दिनदर्शिकेमधून पाठ्यक्रमातून कमी करण्यात आलेला भाग वगळण्यात येत आहे.
- इयत्ता १ ली ते १२ वीचा इयत्तानिहाय, विषयनिहाय २५ टक्के पाठ्यक्रम कमी करण्यात आलेला भाग www.maa.ac.in आणि www.ebalbharati.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आला आहे.
- शाळा प्रमुखांमार्फत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी हा पाठ्यक्रम वगळल्याची नोंद घेऊन त्याबाबत सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालक यांना अवगत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

## स्ट्रेस फंड



**जितेंद्र आव्हाड**
गृहनिर्माण मंत्री

कोविड-१९मुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत बांधकाम उद्योग संकटात आहे. अर्थकारणाला बळकटी देण्यासाठी बांधकाम उद्योगाला ताकद देण्याची गरज आहे. मुंबईच्या विकासाला गती द्यायची असेल तर गृहनिर्माण उद्योगाला सवलती व सुविधा देण्याची गरज आहे. गृहनिर्माण उद्योगाला उभारी देण्यासाठी व रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना गती देण्यासाठी स्ट्रेस फंड उभारण्यात येईल, अशी माहिती गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी दिली.

## अहिल्यादेवी होळकर आवास योजना

भटक्या जमाती 'क' प्रवर्गातील धनगर समाजासाठी घरे बांधण्याच्या योजनेचे नामकरण आता 'अहिल्यादेवी होळकर आवास योजना' असे करण्यात आले असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण विकास मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली.

## प्रवेश रद्द करू नये

कोविड विषाणूच्या संसर्गामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत विजाभज, विमाप्र, इमाव या प्रवर्गातील विद्यार्थ्यांची २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील किंवा तत्पूर्वीची शैक्षणिक संस्थांना देय असलेली शिष्यवृत्ती शासनाकडून अप्राप्त असल्याच्या सबबीखाली कोणत्याही विद्यार्थ्याचे प्रवेश रद्द करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना आवश्यक सर्व दाखले, प्रमाणपत्र व आवश्यक दस्तवेज त्वरित उपलब्ध करून देण्यात यावे असे आदेश शासनाकडून मॅट्रिकोत्तर शिक्षण देणाऱ्या सर्व शैक्षणिक संस्थाना देण्यात आले आहेत. याबाबत इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागामार्फत शासन निर्णय जाहीर केला आहे.



**विजय वडेट्टीवार**
मदत व पुनर्वसन,
इतर मागास बहुजन
कल्याण विकास मंत्री

## प्रमाणपत्रासाठी वाढीव मुदत

व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या मराठा समाजातील विद्यार्थ्यांना नोंदणी करते वेळी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्याची वाढीव मुदत दिली जाईल, अशी माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना हा मोठा दिलासा आहे.

कोरोनामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत मराठा समाजातील विद्यार्थ्यांसह अनुसूचित जातिजमाती, इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती व भटक्या जमाती अशा सर्व घटकांतील विद्यार्थ्यांनाही जात पडताळणी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अनेक अडचणी येऊ शकतात हे लक्षात घेऊन मराठा समाजासह अनुसूचित जातिजमाती, इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती व भटक्या जमाती अशा सर्व घटकांतील विद्यार्थ्यांनाही का सूट देऊ नये हा प्रश्न उपस्थित करून सर्व विद्यार्थ्यांना सूट देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे.

## सर्व जिल्ह्यांमध्ये टास्क फोर्स

कोविड-१९ विरुद्धचा लढा अधिक प्रभावी करण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सूचनेनुसार मुंबईच्या धर्तीवर सर्व जिल्ह्यांमध्ये डॉक्टरांचे टास्क फोर्स नेमण्यात येणार आहेत, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी दिली. या टास्क फोर्समध्ये डॉक्टर्स तसेच या क्षेत्रातील तज्ज्ञ यांचा समावेश करण्यात येणार असून कोविड-१९ नियंत्रणात आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपचार, उपाययोजना त्याचप्रमाणे सर्व संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय ठेवणे व त्यांचे नियंत्रण करण्यासाठी



**अमित विलासराव देशमुख**
वैद्यकीय शिक्षण मंत्री

जिल्हास्तरावर हा टास्क फोर्स काम करेल. जिल्हाधिकाऱ्यांना अशा प्रकारचे टास्क फोर्स नेमण्याबाबत कळवण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यात सध्या साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. जिल्हास्तरावर निर्माण करण्यात येत असलेल्या या नव्या टास्क फोर्सच्या माध्यमातून प्रभावीपणे काम करता येईल असेही श्री. देशमुख यांनी म्हटले आहे.

## अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द

राज्यातील १३ अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरू आणि राज्य समितीच्या शिफारशींना केंद्रबिंदू मानून पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.



**उदय सामंत**
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

लाखो विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा आणि भवितव्याचा विचार करून पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याची भूमिका शासनाने घेतली आहे, यामध्ये केवळ विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून आणि राज्यातील कोविड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावाची सद्य:स्थिती पाहता कोणतेही विद्यापीठ परीक्षा घेऊ शकत नाही, अशी शिफारस अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू आणि समितीने केल्यामुळे शासनाने अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याचा निर्णय घेतला आहे.

## डिजिटल स्त्री शक्ती

स्मार्टफोन, इंटरनेट सर्वसामान्यांपर्यंत पोहोचले असून त्याचा वापर वाढत असताना काही विकृतलोक त्याचा गैरवापर करत आहेत. बऱ्याचदा महिला या त्यांचे सोपे लक्ष्य (सॉफ्ट टार्गेट) असते. यामुळे सर्वांनाच विशेषतः युवती, महिलांना 'डिजिटली सक्षम' करणे काळाची गरज झाली आहे, असे मत महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केले. तसेच संकटग्रस्त महिलांना जलद न्याय मिळावा यासाठी राज्य महिला आयोगाचे कार्यालय प्रत्येक विभागस्तरावर लवकरच कार्यान्वित होईल, असेही त्या म्हणाल्या.



**ॲड. यशोमती ठाकूर**
महिला व बालविकास मंत्री

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि 'रिस्पॉन्सिबल नेटिझम' यांच्या संयुक्त विद्यमाने 'डिजिटल स्त्री शक्ती' या उपक्रमाचा शुभारंभ ॲड. ठाकूर यांनी ऑनलाइनरीत्या वेबिनार माध्यमातून केला. लॉकडाऊन ते अनलॉक या काळात माहिला आयोगाने जवळपास ४०० तक्रारींवर कार्यवाही करत महिलांना न्याय, दिलासा मिळवून दिला आहे. मात्र आयोगाचे कार्यालय मुंबईत असल्याने कामकाजाचे विकेंद्रीकरण व्हावे, महिलांना सुलभ संपर्क करता यावा यासाठी लवकरच विभागस्तरावर महिला आयोगाचे कार्यालय सुरू करण्यात येईल. 'डिजिटल स्त्री शक्ती' उपक्रमांतर्गत मुंबई, पुणे, ठाणे, अमरावती, नागपूर, औरंगाबाद, नाशिक अशा १० शहरातील १६ ते २५ वयोगटातील ५००० महाविद्यालयीन तरुणींना सायबर सुरक्षेचे मार्गदर्शन तसेच प्रशिक्षण देत 'सायबर सखी' म्हणून प्रशिक्षित करण्यात येणार आहे.

## 'फॉस्टर केअर' योजना

महिला व बालविकास विभाग अंतर्गत पुणे येथील महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्थेच्यावतीने आयोजित तीन दिवसीय प्रतिपालकत्व प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप आणि महिला व बालविकास विभागाच्या अधीनस्थ बालगृहातील अनाथ बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना सुरक्षित कुटुंब, घर मिळवून देणाऱ्या प्रतिपालकत्व (फॉस्टर केअर) योजनेची प्रायोगिक स्वरूपात सुरुवात मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी ऑनलाइन कार्यक्रमातून केली. पुणे, सोलापूर, अमरावती, पालघर, मुंबई उपनगर या पाच जिल्ह्यांत ही 'फॉस्टर केअर योजना' प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात येत आहे.

## प्रतिपालकत्व (फॉस्टर केअर) योजनेची वैशिष्ट्ये

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ या कायद्यांतर्गत अनाथ मुलांना महिला व बाल विकास विभागाच्या अधीनस्थ बालगृहांमधे ठेवले जाते. कौटुंबिक वातावरणात राहण्याचा बालकांचा हक्क आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करता दत्तक आणि प्रतिपालकत्व प्रायोजकत्व हे संस्थाबाह्य पर्यायही उपलब्ध आहेत. दत्तक प्रक्रियेत कायमस्वरूपी पुनर्वसन होते. परंतु सर्वच बालकांची दत्तकप्रक्रिया होतेच असे नाही. अशा वेळी या बालकांचे कायदेशीर पालकत्व न देता त्यांना बाल न्याय कायद्यान्वये प्रतिपालकत्व योजनेत प्रायोजित पालकत्व देता येते. प्रतिपालकत्व म्हणजे बालकाला पर्यायी काळजीसाठी प्रायोजकत्व आणि प्रतिपालकत्व मान्यता समितीने निवडलेल्या योग्य कौटुंबिक वातावरणात ठेवणे.

## संकेतस्थळावर नोंदणी

प्रायोगिक अर्थात प्रतिपालकत्व स्वीकारून योजनेत भाग घेऊ इच्छिणारे पालक महिला व बालविकास आयुक्तालयाच्या https://wcdcommpune.org या संकेतस्थळावर अर्ज करू शकतील.

## चारशे वर्ष पुरातन वटवृक्ष

मौजे भोसे (जि. सांगली) येथील राष्ट्रीय महामार्गाच्या कामामध्ये येणारा चारशे वर्ष पुरातन वटवृक्ष वाचवण्याचा निर्णय झाला आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ च्या प्रकल्प संचालकांनी वटवृक्ष वाचवण्याबाबतचे पत्र सर्व संबंधितांस दिले आहे. राज्याचे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी हा वटवृक्ष वाचवण्यासंदर्भात केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना

## स्मृतिशताब्दी आणि जन्मशताब्दी

उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई विद्यापीठ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक स्मृतिशताब्दी आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी समारोह कार्यक्रम ऑनलाइन आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, खासदार विनायक राऊत उपस्थित होते.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक स्मृतिशताब्दी आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी एकत्र असणे एक योगायोग आहे. या दोन्ही महापुरुषांबद्दल आपण काय बोलावे, यापेक्षा आपण त्यांच्याकडून काय घ्यावे, हे अधिक महत्त्वाचे आहे. हे दोन्ही महापुरुष शब्दप्रभू होते, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

## कार्याची जपणूक

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून जनजागृती केली. त्यांच्या या कार्यातून पुढच्या पिढीला प्रेरणा मिळावी यासाठी त्यांची साहित्यसंपदा एका ठिकाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे. या दृष्टीने त्यांच्या कार्याची जपणूक करणारे



अण्णा भाऊ साठे



लोकमान्य टिळक

यथोचित स्मारक सर्वांच्या सहकार्याने मुंबईत लवकरच उभारले जाईल, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

मुंबई विद्यापीठाच्या सेंटर फॉर युरेशियन स्टडिज व रशियन विभागातर्फे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दीनिमित्त आयोजित आंतरराष्ट्रीय व्याख्यानमालेच्या सांगता समारंभाप्रसंगी मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे बोलत होते.

शताब्दीनंतरही लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची आठवण स्फूर्ती देते. त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर भाषा सातासमुद्रापार पोहोचवली. त्यांचे साहित्य अजूनही लोकप्रिय आणि अलौकिक आहे. परखड मत मांडणाऱ्या अण्णा भाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या लढाईतही मोठे योगदान होते. त्यांनी आपले पोवाडे आणि गीतांच्या माध्यमातून जनमानसाला त्यांच्यातील हिमतीची आणि कर्तव्याबाबतची जागृती करून दिली. कामानिमित्त मुंबईत आलेल्यांना मुंबई माझी असल्याची जाणीव करून देण्यासाठी त्यांनी सर्वस्व अर्पण करून लौकिक कमावले. हे वर्ष लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीचे तर लोकशाहीर म्हणून लौकिक मिळवलेल्या अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीचे शताब्दी वर्ष आहे. एक तेज लोप पावले, तर दुसरे उगवले हा विलक्षण योगायोग असल्याचे सांगून मुख्यमंत्र्यांनी दोघांच्याही कार्याचा गौरव केला.

पत्र लिहून विनंती केली होती. तसेच याबाबत मंत्री आदित्य ठाकरे यांनी सांगली जिल्हाधिकारी यांना सूचना दिल्या होत्या. सांगली जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, पर्यावरणप्रेमी कार्यकर्ते यांच्यासह स्थानिक लोकांनी हा वटवृक्ष वाचवण्यासाठी आंदोलन केले होते. या सर्वांची दखल घेत आता हा वटवृक्ष वाचवण्याचा निर्णय झाला आहे. या निर्णयाबाबत समाधान व्यक्त करत यापुढील काळातही राज्यातील कोणतीही विकासकामे ही पर्यावरणाचे संवर्धन करूनच केली जातील, याबाबत आपण स्वत: बारकाईने लक्ष ठेवून कार्यवाही करू, अशी ग्वाही मंत्री श्री. ठाकरे यांनी दिली.



**आदित्य ठाकरे**
पर्यावरण मंत्री

### महाकाय वटवृक्ष

रत्नागिरी - कोल्हापूर - मिरज - सोलापूर या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ चे काम सध्या सुरू आहे. मिरज ते पंढरपूर शहरांच्या दरम्यान हा महामार्ग मोजे भोसे (तालुका मिरज, जि.सांगली) या गावातून जातो. या गावातील गट क्रमांक ४३६ येथे यल्लमा देवीचे पुरातन मंदिर असून या मंदिरासमोरच सुमारे ४०० वर्षापूर्वीचा महाकाय वटवृक्ष आहे. त्याचा विस्तार सुमारे ४०० चौमी इतका व्यापक आहे. हा वटवृक्ष त्या परिसरातील एक ऐतिहासिक ठेवा तर आहेच, त्याचबरोबर ते वटवाघूळ आणि इतर दुर्मीळ पक्षी यांच्याकरिता नैसर्गिक निवासस्थान देखील आहे. नियोजित राष्ट्रीय महामार्गाच्या कामामुळे या पुरातन वटवृक्षास बाधा पोहोचणार होती, वटवृक्ष तोडावा लागणार होता. या वटवृक्षाचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता तसेच परिसरातील पर्यावरणाच्या होणाऱ्या ऱ्हासाचा विचार करता संबंधित जागेवरील महामार्गाचे संरेखन काही प्रमाणात बदलून वटवृक्षाचे जतन होण्याबाबत कार्यवाही करण्याची विनंती मंत्री आदित्य ठाकरे यांनी केली होती.

शासन हे विविध पातळ्यांवर काम करत असते. यामध्ये मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय महत्त्वपूर्ण असतात. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयांचा थोडक्यात आढावा.

# मंत्रिमंडळात ठरले !

## अधिनियमात सुधारणा

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमात सुधारणा करण्यासंदर्भात अध्यादेश प्रख्यापित करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. राज्यातील विकासाचे नियोजन व नियंत्रण होण्याच्या दृष्टीने राज्यात अमलात असलेल्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मध्ये सर्व नियोजन प्राधिकरणांच्या कार्यक्षेत्रात, विविध विकास कार्यक्रमांसाठी विविध कालबद्ध तरतुदी नमूद असून यातील काही तरतुदींमध्ये हा कालावधी वाढवण्याची तरतूद आहे.

## जल जीवन मिशन



राज्यात केंद्र शासनप्रणित जल जीवन मिशन राबवण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. जल जीवन मिशनसाठी राज्य पाणी आणि स्वच्छता मिशन कार्यान्वयन यंत्रणा म्हणून कार्य करेल. या मिशनसाठी मिशन संचालक या पदासाठी भाप्रसे संवर्गातील सचिव दर्जाचे पद नव्याने निर्माण करण्यात येत आहे. यानुसार राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला २०२४ पर्यंत, वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रतिदिन, गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करण्याचे लक्ष्य आहे. जल जीवन मिशन योजना ५०:५० टक्के केंद्र व राज्य हिश्श्याने राबवण्यास मान्यता दिली आहे.

सध्या राज्यातील एकूण १३२.०३ लक्ष कुटुंबांपैकी ५०.७५ लक्ष कुटुंबांकडे वैयक्तिक नळ जोडणी उपलब्ध आहे. जल जीवन मिशन अंतर्गत पुढील ४ वर्षात एकूण ८९.२५ लक्ष नळ जोडणी देण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी अंदाजे १३६६८.५० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घराला नळ जोडणीद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी बेसलाईन सर्वेक्षण करून पुढील ४ वर्षाचे नियोजन करण्यात येईल. या योजनेसाठी वार्षिक ग्राम कृती आराखडा, जिल्हा कृती आराखडा व राज्य कृती आराखडा तयार करण्यात येईल. जिल्हास्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कार्यान्वयन यंत्रणा असेल. ग्राम पातळीवर जल जीवन मिशन अंतर्गत कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती यंत्रणा म्हणून ग्रामीण पाणी व स्वच्छता समिती काम करेल. यामध्ये गावपातळीवर निर्माण करण्यात येणाऱ्या मूलभूत सोयीसुविधांच्या १० टक्के इतका निधी लोकवर्गणीद्वारे जमा करण्यात येईल. जल जीवन मिशनसाठी वैकल्पिक आर्थिक मॉडेलच्या माध्यमातून राज्यस्तरावर जल जीवन कोष निधी तयार करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

## शिवभोजन थाळी

शिवभोजन थाळीचा दर पुढील तीन महिन्यांसाठी पाच रुपये एवढा करण्याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मजूर, स्थलांतरित, बेघर तसेच बाहेरगावचे विद्यार्थी इत्यादी लोकांच्या जेवणाअभावी हालअपेष्टा होत असल्याने शिवभोजन थाळीची किंमत ३० मार्चपासून तीन महिन्यांच्या कालावधीसाठी दहा रुपयाऐवजी पाच रुपये एवढी निश्चित करण्यात आली होती. ही मुदत त्यापुढील तीन महिन्यांच्या कालावधीसाठी वाढवण्यात आली असून ६ कोटी रुपये एवढ्या वाढीव खर्चासही मान्यता देण्यात आली.



## कौशल्य विकासाचे नवे नाव

कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे नाव आता कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग असे करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. रोजगार व स्वयंरोजगार या विभागाचे नाव यापूर्वीच कौशल्य विकास व उद्योजकता असे करण्यात आले आहे. मात्र, या नावात रोजगार हा शब्द आढळून न आल्याने रोजगार व स्वयंरोजगार बाबींसंदर्भात जनतेत संभ्रम निर्माण होतो. यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

## शासकीय बँकिंग व्यवहार

प्रादेशिक ग्रामीण बँक, आयडीबीआय बँक तसेच राज्यातील 'अ' वर्गातील १५ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना शासकीय बँकिंग व्यवहार करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. शासकीय बँकिंग व्यवहार करण्यास मान्यताप्राप्त जिल्हा मध्यवर्ती सहकारी

## सवलतीत अन्नधान्य



कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत समाविष्ट होऊ न शकलेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांकरीता सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ देण्याचा मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर एपीएल (केशरी) मधील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत व शेतकरी योजनेत समाविष्ट नसलेल्या शिधापत्रिकाधारकांना प्रतिव्यक्ती ३ किलो गहू ८ रुपये प्रतिकिलो व २ किलो तांदूळ १२ रुपये प्रति किलो याप्रमाणे ५ किलो अन्नधान्य मे व जून या २ महिन्यात दिले आहे. त्याच धर्तीवर जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांच्या कालावधीकरिता त्याच परिमाणात व त्याच दराने अन्नधान्य देण्यात येत आहे. त्याकरीता आवश्यक असलेल्या २८ कोटी रुपये एवढा अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. केंद्र शासनाकडे गहू प्रतिकिलो २१ रुपये व तांदूळ प्रतिकिलो २२ रुपये या दराने मागणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

बँकांमध्ये मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, कोल्हापूर, लातूर, अकोला, सिंधुदुर्ग, अहमदनगर, पुणे, सातारा, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा समावेश आहे.

## मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम योजनेचा कालावधी ३१ मार्च, २०२० रोजी संपुष्टात आला आहे. पण यात मंजुरी देण्यात आलेल्या प्रगतिपथावरील व अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्याकरिता आता या योजनेस दोन वर्षे (सन २०२१-२२ पर्यंत) मुदतवाढ देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

## विक्रमी कापूस खरेदी

राज्यात कोरोनाची परिस्थिती तसेच पावसाला सुरुवात झालेली असूनदेखील पणन विभागाने विक्रमी २१८.७३ लाख क्विंटल कापसाची खरेदी केली आहे. या संदर्भात मंत्रिमंडळाने या कापूस खरेदीसाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच सहकार व पणन मंत्र्यांचे अभिनंदन केले. गेल्या १० वर्षात झाली नाही अशी विक्रमी खरेदी झाल्याचे प्रधान सचिव, पणन अनुप कुमार यांनी एका सादरीकरणाद्वारे सांगितले.

या खरेदीचे एकूण मूल्य ११,७७६.८९ कोटी रुपये असून आतापर्यंत ११,०२९.४७ कोटी रुपये इतकी रक्कम शेतकऱ्यांना अदा करण्यात आली आहे. तसेच सीसीआयने ३० सप्टेंबर २०२० पर्यंत एफएक्यू दर्जाचा कापूस खरेदी करणार असल्याचे घोषित केले आहे. राज्यात सीसीआय व राज्य कापूस पणन महासंघाने कोविड-१९ च्या प्रादुर्भावापूर्वी अनुक्रमे ९१.९० व ५४.०३ लाख क्विंटल कापूस खरेदी. अशा प्रकारे एकूण १४५.९३ लाख क्विंटल कापूस खरेदी केली.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे कापसाचे बाजारातील दर हमीपेक्षा कमी असल्यामुळे, शेतकऱ्यांचा कल, शासकीय खरेदी केंद्रावर विकण्याचा होता. त्यानुसार शासकीय खरेदी नियोजन करून कोविड-१९ च्या काळात सीसीआय व कापूस पणन महासंघाने आजपर्यंत अनुक्रमे ३५.७० व ३६.७५ लाख याप्रमाणे ७२.४५ लाख क्विंटल कापूस खरेदी केला आहे. राज्यातील शासकीय व खासगी अशी एकूण खरेदी ४१८.८ लाख क्विंटल झाली असून वास्तविक पाहता ४१० लाख क्विंटल कापूस खरेदी अपेक्षित होती. एकूण ८ लाख ६४ हजार ७२ शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करण्यात आला.



## वाढीव दराने प्रतिझाड मदत

निसर्ग चक्रीवादळामुळे पूर्णतः नष्ट झालेल्या सुपारी व नारळाच्या झाडांना विशेष बाब म्हणून प्रतिझाडाप्रमाणे वाढीव दराने मदत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. निसर्ग चक्रीवादळामुळे रायगड व रत्नागिरी जिल्ह्यात नुकसान झालेल्या बहुवार्षिक पिकांपैकी सुपारी व नारळाच्या झाडांना प्रति हेक्टरी ५०,०००/- रुपये या दराने मदत देण्याऐवजी पूर्णतः नष्ट झालेल्या सुपारी व नारळाच्या झाडांना प्रतिझाड प्रमाणे खालील दराने मदत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. सुपारी- ५०/- रुपये संपूर्ण नष्ट झालेल्या प्रतिझाडासाठी, नारळ- २५०/- रुपये संपूर्ण नष्ट झालेल्या प्रतिझाडासाठी या दराने मदत देण्यासाठी होणारा संपूर्ण खर्च राज्य शासनाच्या निधीमधून करण्यासदेखील मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

## सहकारी संस्था सुधारणा

लेखा परीक्षण, वार्षिक सर्वसाधारण सभेचा कालावधी वाढवण्याबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील विविध कलमात सुधारणा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यानुसार कोरोनाच्या पार्श्वभूमीवर वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कालावधीस आणि लेखा परीक्षणास मुदतवाढ देण्यात सुधारणा करण्यात येईल.

## शासकीय कंत्राटे : उपाययोजना

कोविडची महामारी ही नैसर्गिक आपत्ती गृहीत धरून शासकीय कंत्राटदारांच्या अडचणींवर उपाय करण्यास

मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

## उद्योगांना प्रोत्साहन

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये कृषीवर आधारित अन्नप्रक्रिया उद्योगांना अधिकाधिक प्रोत्साहन देण्यासाठी सुधारित निकषास मान्यता देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

मोठे व विशाल प्रकल्प निकष पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात आले. **आकांक्षित जिल्हे :** गडचिरोली, नंदुरबार, उस्मानाबाद, हिंगोली यांच्यासाठी मोठ्या प्रकल्पातील गुंतवणूक ५० ते १०० कोटी रुपये असेल तर १०० कोटींपेक्षा अधिक अथवा २०० रोजगार असलेला प्रकल्प हा विशाल प्रकल्प असेल.



मराठवाडा, विदर्भ, धुळे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी मोठ्या प्रकल्पातील गुंतवणूक ५० ते २०० कोटी रुपये असेल तर २०० कोटीपेक्षा अधिक अथवा ३०० रोजगार असलेला प्रकल्प हा विशाल प्रकल्प असेल. उर्वरित महाराष्ट्रासाठी मोठ्या प्रकल्पातील गुंतवणूक आता ५० ते २५० कोटी रुपये असेल तर २५० कोटींपेक्षा अधिक अथवा ५०० रोजगार असलेला प्रकल्प हा विशाल प्रकल्प असेल.

**राज्य वस्तू व सेवा करावर आधारित प्रोत्साहने :** आकांक्षित जिल्ह्यातील प्रकल्पांना १० वर्षांसाठी भांडवली गुंतवणुकीच्या मर्यादेत ११० टक्के प्रोत्साहन व औद्योगिक विकास अनुदान १०० टक्के ढोबळ राज्य वस्तू व सेवा कर राहील. मराठवाडा, विदर्भ, धुळे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रकल्पांना १० वर्षांसाठी भांडवली गुंतवणुकीच्या मर्यादेत १०० टक्के प्रोत्साहन व औद्योगिक विकास अनुदान १०० टक्के ढोबळ राज्य वस्तू व सेवा कर आधारित राहील. उर्वरित महाराष्ट्रासाठी अ/ब तालुक्याकरिता ५० टक्के, 'क'तालुका- ७५ टक्के, ड/ड+ तालुका- १०० टक्के असे १० वर्षांसाठी भांडवली गुंतवणुकीच्या मर्यादेत प्रोत्साहन राहील. तसेच १०० टक्के ढोबळ राज्य वस्तू व सेवा कर आधारित प्रोत्साहन मिळेल.

**अटी व शर्ती :** कृषी आधारित व अन्नप्रक्रिया क्षेत्रातील ज्या उद्योग घटकांनी गुंतवणूक केली आहे. तथापि अद्याप पात्रता प्रमाणपत्र घेतलेले नाही अशा घटकांना हे लाभ अनुज्ञेय राहतील. ही प्रोत्साहने सामूहिक प्रोत्साहन योजना २०१९ च्या योजना कालावधी ३१ मार्च २०२४ पर्यंत लागू राहतील.

कृषी आधारित व अन्नप्रक्रिया क्षेत्रातील मोठ्या व विशाल प्रकल्पांना एकूण भांडवली गुंतवणुकीच्या १० टक्के किंमत (रुपये कमाल १० कोटी रुपयांपर्यंत) अथवा २० हेक्टर क्षेत्र एवढी मर्यादा भूखंडाकरिता राहील. कृषी आधारित व अन्नप्रक्रिया क्षेत्रातील नाशवंत घटकांच्या प्राथमिक प्रक्रिया क्षेत्रातील केवळ शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या अथवा जे उद्योग शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून कच्चा माल घेतील अशाच कृषी आधारित व अन्न प्रक्रिया क्षेत्रातील मोठ्या व विशाल प्रकल्पांना वरील लाभ देय राहतील. दुय्यम व तृतीयस्तरीय अन्नप्रक्रिया गटातील उद्योगांची वर्गवारी कृषी विभागाकडून प्रमाणित करण्यात येईल व असे उद्योग वरीलप्रमाणे गुंतवणूकीचे निकष गटाप्रमाणे पूर्ण करत असल्यास त्यांना मोठा व विशाल प्रकल्प दर्जा देण्यात येईल. औद्योगिक विकास अनुदान म्हणून ढोबळ राज्य व वस्तू सेवा कर आधारित प्रोत्साहने राज्यांत होणाऱ्या प्रथम विक्रीवर देय राहतील.

कृषी आधारित व अन्नप्रक्रिया क्षेत्रातील मोठ्या व विशाल प्रकल्पांना राज्य शासनाकडून अन्य कोणत्याही विभागाकडून मिळणारी प्रोत्साहने त्यांच्या गटातील अनुज्ञेय भांडवली गुंतवणुकीच्या व वार्षिक प्रोत्साहनाच्या मर्यादेत राहतील.

कार्बोनेटेड पेय (शित पेय), बाटली बंद पेय जल, इथेनॉल, चिविंग गम व ज्या तयार मालांचा वस्तू व सेवा कर २८ टक्के आहे अशा तयार मालाच्या उत्पादन उद्योगांना व अशा प्रक्रिया घटकांना या सामूहिक प्रोत्साहन योजनेतील लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

## महाराष्ट्र ॲग्री बिझनेस

आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क या प्रकल्पास मान्यता व आशियाई विकास बँकेसोबत करार करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे फळे व भाजीपाला उत्पादनास मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन मिळेल व शेतकऱ्यांना लाभ होईल.

फळे आणि भाजीपाल्यांची राज्यात पुढील ५ वर्षांपर्यंत वाढती मागणी लक्षात घेऊन तसेच विविध टप्प्यांमध्ये फळ भाजीपाल्यांचे होणारे नुकसान लक्षात घेता या मॅग्नेट नेटवर्कमधून अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्पाची राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ६ वर्षांसाठी (२०२० ते २०२६ पर्यंत) अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली.

## पावसाळी अधिवेशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे आगामी तिसरे पावसाळी अधिवेशन मुंबई येथे सोमवार ७ सप्टेंबरपासून बोलवण्यात येण्याची शिफारस राज्यपालांना करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यापूर्वी ३ ऑगस्टपासून हे अधिवेशन घेण्याचे कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत ठरले होते. परंतु कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात प्रशासकीय यंत्रणा कार्यरत असल्याने हे अधिवेशन ७ सप्टेंबरपासून घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सार्वजनिक संस्कृतीचा मुख्य प्रवक्ता बनला आहे. गेल्या शतकभरात गणेशोत्सवाने समाज आणि देशहिताचे व्रत जोपासले आहे. त्यामुळेच यंदाच्या कोविड-१९ च्या काळातील गणेशोत्सव समाज जागृतीचे एक महत्त्वाचे साधन ठरणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपली दायित्वे पार पाडण्यासाठी पुढे येत आहेत. यंदाच्या गणेशोत्सव काळात लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने समाजहितैषी घेतलेली भूमिका निश्चितच इतर मंडळांपुढे आदर्श ठेवणारी आहे.

# प्रबोधनाचा वसा पुढे न्यावा



महाराष्ट्राचा गणेशोत्सव केवळ धार्मिक सण नाही, तर तो समाज प्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम बनला आहे. लोकमान्य टिळकांनी समाज जागृतीसाठी सुरू केलेली ही सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा महाराष्ट्राने नव्या टप्प्यांवर नेली आहे. एक सांस्कृतिक चळवळ निर्माण केली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सांस्कृतिक कार्यक्रमांना व्यासपीठ मिळवून देतानाच समाजजागृतीच्या आपल्या दायित्वापासून ती ढळली नाही. आज जेव्हा संपूर्ण जग कोविड-१९शी लढा देत आहे त्या वेळी गणेशोत्सव मंडळाकडून सहकार्य अपेक्षित होते. गणेशोत्सव मंडळांनीही आपणहून या महामारीच्या काळात काही बंधने पाळणार असल्याचे सांगितले आहे. कोविड विरोधातील या लढ्यात राज्य शासनासोबत संपूर्ण समाज उभा असल्याचे चित्र दिसून येत आहे.

संपूर्ण जग आज कोविड-१९शी लढा देत आहे. यामध्ये या साथीचा प्रसार रोखणे हाच सर्वोत्तम पर्याय आहे. गणेशोत्सवासारख्या आनंदाच्या प्रसंगी लोकांचे आरोग्यही चांगले राहिले पाहिजे या उद्देशाने राज्य शासनाने गणेशोत्सव कसा साजरा करावा, याबाबत मार्गदर्शक सूचना केल्या आहेत.

## मार्गदर्शक सूचना

सार्वजनिक गणेशोत्सवासाठी सर्व संबंधित सार्वजनिक गणेश मंडळांनी महापालिका/स्थानिक प्रशासनाची त्यांच्या स्थानिक धोरणानुसार यथोचित पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

कोविड-१९मुळे उद्‌भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता, न्यायालयाने निर्गमित केलेले आदेश आणि महापालिका तसेच संबंधित स्थानिक प्रशासन यांचे मंडपाबाबतचे धोरण यांच्याशी सुसंगत असे मर्यादित स्वरूपाचे मंडप उभारण्यात यावेत. या वर्षीचा गणेशोत्सव साध्या पद्धतीने साजरा करणे अपेक्षित असल्याने घरगुती तसेच सार्वजनिक गणपतीची सजावट करताना त्यात भपकेबाजी नसावी.

श्रीगणेशाची मूर्ती सार्वजनिक मंडळाकरिता चार फूट व घरगुती गणपतीसाठी दोन फुटांच्या मर्यादेत असावी.

या वर्षी शक्यतो पारंपरिक गणेशमूर्ती ऐवजी घरातील धातू, संगमरवर आदी मूर्तीचे पूजन करावे. मूर्ती शाडूची, पर्यावरणपूरक असल्यास त्याचे विसर्जन शक्यतो घरच्याघरी करावे. घरी विसर्जन करणे शक्य नसल्यास नजीकच्या कृत्रिम विसर्जन स्थळी विसर्जन करण्यात यावे. गणेश मूर्तीचे विसर्जन पुढे ढकलणे शक्य असल्यास त्या मूर्तीचे विसर्जन माघी गणेशोत्सव विसर्जनाच्या वेळी किंवा २०२१ च्या भाद्रपद महिन्यात म्हणजेच पुढील वर्षाच्या विसर्जनाच्या वेळी करता येणे शक्य आहे. जेणेकरून श्रीगणेशाचे आगमन/विसर्जनासाठी गर्दीत जाणे

टाळता येऊ शकते. यामुळे स्वतःचे व कुटुंबीयांचे कोरोना साथीच्या रोगांपासून रक्षण होईल. उत्सवाकरिता देणगी/वर्गणी स्वेच्छेने दिल्यास त्याचा स्वीकार करावा. जाहिरातीच्या प्रदर्शनामुळे गर्दी आकर्षित होणार नाही असे पाहावे. तसेच आरोग्यविषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंती देण्यात यावी.

सांस्कृतिक कार्यक्रमांऐवजी आरोग्यविषयक उपक्रम/ शिबिरे उदा. रक्तदान शिबिर आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याद्वारे कोरोना, मलेरिया, डेंग्यू असे आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय त्याचप्रमाणे स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात यावी.

आरती, भजन, कीर्तन व अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करताना गर्दी होणार नाही तसेच ध्वनिप्रदूषण संदर्भातील नियमांचे व तरतुदींचे पालन करण्यात यावे.

श्रीगणेशाच्या दर्शनाची सुविधा ऑनलाइन केबल नेटवर्क वेबसाईट व फेसबुक इत्यादींद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत जास्तीत जास्त व्यवस्था करण्यात यावी.

गणपती मंडपामध्ये निर्जंतुकीकरण करावे तसेच थर्मल स्क्रिनिंगची पर्याप्त व्यवस्था करण्यात यावी. प्रत्यक्ष येऊन दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भाविकांसाठी शारीरिक अंतराचे (फिजिकल डिस्टन्सिंग) तसेच स्वच्छतेचे नियम मास्क, सॅनिटायझर इत्यादी पाळले जाईल, याकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

श्रींची आगमन व विसर्जन मिरवणूक काढण्यात येऊ नयेत. विसर्जनाच्या पारंपरिक पद्धतीत विसर्जनस्थळी होणारी आरती घरीच करून विसर्जन स्थळी कमीत कमी वेळ थांबावे. लहान मुले आणि वरिष्ठ नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने विसर्जन स्थळी जाणे टाळावे. संपूर्ण चाळीतील अथवा इमारतीतील सर्व घरगुती गणेशमूर्तींच्या विसर्जनाची मिरवणूक एकत्रित काढण्यात येऊ नये.



महापालिका, विविध मंडळे, गृहनिर्माण संस्था, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था आदींच्या मदतीने कृत्रिम तलावाची निर्मिती करण्यात यावी.

कोविड-१९च्या विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधित महापालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरू होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिद्ध झाल्यास त्याचे देखील अनुपालन करावे.

## मुख्यमंत्र्यांचे आवाहन

कोकणातल्या गावोगावच्या दक्षता समित्या, गणेश मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करावे, गावोगावच्या दक्षता समित्यांनी या काळात सर्व गावकरी कोरोना संदर्भातील सर्व नियमांचे, स्वच्छतेचे पालन करताहेत का ते नियमित पाहावे तसेच जनजागृतीही करावी, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले आहे. गणेशोत्सवाच्या मंगल सणादरम्यान आरोग्याचे विघ्न येऊ नये, याची काळजी सर्वांनी घेणे आवश्यक आहे.


मुंबई भागातून लाखो नागरिक रत्नागिरी, सिंधुदुर्गात आपापल्या परंपरागत घरी जाऊन गणेशोत्सव साजरा करतात.सध्या कोरोनाचा संसर्ग शहरी भागात जास्त दिसत असला तरी ग्रामीण भागातही तो दिसू लागला आहे. मुंबईजवळच्या रायगड जिल्ह्यात तो वाढतोय. त्या तुलनेत रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथे त्याचा प्रादुर्भाव नाही. त्यामुळे गणेशोत्सव काळात नागरिकांची होणारी ये-जा पाहता प्रशासनाने पुरेपूर काळजी घ्यावी आणि दक्ष राहावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी केल्या आहेत.

## सुविधा वाढवा

रत्नागिरी, सिंधुदुर्गासाठी चाचणी प्रयोगशाळा सुरू झाली आहे. रायगडाची लवकरच कार्यान्वित होईल. त्यांच्या क्षमता वाढवणे, तसेच विलगीकरण व इतर वैद्यकीय सुविधा तातडीने पुरवणे, रुग्णवाहिका पुरेशा राहतील हे पाहणे, जेणेकरून गणेशोत्सवापर्यंत वैद्यकीय सेवा उपलब्ध राहील; याकडे प्रशासनाने काटेकोरपणे लक्ष द्यावे.

**टीम लोकराज्य**






# यातच आहे शहाणपण!

**नागपूरच्या शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयातील उपयोजित कलेच्या अभ्यासक विद्यार्थ्यांनी अत्यंत कल्पकतेने कोरोनाविषयी जागृतीसाठी रेखाटलेली ही काही भित्तिपत्रके...**



R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

महाराष्ट्र शासन

# अफवा की खरं?
# कसं ओळखायचं?
# सोप्पं!
# सरकारी माहितीवर विश्वास ठेवायचा!

कोविड-१९ अर्थात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठीच्या होत असलेल्या उपाययोजना, तपासणी, उपचार आणि गरजूंसाठी सोयी सुविधा याबाबत शासनाची अधिकृत, खरी आणि ताजी माहिती यासाठी क्लिक करा

**www.mahainfocorona.in**



**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR


प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**अनिल आलूरकर**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., ए-१८०/४, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०३ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे